

आद्य श्रीशंकराचार्य

# माणूस

**साप्ताहिक**

१७ डिसेंबर १९६६

चाळीस पैसे



श्री. ब. मो. पुरंदरे

यांची एक ऐतिहासिक कादंबरी

# शिलंगणाचं सोनं



मूल्य तीन रुपये

राजहंस प्रकाशन पुणे

४१९, नारायण पेठ, पुणे २




## एक समग्र साप्ताहिक


वर्ष : सहावे
अंक : चोवीसावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४१९ नारायण, पुणे २.
दूरध्वनी – ५७३५९


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## पत्रमैत्री

स. न. डिसें. १

'माणूस' साप्ताहिक के कुछ अंक इन दिनों में देखने का अवसर मिला। यह साप्ताहिक साहित्य तथा विचार-सृष्टि में कुछ विशेष हलचल करता दृष्टिगोचर हुआ। इसकी भाव-भूमि में कुछ आन्तरिक दृढता, विशाल योजना, सूक्ष्म विवेचक बुद्धि और कुशल प्रगति के बीज अंकुरित हुए दिखाई पडे। कहना कठिन है कि इसका श्रेय सम्पादक को दिया जाय या व्यवस्था को। कारण दोनों का मेल जरा दुर्लभ होता है। मेल हो भी तो भावभूमि एक होना कठिन होती है। इसलिए 'माणूस' के श्रेष्ठ प्रकाशन पर आनन्द ही व्यक्त किया जा सकता है। इसी का दीपावली विशेषांक ( वर्ष–६, अंक १८-२१ ) सजधज के साथ निकला है। पाठक इसे एक पकड में पढ ले सकता है– इसका परिचय तो इसी बातसे मिल जाता है कि इस अंक की अनुक्रमणिका नहीं दी गई। संपादकीय टिप्पणी भी छोटी ही है। जो कुछ है लेख, व्यंग्य चित्र, कहानी, कविता, आत्मकथा, ऐतिहासिक, भौगोलिक वर्णन सभी सुचित्रित एवं आकर्षक सज्जा से युक्त है।


[ लखनौ येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'राष्ट्र-धर्म' या मासिकात 'माणूस' दिवाळी अंकावर आलेला अभिप्राय. ]

# कामराजस्वामींचे सूचक दाक्षिणायन!

विद्यमान संसदेचे शेवटचे अधिवेशन आटोपले असल्यामुळे आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या दृष्टीने, गेल्या महिन्यापासून सुरू झालेल्या हालचालींना आता अधिकच जोर चढत आहे. काँग्रेसच्या मध्यवर्ती निवडणूक समितीच्या बैठकीतील चर्चा प्रवाह कानावर आले की साऱ्या देशाचा गेली वीस वर्षे कारभार हाकणारी काँग्रेस संघटना अंतर्गत गटबाजीमुळे किती पोखरुन गेली आहे याची कल्पना येते. या गटबाजीस अधूनमधून उदात्त ध्येयवादी मतभेदांचा मुलामा देण्यात येतो. परंतु हा मुलामा जरासा खरवडला की आत दिसून येते ती सत्ता हस्तगत करण्याची व त्या योगे वैयक्तिक महत्त्वाकांक्षा साकार करून घेण्याची हाव.

पं. नेहरू हयात असेपर्यंत सुप्त असलेली ही सत्तास्पर्धा आता उघड रूप धारण करीत आहे एवढेच. कोणी काही म्हटले तरी पंडितजींच्या निधनानंतर केन्द्रसत्ता दुबळी झाली आहे व राज्यांचे मुख्यमंत्री सुभेदारासारखे वागू लागले आहेत ही गोष्ट नाकारता येणार नाही. कामराजांनी काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारल्यापासून पक्षसंघटनेच्या नेतृत्वास एकसंघ स्वरूप प्राप्त झाले होते. व त्यामुळे या सुभेदारांवर थोडासा वचक होता. परंतु इंदिरा गांधी यांच्या प्रधानमंत्रीपदाच्या निवडणुकीच्या वेळी कामराजांनाही द्वारकाप्रसाद मिश्रा, मोहनलाल सुखाडिया प्रभृति सुभेदारांमार्फतच मते गोळा करावी लागली व तेव्हापासून सुभेदारांची शिरजोरी वाढतच चालली.

कृष्ण मेनन यांना ईशान्य मुंबई मतदारसंघातील तिकिट नाकारून कामराजांच्या एकसंघ नेतृत्वाला चांगले भगदाड पाडण्यांत त्यांच्या विरोधकांना यश आले आहे. त्यामुळेच कामराजांनी दिल्ली सोडून मद्रासला जाण्याचा विचार केला आहे. काँग्रेसचा अध्यक्ष राहून आपण जेवढे नियंत्रण वा दडपण आणू शकतो, त्यापेक्षा-मद्राससारख्या काही प्रश्नाबाबत दिल्लीशीही झुंज घेण्याची तयारी असलेल्या राज्याचे मुख्यमंत्रीपद स्वीकारून, राजकारणाच्या बुद्धिबळाच्या पटावरील सोंगट्या अधिक सुलभतेने हलवू शकतो हे कामराजांना उमगून आले आहे. शिवाय घटने-प्रमाणे काँग्रेस अध्यक्षपदही त्यांच्याकडे आता फार काल राहणार नाही. तेव्हा योग्य वेळी मद्रासला स्थलांतर करणे त्यांना उचित वाटले असावे.



## दिल्लीची पकड सैल झाली

गेल्या जानेवारीमध्ये प्रधानमंत्रीपदाची निवडणूक झाली तेव्हा कामराजांनी आपले खरे बुद्धियुक्तिकौशल्य इंदिराबाईंच्या बाजूने पणास लावले होते. मोरारजी-पासून ' सिंडिकेट ' ला फोडण्यातही ते यशस्वी झाले होते. आता एक तर ' सिंडिकेट ' मोरारजीभाईंच्या कच्छपीं लागली आहे. शिवाय इंदिरा गांधीही आपले तितकेसे ऐकत नाहीत ही कामराजांची मुख्य तक्रार आहे. आपल्यापेक्षा अशोक मेहता, सुब्रह्मण्यम व दिनेशसिंग यांच्यासारख्या काँग्रेससंघटनेच्या दृष्टीने उपऱ्या असलेल्या व्यक्तींच्या तालावर इंदिरा गांधी कसरत करीत आहेत हे कामराजांना आढळून येताच त्यांनी आपल्या निकटवर्ती गोटात बराच त्रागा केल्याचे ऐकिवात

आहे. राजकीय निरिक्षकांच्या अंदाजाप्रमाणे कामराजांनी मद्रासचे मुख्यमंत्रीपद स्वीकारले तर मद्रास, म्हैसूर, केरळ व आंध्र या चार दाक्षिणात्य राज्यांचे प्रवक्ते म्हणून वावरू लागतील व कृष्ण मेनन यांच्या प्रकरणी जी मानहानी झाली आहे तिची त्यांना सहज भरपाई करता येईल.

पं. नेहरूप्रमाणेच इंदिरा गांधी यांचाही पक्षसंघटनेपेक्षा आपला वैयक्तिक लोकप्रियतेवरच अधिक भर आहे व म्हणूनच कामराजांचा मदतीचा हात झिडकारण्याचे धाडस त्या दाखवीत आहेत. जगजीवनराम, यशवंतराव चव्हाण व फकरुद्दीन अलि महंमद यांचाही त्यांना भरघोस पाठिंबा आहे. त्यामुळे महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, बिहार, पंजाब आसाम या पाच राज्यांचा आपल्याला भरघोस पाठिंबा मिळेल अशी त्यांची धारणा आहे. आपल्या वडिलांप्रमाणे सर्वांवर वचक ठेवण्याइतके त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रभावी नाही. आणि त्याचबरोबर एखाद्या बलाढ्य व्यक्तीच्या दडपणाखाली व मार्गदर्शनाखाली सतत वावरत राहणे हेही त्यांच्या स्वभावात नाही. त्यामुळे गेल्या निवडणुकीच्या वेळी त्यांच्या बाजूला असलेली सिंडिकेट व कामराज या दोन्ही शक्तीही आज त्यांच्यापासून दूर गेल्या आहेत. यापैकी कामराज इंदिरा गांधी यांच्याविरुद्ध भूमिका घेतील अशी शक्यता नाही. ते फक्त दाक्षिणात्य राज्यांच्या हितसंबंधापुरते जागरूक राहतील. स. का. पाटील व अतुल्य घोष यांची सिंडिकेट मात्र मोरारजी देसाई यांच्या आड उभी राहून नेहरूकन्येशी अखेरची झुंज घेणार आहे. दोन्ही गटांना आपापली शक्तिस्थाने माहीत आहेत. या दोन्ही गटांना सामील नसलेल्या तटस्थांपैकी बहुसंख्याकांना दोन गटांपैकी कोणता गट आपल्यात ओढून घेण्यांत पट्टीचे होतो यावरच मार्चच्या प्रारंभी होणाऱ्या प्रधानमंत्रीपदाच्या निवडणुकीतील यशापयश अवलंबून आहे.

काँग्रेसचे वरिष्ट नेते या अंतर्गत राजकारणांत गढून गेले असल्यामुळे काँग्रेसला विरोधी शक्तींचा विचार करण्याची अद्याप तरी त्यांना सवड मिळालेली नाही. ७ नोव्हेंबरच्या पहिल्या निदर्शनानंतर जनसंघाचे नेते उत्तर भारतांतील आपली प्रचारयंत्रणा अधिक प्रभावी करीत आहेत. यामागच्या निदर्शनानंतर कोणताही अनुचित प्रकार घडला नसला तरी कदाचित ही वादळापूर्वीची शांतता असण्याचा संभव आहे अशी भीती येथील जुने आणि जाणिते पत्रप्रतिनिधी व्यक्त करीत आहेत.

## जनकाँग्रेसचा जन्म – किरकोळ पडझड

जनसंघाच्याच जोडीलो आता जनकाँग्रेस हा जुना काँग्रेसवाल्यांचा नवा बंडखोर पक्ष ही आकारात येत आहे. डॉ. हरेकृष्ण मेहताब, संजय मुकर्जी, पवित्रमोहन प्रधान, हुमायून कबीर, के. एम. जॉर्ज, डॉ. फरिदी आदि काँग्रेसच्या राजकारणांतील मुरब्बी, जनकाँग्रेसच्या सूत्रधारां मध्येअसल्यामुळे ही बंडखोर काँग्रेस सत्तारूढ काँग्रेसला हादरा देण्याइतपत जरी नाहीं तरी तिची पडझड करण्यात बरीच यशस्वी

होईल अशी शक्यता वाटते. केरळ, बंगाल, मध्यप्रदेश आदि कांही राज्यांत बंडखोर काँग्रेसची यापूर्वीच स्थापना झालेली आहे. आता तिला अधिक व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न सुरू झाला असून आठ राज्यांत तरी ही जनकाँग्रेस आपली पाळे-मुळे रोवूं शकेल असा विश्वास डॉ. हरेकृष्ण मेहताब व हुमायून कबीर यांनी पत्र प्रतिनिधींशी बोलताना व्यक्त केला आहे.

आगामी राजकारणाच्या दृष्टीने या हालचाली सुरू असताना केंद्र सरकारला सध्या व्यग्र केले आहे ते दोन प्रश्नांनी. एक म्हणजे अन्नधान्याच्या टंचाईचा व दुसरा गोवधबंदीचा. अन्नधान्याच्या टंचाईमुळे रशिया, अमेरिका, कॅनडा व ऑस्ट्रेलिया यांच्याकडे मदतीसाठी याचना सुरू झाली आहे, अमेरिकेने सध्या जरी धान्यमदत गोठविली असली तरी जानेवारीच्या मध्यापूर्वी म्हणजे निवडणुकीआगोदर एक महिना ती धान्यमदत धाडील व आपल्या भारतांतील लोकप्रियतेला आज जी ओहोटी लागली आहे ती सावरून घेईल याविषयी कोणालाच शंका वाटत नाही. परंतु हे सारे तणावाचे राजकारण चालू असताना चौथ्या योजनेचे भवितव्य काय हा यक्षप्रश्न सुटण्याची काहीच चिन्हे दिसत नाही. आम्ही आमचे परराष्ट्रीय धोरण आखतांना परराष्ट्रांचे दडपण मानीत नाही असा जरी नव्या परराष्ट्रमंत्र्यांनी खुलासा केला असला तरी त्यात फारसे तथ्य नाही. भारतातल्या आगामी निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतरच अमेरिकेचे मदतीसंबंधीचे धोरण निश्चित होईल व तोपर्यंत आपल्याला अनुकूल असलेल्या गटाला या निवडणुकींत वाव मिळावा इतपत ती निवडणुकांपूर्वीच मदत करील असा कयास आहे. परंतु हा झाला आंतराष्ट्रीय राजकारणाच्या क्षेत्रांवरील प्रश्न.

गोवधबंदीचा प्रश्न मात्र खास देशी आहे आणि जोपर्यंत केंद्र सरकारचा आदेश मानण्याची राज्य सरकारांची मनःस्थिति नाही तोपर्यंत या प्रश्नाची सोडवणूक होणेहि कठिण आहे. केंद्र सरकारचा दुबळेपणा या प्रश्नामुळे अधिकच उघडा पडला आहे. नव्या गृहमंत्र्यांनी पुरीच्या शंकराचार्यांना उपोषण सोडण्याचे आवाहन केले आहे. परंतु आता त्यासाठी प्रभुदत्त ब्रह्मचारीकडून जनता कौलाची सूचना पुढे आली आहे. गोव्याच्या भवितव्याबाबत जनता कौल घेत आहात मग गोवधबंदी-बाबत हा मार्ग का स्वीकारू नये असा त्यांचा सवाल आहे. एकंदरीत आता कोणताही नवा प्रश्न निर्माण झाला की जनता कौलाची मागणी पुढे येणार अशी चिन्हे दिसत आहेत. एकंदरीत पुढचे वर्ष सर्वच अर्थांनी जनता कौलाचे वर्ष ठरणार आहे. गोव्यांत त्याची नांदी होणार आहे एवढेच.

**सदाशिव पेठकर**

# ठुस्काफळे...



## सुंदरीची गोष्ट

जर गोव्याचे सर्वमत होऊन गोवा महाराष्ट्रात विलीन झाला तर गोव्याचा जो काय फायदा होणार असेल तो होवो, परंतु त्यापेक्षा महाराष्ट्राचा जास्त फायदा होणार आहे ! आतापर्यन्त मोठमोठ्या कवींनी ' दगडांच्या देशा ' म्हणून हिणवलेल्या या मराठी मुलुखाला ' विश्वसुंदरी'च्या पितृत्वाचा मान मिळण्याचा योग जवळ आला आहे. ' दगडांच्या देशा 'त आता परीसारख्या सुंदर स्त्रियांचा मुलूख लवकरच सामील होणार, या भयाने १९६१ साली चारशे वर्षांच्या गुलामीनंतर जेव्हा गोव्यावर स्वारी करून भारताने गोवा जिंकला, तेव्हा गोवेकर ( आंग्ल ) कवी डॉम मोराईस याने म्हणूनच गळा काढला होता–

" Now I cannot go back " गोवा भारतात विलीन होताच डॉम मोराईसला भारतीय नागरिकत्व नकोसे झाले.

विश्वसुंदरी झालेली रिटा फरिया ही गोवेकर ख्रिश्चन आहे. मुंबईच्या ' ब्लिट्झ् ' पत्राने तिची छापलेली छबी पाहून आमची खात्री झाली की, ' रामजोशी ' हा एकदा तरी गोव्याला जाऊन आला असला पाहिजे ! – " जशी मन्मथ रति बाकटी । सिंहसम कटी । उभी एकटी । गळ्यामध्ये हार। " अशी सुंदर स्त्री त्याला गोव्याखेरीज इतर कुठे दिसली असणार ?

भारताचे नाव आंतरराष्ट्रीय क्षेत्रात उज्ज्वल करणारी अलीकडील काळातील रिटा फरिया ही तिसरी स्त्री होय ! इतर दोघी म्हणजे विजयालक्ष्मी पंडित व इंदिरा गांधी ! आपल्या श्रेयात वाटा मागणाऱ्या रिटा फरियाला इंदिरा गांधींनी किंवा पंडितीणबाईंनी अभिनंदनाची तार पाठविली नाही, हे योग्यच झाले.

डॉ. सुशीला नायर या मंत्रिणबाई तार पाठवणार होत्या तोच, कुणा लोबो नावाच्या गोवेकराच्या या वाग्दत्त वधूने जाहीर केले की, " मला निदान चार-पाच मुले हवी आहेत ! " लंडनच्या मेयरने नेमका असा ' लुच्चट ' प्रश्न तिला विचारला. कारण ती रोमन कॅथॉलिक आहे व कॅथॉलिक धर्माचा संतती-नियमनाला विरोध आहे ! आपल्याला चार-पाच मुले झाली तर ती आपल्याप्रमाणे सुंदर होतील, अशी

या सुंदरीची रास्त अपेक्षा आहे. परंतु भारताची परिस्थिती लक्षात घेऊन, एक-दोन मुले होताच मी ' लूप'चा प्रचार करणार आहे, असे तिने जाहीर केले असते, तर तिने भारताची अधिक सेवा नसती केली ? डॉ. सुशीला नायर पण त्यामुळे रागावल्या !

सचिन्द्र चौधरी व मनुभाई शहा यांना हजार रुपयांचे परकीय चलन मिळवताना नाकात दम येतो, तर या नाकीडोळी सुंदर मुलीने ५२,००० रुपयांचे परकीय चलन हां हां म्हणता भारताला मिळवून दिले आहे ! म्हणून हे दोघे मंत्री तिला अभिनंदनाची तार करणार तोच स्वर्णसिंगांनी मोडता घातला ! स्वर्णसिंगांनी दोघांना फैलावर घेतले. ' व्हिएटनाम ' अशी किंकाळी फोडून स्वर्णसिंग म्हणाले– "ही विश्वसुंदरी दक्षिण व्हिएटनाममध्ये अमेरिकन सैनिकांचे मन रिझवण्यासाठी जाणार आहे ही बातमी वाचली नाहीत तुम्ही ? भारताच्या परराष्ट्र धोरणाची सूत्रे हाती घेतलेल्या छगलांना विचारल्याखेरीज हा उद्योग करू नका !"

तुम्ही म्हणाल– " जॉन्सन यांची हांजी हांजी करणाऱ्यांनी फरियावर का रागवावे ? जॉन्सनसाहेबांच्या मुलीच्या लग्नात आहेर पाठवणाऱ्यांनी बिचाऱ्या फरियाला का फैलावर घ्यावे ? विश्वसुंदरीने विश्वात कुठेही संचार करावा !"

नाही मंडळी, हे खरे नाही ! रिटा व्हिएटनाममध्ये गेली तर आपला गहूवाला पोसिजिन खूष झाला तरी कोसिजीन रागावेल ! आपल्या परराष्ट्रनीतीतील ही ' सौंदर्यस्थळे ' आपण जपली पाहिजेत.

## हौसेला मोल नसते

आपल्या हौशी महाराष्ट्र सरकारने, हौशी कलावंतांसाठी व हौशी प्रेक्षकांसाठी प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही प्रादेशिक नाट्यस्पर्धा ठिकठिकाणी आयोजित केल्या आहेत. लवकरच तमाशास्पर्धाही होतील. या स्पर्धांचे परीक्षकही योजनापूर्वक ' हौशी ' निवडले जातात. एका सुप्रसिद्ध मराठी नाटककाराला एकदा तमाशा स्पर्धेसाठी परीक्षक निवडण्यात आले. त्याने म्हणे सरकारला विचारले– " तमाशा स्पर्धेसाठी मला परीक्षक म्हणून निवडताना आपल्या त्या विषयातले कोणते गुण माझ्यात आढळले हे कळत नाही ! " यावर त्याला बहुधा असे कळविण्यात आले की, " आपण हौशी आहात. सर्व तमाशांची हौस आपल्याला आहे, असा आमचा समज आहे. " खरे पाहता सरकारच्या संबंधित खात्यातील कुठल्याही माणसाशी ' हौशी ' घरोबा नसता ज्या अर्थी तिनांपैकी एका जागेवर तरी अगदी अनोळखी व्यक्ती निवडली जाते, यावरून संबंधित खाते १/२ निःस्पृहरीत्या कारभार करते, असे या नाटककाराने समजायला हवे.

अशा या नाट्यस्पर्धेच्या वेळी तिकीट काढून आलेले प्रेक्षक, नाटकाने निराशा केल्यास, आरडाओरडा व गडबड करतात. ज्या अर्थी गडबड पहिल्या काही रांगांत होत नाही, त्या अर्थी कुठलेही नाटक जवळूनच पाहताना फारच चांगले होत असले पाहिजे. ही मंडळी खरी हौशी असतात! डॉक्टरचे पात्र– आपणच डॉक्टर आहोत हे विसरून– "तर मी काय म्हणत होतो डॉक्टर–" असा विनोद करू लागले तरी ही हौशी मंडळी "आपण हसत तर नाही ना?" अशा काळजीने कासावीस होतात किंवा शेजारी पत्नी असली तर किंचित् स्मित करतात. परन्तु तिकिटे काढून आलेले रसिक प्रेक्षक मात्र सारखी गडबड करतात. टाळ्या वाजवून निषेध करतात. नटांच्या वाक्यांच्या समस्या पुऱ्या करतात. पुण्याच्या नाट्यस्पर्धेत 'वहिनीप्रेमाने' थवथबलेले एक नाटक कोसळते हे दिसत असताना हौशी नटांना उत्तेजन द्यायचे सोडून, मागल्या रांगांतल्या लोकांनी फारच चहाटळपणा केला. तिसऱ्या अंकात दीर ढसढसा रडत वहिनीला सांगू लागला––

"वहिनी, मी जातो–" तोच मागल्या रांगांतले, बरेचजण "वहिनी, आम्ही-पण जातो" असे एवढ्या मोठ्याने म्हणत उठून चालू लागले की बंदोबस्ताचे पोलीसही हसू लागले!

दैनिकातून या हुल्लडबाजीविरुद्ध जागरूक नाट्यप्रेमी, फारच कडक टीका करणारी पत्रे लिहितात. परंतु या प्रेक्षकांच्या बाबतीत काहीतरी कडक उपाययोजना केल्या-खेरीज हे हौशी उत्सव सुरळीत चालणार नाहीत.

परीक्षक तसे मख्ख चेहऱ्याने, न हसता, न गडबड करता हौशी नटांची कसलीही हौस तीन तास पाहू शकतात. अशी साधना असणाऱ्यांची एक यादी संबंधित खात्याने तयार करावी व या लोकांनाच उत्सवाची तिकिटे विकावी! यापुढे हौशी प्रेक्षकांचा एक नवा वर्ग तयार होऊन नाट्यकलेची उत्तरोत्तर प्रगती होईल!

हे शक्य नसल्यास, नाटकाची तिकिटे आधी न विकता फक्त शेवटपर्यन्त बसणा-ऱ्यांनाच विकावीत! एक अंक पाहणाऱ्यास तीन आणे, दोन अंक पाहणाऱ्यांना सहा आणे व तिन्ही अंक पाहाणाऱ्यांना एक आणा सूट देऊन आठ आणे! यामुळे परीक्षकांना नाटकाचे क्रमांक ठरवणेही सोपे जाईल...

जी प्रेक्षकमंडळी दिलखुलासपणे टाळ्या वाजवून रंगणारे नाटक अधिकच रंगव-तात, त्यांना पडणारे नाटक सपशेल पाडण्याचा मात्र मुळीच अधिकार नाही हे त्यांनी लक्षात ठेवावे! तिकिट काढून आल्यानंतरदेखील हौशी मख्खपणे बसण्याची अशा वेळी त्यांची तयारी पाहिजे. कारण हौसेला मोल नसते.

**ग्यानबा**

•

# 'पन्नास वर्षं हुकूम शाही पायजे'

(मनमाड स्टेशनजवळचे केस कापण्याचे एक जुनाट दुकान. काटक, किरकोळ प्रकृतीचे, करडया केसांचे, अंगावर विरलेला खाकी शर्ट घातलेले आणि धोतर नेसलेले गृहस्थ दुकानाचे एकमेव मालक, चालक आणि सेवक, बाहेरच्या वाकावर विडीचे झुरके घेत बसले आहेत.)

नाभिक (मला कुतूहलाने दुकान न्याहाळताना बघून) या ऽऽऽ केस लय वाढलेत...

कोणत्या गावचं पुन्याचं ना ?

मी : हो...पण, केस करायचे नाहीत. दाढी करायची आहे.

ना.: मग तसं सांगा एकदम फस्क्लास दाढी करून देतो. तुमच्या पुन्यासारखी. बाकी आजकाल लोक काटकसरच लय करत्यात. दोन-दोन महिने केस कापत नाहीत. (खुर्ची झटकीत) बसा. लोक तरी काय करनार म्हना. महागाईच वाढली !

मी : महागाईनी भलतेच वैतागलेले दिसतात...

ना. : ( साबणाचा ब्रश जोरात घाशीत ) अहो आक्खी पब्लीकच पिडलीय महागाईनं. मला एकटयाला काय विचारता ? तोंड भरभरून शिव्याशाप देत आहे जंता बघा सरकारला. काय सरकार आहे की काय आहे ! दोन घास पोरापुरते मिळवायची पंचाईत झाली आज...अन् म्हने...स्वराज्य... छ्या...अर्‌र्‌ऽऽच् च्...कानात फेस गेला बघा...पुसतो.

मी : चालायचंच...चालायचंच...पण नुसतं शिव्या देऊन काय भागणार ? महागाईसाठी लोकांनी काही करायला नको का ?

ना. : अहो लोक काय करनार ? विरोधी पक्षांना संप मोर्च्या शिवाय काही जमत नाही अन् काँग्रेसला भांडणापलीकडे आन् खान्यापलीकडे काय सुचत नाही. अहो, पब्लीकची फिकीर कोन करतो. सगळे चोर लेकाचे...! हां...हां तोंड उघडू नका फेस जाईल तोंडात...

मी : अरेच्या. म्हणजे मग तुम्ही मत देणार तरी कुणाला ? येत्या निवडणुकीत ?

ना. : हांऽऽ त्येवढं विचारू नका. गेल्या दोन निवडणुकीत मोठ्या भक्तीनी मत दिलं बघा बैलजोडीला. आता कानाला खडा लावला. बैलजोडी नाही न् काहीच नाही. इलेक्शनच्या तिकडे फिरकाचही नाही.

मी : म्हणजे ? अहो, तुम्हांला आपल्या देशाविषयी, निवडणुकीविषयी काही वाटत नाही ? लोकशाहीची चिंता

नाही ?

ना. : (वस्तऱ्याला धार लावीत) हे काय विचारनं झालं सायब ? न्हावी असलो म्हणून काय झालं ? ४२ च्या लढाईत लाठ्या खाल्ल्या आहेत आम्ही, आमचा धाकला भाऊ दोन वर्षं जेलात होता, देशाचं कुणाला प्रेम वाटणार नाही ? पण आता काय उरलं ? ज्यांनी खस्ता खाल्ल्या, ती मानसं झाली बाजूला अन् भलतेच लोक शिरजोर झाले.

अहो ते अच्युतराव पटवर्धन...काय मानूस होता. जवळून पाह्यलंय त्याना की तुम्ही पुन्याचेच, तुम्हांला आम्ही काय सांगणार. काय एकेक मानसं होती. आता सगळे न्हायले बाजूला... अन्...

मी : अहो, ते ठीक आहे. होती ती मोठी माणसं. पण आजच्या पुढाऱ्यांनी देशासाठी काहीतरी...स्स्...हाय्...

ना. : बिलकूल बोलू नका सायब... अर्र्-वस्तरा लागला वाटते. घाबरू नका...तुरटी चोळतो...बिल्कुल बोलूच नका तुम्ही. म्हने काय केलं ! वाट्टोळं केलं देशाचं. दमडी मोजल्याशिवाय एक काम होत नाही. पटत नसलं तर चला माझ्याबरोबर कुठल्याही सरकारी कचेरीत. दाखवतो. दमडी जवळ असली तर वाट्टेल ते होते. आता समजा, मी इथे या वस्तऱ्यानी तुमचा गळा चिरला...

मी : आँऽ ..अहो...स्स्...

ना. : नाही म्हंजे नुस्तं समजा. तर काय होईल ? झटक्यात पोलीस येतील, हातकड्या घालून नेतील अन् फाशी देतील...व्याक्...बिल्कुल बरोबर...पन तेच समजा, माझ्याजवळ दहा लाख रुपये आहेत, चार मोटारी आहेत, दोन बंगले आहेत अन् मी तुम्हांला विष देऊन मारलं तर काय होईल ? एक तर मला पोलीस पकडनार नाही. पकडलं तर खटला होनार नाही. झालाच तर शिक्षा होनार नाही. मला शिक्षाही झालीच तर फाशी तर मुळीच होनार नाही. काय ? खरं आहे ना ? आता बोला !

मी : तुम्ही बोवा अगदीच निराशावादी. चांगल्या गोष्टींविषयी विचारच...

ना. : अहो, कसल्या चांगल्या गोष्टी. आँ ? रस्ते, शाळा, घरनं ना ? त्या तर काय सगळ्या श्रीमंतांसाठी. स्वराज्य आलं नसतं तरी त्या गोष्टी येतच होत्या. गरिबांसाठी, पोटासाठी काय झालं ते मला सांगा. अमेरिकेचा गहू खातोच ना आपन ? तुम्ही बोलूच नका बिल्कुल. तेच विरोधी पक्षांचं. एकात पानी नाही बघा सरकारला वठनीवर आणायचं. सगळे भांडतात आपसात अन् स्वत: काहीच करत नाहीत. मी तर म्हनतो त्यांच्यापेक्षा काँग्रेस परवडली. डोक्याला तेल थापू ?

मी : लावा. पण मग आपण मतं कुणाला द्यायची ? देशातली लोकशाही टिकवली पाहिजे ना !

ना. : ( डोक्यावर जोरजोराने तेल थापीत ) कोन म्हणतो आपल्या देशात लोकशाही पायजे ? बिलकुल नको, निवडणुकीत मतच देऊ नका. या देशात आता पन्नास वर्षं हुकूमशाही पायजे बघा. सगळा देश सरळ होईल. लोक-

शाही नकोच. वीस वरसं खूप वाट पाह्यली. अहो, आपन अडानी मानसं. लोकशाही सत्यानास करील आपला. पन्नास वरसं कोनी आपल्या डोक्यावर दांडकं हापटनारं पायजे, म्हंजे मग आपन सीधे होऊ. बस्स् हुकूमशाही पायजे. जरा मान ढिली सोडता... ?

मी : अरे बापरे...

ना. : काय नाही, मान मोडली नुस्ती. बाकी आम्ही काय सांगनार म्हना. तुम्ही पुन्याची मानसं. तुमालाच जास्त कळनार...राहू द्या...राहू द्या तेलाचे पैसे. आमी फक्त दाढीचेच पैसे घेतो. पुन्यात घेत असतील तेलाचे पैसे. बरं आहे...

मी : बरं आहे.

( हनुवटीवरच्या जखमा मोजीत, हुळहुळलेला गाल चोळीत मी 'माणूस' प्रतिनिधी बाहेर पडतो आणि पुढे कुठल्याच केश कर्तनालयात राजकीय विषयावर चर्चा करायची नाही अशी मनोमन घोर प्रतिज्ञा करीत रस्ता काटू लागतो. )

बंगाल

# डाव्या कम्युनिस्टांचा आडमुठेपणा

आपले प्रादेशिकत्व, आपले "बांगला राष्ट्रीयत्व" अतिशय कटाक्षाने टिकवून ठेवण्याचा सतत प्रयत्न करणारा बंगाल प्रांत प्रथमपासूनच जहाल क्रांतीवाद्यांची मायभूमी म्हणून प्रसिद्ध आहे. रवीन्द्रनाथ टागोर, बंकिमचंद्र चटर्जी यांच्यासारख्या महान साहित्यिकांबरोबरच सुभाषचंद्र बोस आणि रासविहारी बसू यांच्यासारखे जहाल क्रांतीकारकही बंगालनेच भारताला दिले. साऱ्या उत्तर भारतातून गंगेने धुऊन आणलेल्या गाळापासून बनलेल्या या बंगालच्या सुपीक जमिनीत उत्कृष्ट पिकाबरोबर कुशाग्र बुद्धीच्या डोक्यांची आणि भावनाप्रधान मनांचीही पैदास होते. बंगाली माणूस जेवढा भावनाप्रधान, तेवढाच एकांडा आणि भांडखोर. भारताइतकाच त्यांना आपल्या "बांगला देश"चा अभिमान वाटतो. नव्हे बंगाल हे एक स्वतंत्र राष्ट्रच आहे, असे मानणारेही बंगाली आहेत. परप्रांतीयांकडे ते अतिशय तुच्छतेने पाहतात. बंगालएवढा अहंगंड दुसऱ्या कोणत्याच भारतीय प्रांतात आढळत नसेल.

भारतीय स्वातंत्र्याच्या कितीतरी आधीपासूनच बंगालमध्ये असंतोषाची बीजे पेरली गेली आहेत. मोठ्या प्रमाणावरील जमीनदारी, भूमिहीन शेतमजुरांची प्रचंड संख्या, अतिशय घट्ट जातिसंस्था आणि संख्येने मोठा असलेला दरिद्री मध्यमवर्ग यांच्यामुळे या असंतोषाच्या आगीत सतत तेल पडत गेले. आजही बंगालएवढा असंतुष्ट, निदान असंतोषाचे एवढे उग्र प्रदर्शन करणारा दुसरा प्रांत नाही. बंगाल-

मध्ये जेवढी निदर्शने, संप, हरताळ, मोर्च, मारामाऱ्या होतात तेवढ्या इतरत्र घडत नाहीत. बंगालमधील राजकर्त्यांना असलेला विरोध जेवढा प्रबळ आहे, तेवढा इतरत्र नाही. आणि तरीही तीन सार्वत्रिक निवडणुकांनंतरही राज्यकर्ता काँग्रेसपक्षच अधिकारारूढ आहे आणि कदाचित चौथ्या निवडणुकीनंतरही राहील.

याला कारण बंगाल्यांची तीच विशिष्ट वृत्ती. भांडखोर, भावनाप्रधान व्यक्तीवादी वृत्ती. वास्तविक पाहता, बंगालची भूमी काँग्रेसच्या पाडावाला सुपीक झालेली. सारे विरोधी पक्ष एकत्र आले तर बंगालमध्ये काँग्रेसचा पराभव होणार हे सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट आहे. पण विरोधी पक्ष एकत्र येणार नाहीत. त्याच्यांत प्रचंड दुफळ्या आहेत. विरोधी गटाला बिनशर्त तडजोडीची आर्त हाक मारणारा एक संयुक्त समाजवादी पक्ष सोडला तर बाकीचे सारे विरोधी पक्ष जणू एकमेकांचा गळा दाबायला टपून बसले आहेत. त्यात भर घातली आहे ती डाव्या-उजव्या कम्युनिस्टांच्या पराकोटीच्या वैमनस्यामुळे. कम्युनिस्ट भाईबंदांच्या वाटण्या झाल्यापासून नसेल एवढी धार आज डाव्या आणि उजव्यांच्या मारामाऱ्यांना बंगालमध्ये चढली आहे. रशिया आणि चीननेही धडा शिकावा अशा 'डांगेईस्ट,' 'रिव्हिजनिस्ट,' 'एक्स्ट्रीमिस्ट,' 'अॅन्टिरिव्होल्यूशनिस्ट' यांसारख्या प्रच्छन्न शिव्यांची त्यांनी परस्पर फैर धरली आहे. आणि त्यामुळे कितीतरी महिन्यांपासूनच चालत आलेली विरोधी पक्षांची निवडणूक-समझोत्यांची बोलणी अडून बसली आहेत. आणि बंगालमधील कम्युनिस्टांची ताकद मोठी आहे. दोन्ही कम्युनिस्ट एकत्र आल्याशिवाय प्रबळ विरोधी आघाडी उभी राहू शकत नाही. पण डावे कम्युनिस्ट म्हणतात, काँग्रेस आली तरी चालेल उजवे येता कामा नयेत आणि उजवेही तेच म्हणतात. काँग्रेसचे मात्र त्यामुळे फावते आहे.

'दादा' अतुल्य घोष यांनी आपल्या मुठ्ठीत घट्ट धरून ठेवलेल्या बंगाल प्रदेश काँग्रेसची ताकद खच्ची व्हायला आणि लोकप्रियता कमी व्हायला आणखी एक कारण म्हणजे श्री. हुमायून कबीर आणि श्री. अजय मुखर्जी यांनी काँग्रेसमधून फुटून आपला वेगळा स्थापन केलेला "बांगला काँग्रेस"चा सवता सुभा. वाढती महागाई, अन्नाची तूट, भ्रष्टाचार, रुपयाचे अवमूल्यन यांमुळे असंतोष वाढतो आहे, काँग्रेसची प्रतिमा डागाळली जात आहे. त्यात आणखी ही भर. २५२ जागांच्या बंगाली विधानसभेत सध्याच्या १६२ काँग्रेसच्या जागांपैकी ८० च्यावर जागा बांगला काँग्रेसला सहानुभूती असणाऱ्यांच्या आहेत. आणि सत्ताधारी काँग्रेसचा पराभव करण्याचा बांगला काँग्रेस आटोकाट प्रयत्न करीत आहे. मुस्लिमांवर होणाऱ्या अन्यायाच्या निषेधार्थ हुमायून कबीर राजीनामा देऊन बाहेर पडले याचा उपयोग बांगला काँग्रेसला मुस्लिमांची मते मिळविण्यात होईल. इतर विरोधी पक्षांशी, विशेषतः, उजवे कम्युनिस्ट आणि फॉरवर्ड ब्लॉक यांच्याशी त्यांची बोलणी चालू आहेत.

सध्याच्या विधानसभेत १०० विरोधी जागांपैकी ३६ डाव्या कम्युनिस्टांच्या, उजवे कम्युनिस्ट १३, फॉरवर्ड ब्लॅक १३, रिव्हॉल्युशनरी सोशलिस्ट पार्टी ७, सं. सो. पा. ३, प्र. सो. पा. २, बांगला काँग्रेस १४, गुरखा लीग २, लोकसेवक संघ ४ आणि इतर ६ अशी विभागणी आहे. बांगला काँग्रेसचा प्रभाव लक्षात घेता सारे विरोधी पक्ष एकत्र आले तर काँग्रेसचा सहज पराभव होऊ शकतो.

डाव्या कम्युनिस्टांचा खरा तात्त्विक संघर्ष वेगळाच असला तरी इथे मात्र त्यांची जागांच्या वाटपावरून भांडणे चालू होती. डाव्या कम्युनिस्टांनी सुमारे सव्वाशे ते दीडशे जागा लढवायचे ठरवले असून त्यांमध्ये उजव्या कम्युनिस्टांच्या ताब्यात १३ जागा सध्या आहेत. त्यातीलही ९ जागा त्यांनी लढवायचे ठरविले आहे. या जागांच्या बाबतीतच भांडण आहे. डाव्या कम्युनिस्टांचे म्हणणे आहे, त्या जागांवरून निवडून गेलेले उमेदवार उजवे कम्युनिस्ट असले तरी ते मतदारसंघ मात्र डावे आहेत. उजव्यांना हे मान्य नाही. डाव्या कम्युनिस्टांची आणखी एक गोष्ट फार बोलकेपणे नजरेला आलेली आहे. त्यांच्या यादीप्रमाणे बंगाल काँग्रेसचे पुढारी अतुल्य घोष, केंद्रीय अर्थमंत्री सचींद्र चौधरी, अ. भा. काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी मानीयन, बंगालचे मुख्यमंत्री सेन आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील एक सोडून सर्व मंत्री यांच्याविरुद्ध त्यांनी आपले उमेदवारच उभे केलेले नाहीत. अतुल्य घोष यांनी डाव्या कम्युनिस्टांशी एक छुपा निवडणूक करार केल्याच्या अफवा गेल्या जुलै महिन्यापासून उठत होत्या. त्या खऱ्या असाव्यात. या सर्व परिस्थितीवरून डाव्या कम्युनिस्टांचे खरे लक्ष्य काँग्रेस हे नसून उजवे कम्युनिस्ट आहे हे स्पष्ट होते.

डाव्या कम्युनिस्टांच्या या एकतर्फी यादीचा परिणाम इतर विरोधी पक्षांवरही झाला आहे. त्या अगोदर बंगला काँग्रेस, उजवे कम्युनिस्ट आणि फॉरवर्ड ब्लॉक यांचा एक विरोधी गट आणि डावे कम्युनिस्ट, सं. सो. पा., मार्क्सिस्ट यांची दुसरी प्रबळ विरोधी आघाडी अशा दोन विरोधी आघाड्या बनत चालल्याची चिन्हे दिसत होती. पण डाव्यांच्या या आडमुठ्या, एककल्ली वागण्याने सं. सो. पा., रि. सो. पा. आणि इतरही डावे विरोधी पक्ष नाराज झाले आहेत. त्यामुळे साऱ्या विरोधी आघाडीतच पुन्हा तडे गेले आहेत. आणि बंगाल्यात डाव्या कम्युनिस्टांची मुळे खोलवर गेलेली आहेत. त्यांची शक्ती दांडगी आहे. ते मिळाल्याशिवाय कोणत्याही काँग्रेसविरोधी आघाडीला जोर येणार नाही. ●



# विचारवारे

— समीर

## □ नोकरशाही आणि मंत्र्याची जबाबदारी

राज्यकारभार हाकताना मंत्र्याची जबाबदारी कोणती व त्याच्या हाताखालच्या नोकरशाहीची कोणती, हा प्रश्न सध्या हिंदुस्थानात वरचेवर धसाला लागत असतो व नंदाजींचा राजीनामा हे त्याचे एक अगदी ताजे उदाहरण म्हणता येईल. नेमक्या याच प्रचलित विषयावर ब्रिटनचे भारतातील हायकमिशनर श्री. जॉन फ्रीमन यांनी काही दिवसांपूर्वी नव्या दिल्लीत एक विचारपरिप्लुत भाषण देऊन ब्रिटनमध्ये या बाबतीत काय परिस्थिती आहे हे विशद केले.

ते म्हणाले, इंग्लंडात मंत्री आणि नोकरशाही यांच्यांतले नाते मंत्र्याची ' राजकीय जबाबदारी ' आणि नोकरशाहीवर राजकीय दडपण नसणे या परस्परपूरक दोन गोष्टींवर मुख्यत: आधारलेले आहे. सरकारी धोरणाची चोख अंमलबजावणी करणारा नोकरवर्ग, आपापल्या खात्यावर असणारा मंत्र्याचा सर्वाधिकार आणि पार्लमेंटचे मंत्र्यावर सार्वभौम वर्चस्व या तीन गोष्टींवर इंग्लंडची जनता आणि इंग्लंडचे सरकार यांचे परस्पर-संबंध अवलंबून आहेत. या संबंधांची जोपासना व्हायची असेल, तर राजकीय दडपण, राजकीय मते आणि राजकीय जबाबदारी यांचा उपसर्ग नोकरवर्गाला होता कामा नये. याची दुसरी बाजू म्हणजे जनतेच्या किंवा पक्षाच्या दडपणाविरुद्ध स्वत:च्या वतीने बोलू न शकणाऱ्या असहाय नोकरवर्गाचे रक्षण करण्याची व सरकारी कृत्याची राजकीय जबाबदारी शिरावर घेण्याची मंत्र्याची तयारी असावी लागते. आणि पार्लमेंटचे काम काय ? – तर मंत्र्याला सतावणे, त्याचे प्रत्येक कृत्य उघडकीला आणणे आणि सतत डोळ्यात तेल घालून जनतेच्या हिताला जपणे.

मंत्र्याच्या जबाबदारीला फक्त एकच अपवाद असतो व तो म्हणजे एखादा सरकारी अधिकारी. जेव्हा जाणूनबुजून मंत्र्याच्या धोरणाविरुद्ध किंवा त्याच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर जाऊन एखादी गोष्ट करतो तेव्हा त्याची जबाबदारी मंत्र्यावर पडत नाही.

जेथे सरकारी नोकरवर्ग आणि जनता यांचा प्रत्यक्ष संबंध येतो तेथे सरकारी

काम शक्यतोवर स्थानिक नियंत्रणाखाली ठेवण्यात येते. उदाहरणार्थ, शिक्षण, घर-बांधणी, नगररचना असले विषय बहुधा स्थानिक अधिकाऱ्यांच्या हातांत असतात.

इंग्लंडात नोकरशाहीला योग्य ते प्रशिक्षण देण्यासाठी, तिच्यात एकोपा निर्माण करण्यासाठी व तिचा सामाजिक दर्जा वाढविण्यासाठी विशेष काळजी घेतली जाते. पगार, सुरक्षितता, निर्णय घेण्याचा अधिकार, पदव्या-पारितोषिके – या सर्व साधनांचा उपयोग करून नोकरशाहीच्या मनात आत्मविश्वास निर्माण केला जातो. एक विशिष्ट दर्जा राखण्याची ईर्ष्या तिच्या मनात उत्पन्न केली जाते, आणि समाजात तिला जरा निराळे असे मानाचे स्थान प्राप्त करून देण्यात येते.

## ☐ जागतिक स्वरूपाच्या सामाजिक समस्या

सामाजिक समस्यांचा विचार केला तर जगातल्या निरनिराळ्या देशांत विलक्षण साम्य आहे; निदान या क्षेत्रात तरी सर्वच देश अजून प्रगतीची वाटचाल करीत आहेत, असे मत आंतरराष्ट्रीय पातळीवर समाजकार्य करणारे एक जर्मन कार्यकर्ते डॉ. हेन्री ऑलेन्डॉर्फ यांनी परवा नव्या दिल्लीत प्रकट केले. डॉ. ऑलेन्डार्फ हे अमेरिकेत स्थायिक झालेले असून ते निरनिराळ्या साठ देशांत सामाजिक कार्यकर्त्यांची देवाण-घेवाण करणाऱ्या 'कौन्सिल फॉर इंटरनॅशनल प्रोग्रॅम फॉर यूथ लीडर्स अँड सोशल वर्कर्स' या संस्थेचे सरचिटणीस आहेत.

त्यांच्या मते सामाजिक समस्यांच्या क्षेत्रात कुठलाही एक देश सुधारलेला किंवा मागासलेला आहे, असे म्हणता येणार नाही. दारिद्र्य आणि लोकसंख्येची वाढ या दोन प्रश्नांच्या खालोखाल सर्वांत महत्त्वाची जागतिक समस्या म्हणजे सर्वसाधारण जनतेचे प्रचंड प्रमाणावर स्थानांतर– खेड्यातून शहराकडे, शेतीकडून उद्योगधंद्याकडे, आणि सुरक्षिततेकडून असुरक्षिततेकडे. ही वाटचाल केवळ भौगोलिक नाही तर तिच्यामुळे सामाजिक प्रश्नही निर्माण झाले आहेत. त्यांतला सर्वांत मूलभूत प्रश्न म्हणजे कुटुंब या मूलगामी सामाजिक संस्थेत झालेला बदल. कुटुंबाच्या रचनेत झालेल्या बदलामुळे असुरक्षितता निर्माण होते– विशेषत:, लहान मुलांत– व त्यामुळे किशोरावस्थेतल्या समस्या व बालगुन्हेगारीचे प्रश्न उद्भवतात. अर्थात् प्रत्येक देशात या प्रश्नावर त्या त्या देशातल्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीची छाप पडते. पण फक्त आर्थिक दारिद्र्यामुळेच मानवी दु:ख निर्माण होते असे समजणे चूक ठरेल. कमी प्रगत देशांत जेवढ्या सामाजिक समस्या आहेत तेवढ्याच समृद्ध व औद्योगिकदृष्ट्या सुधारलेल्या देशांतही आहेत.


●

# सांस्कृतिक एकतेचे शिल्पकार

काश्मीरपासून केरळपर्यंत भारतभर असलेल्या वैचित्र्यपूर्ण वैविध्यातही जी एक सांस्कृतिक एकता आढळते, त्यासाठी आपणा भारतीयांना सर्वांत जास्त ऋण कुणाचे मानावे लागेल तर ते वैदिक धर्माचे आणि वैदिक परंपरेची ध्वजा सतत उंच फडकावीत ठेवणाऱ्या महापुरुषांचे. जेव्हा जेव्हा म्हणून मतमतांतरांच्या कोलाहलात सापडून भारताची सांस्कृतिक, सामाजिक शकले पडायची वेळ आली, तेव्हा तेव्हा वैदिक धर्माने जोरात उचल खाऊन चारी दिशांनी फुटू पाहणाऱ्या भारतीय समाजाला एकत्र सांधले. वैदिक धर्म हा केवळ धर्म नव्हे. भारताचे सांस्कृतिक ऐक्य राखणारी ती एक प्रचंड शक्ती आहे. चाणाक्य–चंद्रगुप्तापासून तो रामदास–शिवाजीपर्यंत वैदिक धर्माभिमान्यांच्या एका अखंड परंपरेने या देशाचे सांस्कृतिक ऐक्य आणि राजकीय आस्तित्व टिकवून धरलेले आहे. आणि आधुनिक भारतातील सांस्कृतिक व राजकीय ऐक्याचे शिल्पकार—विवेकानंद, टिळक, अरविंद, महात्मा गांधी, विनोबा आदींनीही वैदिक परंपरेपासूनच स्फूर्ती घेतली आहे.

या सर्वांत कुणाचे नाव उठून दिसत असेल तर ते आद्य श्री शंकराचार्य यांचे. ख्रिस्तानंतर सहाव्या शतकापर्यंत भारतात माजलेल्या धर्ममतामतांच्या कोलाहलाला रावबून केरळ प्रांतातील या तेजस्वी वैदिक ब्राह्मण संन्याशाने शुद्ध वैदिक धर्माचा शंखनाद अखिल भारतभर घुमविला आणि अखिल भारतभर अपूर्व सांस्कृतिक एकी घडवून आणली. बौद्ध धर्माच्या धर्तीवर पद्धतशीरपणे ठिकठिकाणी वैदिक धर्माचे मठ स्थापून सर्व भारतभर धर्मपालनाला एक सूत्रबद्ध शिस्त लावली. त्या वेळी एकमेकांपासून फुटून निघत असलेल्या सर्व पंथांना एका वैदिक तत्त्वज्ञानाच्या छायेखाली आणले. आद्य श्री शंकराचार्य नसते तर द्वैत, अद्वैत, भागवत, कपिल, जैन, बौद्ध, ऐश्वरकारणिक, कारम्धमित (धातुवादी), लोकायतिक (चार्वाक), काणाद (अणुवादी), सपृतालव, वैयाकरणी पांचरात्रिक, औपनिषद आदी धर्ममतांच्या

# आद्य श्री शंकराचार्य



बेशिस्त कोलाहलामध्ये भारत केव्हाच बुडून गेला असता आणि दुसऱ्या कोठल्याही एखाद्या प्रभावी धर्माने भारताला केव्हाच गिळून टाकले असते. मग आजचा भारत हा भारतच राहिला नसता.

त्या वेळची भारतातील परिस्थितीच तशी होती. मौर्यांच्या काळानंतर भारतात बौद्धधर्माला राजाश्रय प्राप्त झाला. अशोकाने तर स्वतःच बौद्धधर्माचा हिरीरीने प्रचार केला. साऱ्या भारतवर्षभर पांढरी वस्त्रे धारण केलेले डोक्याचे मुंडन केलेले त्याचे भिक्षू आणि भिक्षुणी बौद्धधर्माचा प्रचार करू लागले. आणि हिंदू धर्माला अवकळा आली. वैदिक धर्मांतर्गतच्या सर्व मतप्रणालींना एकत्र खेचून धरू शकणारे सूत्र नव्हते आणि बौद्ध प्रचाराला प्रभावी उत्तर देणारे धार्मिक नेतृत्व नव्हते. त्यामुळे बौद्धांचा प्रभाव वाढत गेला. पण तो काही काळच. आपल्याच जीवन-विन्मुख आणि अव्यवहारी तत्त्वज्ञानामुळे बौद्धधर्माचा नैसर्गिकरीत्या ऱ्हास होऊ लागला होता आणि हे विभिन्न मतांचे पंथ पुन्हा नव्या जोराने डोकी वर काढू लागले होते. सबंध भारतवर्षभर मतस्वातंत्र्याचे स्वच्छंद वारे खेळत होते. परस्परांत संघर्ष होता. निरीश्वरवादी वृत्ती वाढून धातुवादी, अणुवादी, मीमांसक, वैयाकरणी या व अशा अनेक नव्या स्वतंत्र मतप्रणालींची जोरजोराने चर्चा होत होती. त्यांचे अनुयायी वाढत होते. मूळ वेदाभ्यासाकडे आणि ईश्वरपूजेकडे दुर्लक्ष होत होते. या सर्वांना शंकराचार्यांनी आळा घातला. आणि त्यांना अद्वैती वेदान्ताच्या एका सूत्राने बांधून भारतभर सांस्कृतिक व धार्मिक ऐक्याचे अपूर्व वातावरण निर्माण केले.

### तेजस्वी बालब्रह्मचारी

वैदिक अध्ययनाची तेजस्वी परंपरा सतत चालू असलेल्या केरळ राज्यात आद्य शंकराचार्यांचा इसवी सन ७८८ च्या सुमारास जन्म झाला. आपल्या अनुपम

निसर्ग सौन्दर्याबरोबरच विचित्र सामाजिक व्यवस्थेसाठीही केरळ देश ख्यातनाम आहे. तेथील नंबुद्री ब्राह्मण हे अतिशय निष्ठावान, सदाचारसंपन्न, कर्मकांडाचे विशेष प्रेमी म्हणून प्रथमपासून प्रसिद्ध आहेत. मातृप्रधान कुटुंबव्यवस्थेची प्रथा या ब्राह्मणांत अजूनही चालते. नंबुद्री ब्राह्मणांचा ज्येष्ठ पुत्रच फक्त नंबुद्री मुलीशी विवाह करतो. इतर पुत्र नायर मुलींशी विवाह करून नायर जातीत जातात. अशा एका नंबुद्री ब्राह्मणाच्या पोटी त्याच्या उत्तर वयात, आळवाई नदीच्या काठी, कालडी नावाच्या एका रम्य खेडेगावी शंकराचार्यांचा जन्म झाला.

मुलगा अतिशय तेजस्वी होता. तीन वर्षांतच तो आपली मातृभाषा मल्याळम् उत्कृष्ट बोलू लागला. तिसऱ्या वर्षी त्याचा बाप वारला. आणि पाचव्या वर्षी त्याच्या आईने त्याचा उपनयन संस्कार करून गुरुगृही विद्यार्जनासाठी त्याला पाठविले. या प्रतिभासंपन्न मुलाने दोन वर्षांत सकल शास्त्रांचे अध्ययन करून गुरुजनांना चकित केले आणि घरी परतला. घरी तो इतरांकडून वयाच्या सातव्या वर्षापासूनच अध्ययन करवून घेऊ लागला.

आचार्य शंकरांची आपल्या मातेवर अपार भक्ती होती. त्यांच्या मातृभक्तीच्या अनेक कथा आहेत. त्यातलीच ही एक. आई म्हातारी होती म्हणून आळवाई नदीचा प्रवाह घराशेजारी आणायचा आहे. मुलाचे लक्ष अधिक अध्ययनाकडे आणि संन्यास घेण्याकडे होते तर आईला सुनमुख पाहायचे होते. तिचा आग्रह होता. अखेर एका बेसावध क्षणी–मुलगा मगरीच्या दाढेत मृत्यूमुखी जातो आहे, असे पाहून–तिने त्याला संन्यास घेण्याची संमती दिली. मुलगा वाचला पण आईची पडत्या फळाची संमती घेऊन त्याने लगेच वयाच्या आठव्या वर्षी संन्यास घेतला आणि गुरूच्या शोधात भ्रमंतीसाठी तो बाहेर पडला.

त्याच सुमाराला सुप्रसिद्ध मुनी गोविंदाचार्य नर्मदातीरी एका अज्ञात गुहेत घोर तपस्या करीत असल्याचे आचार्य शंकर यांना कळले. आणि त्यांच्याजवळच आपले पुढचे अध्ययन करावे असे ठरवून त्यांच्या शोधार्थ ते उत्तरेच्या दिशेने निघाले. वाटेत त्यांना पूर्वीच्या श्रृंगी ऋषींच्या आश्रमाची जागा लागली. ती प्रसन्न जागा पाहून त्यांना अतिशय समाधान वाटले व श्रद्धा उत्पन्न झाली. पुढे त्यांनी याच जागेवर आपला पहिला श्रृंगेरी मठ स्थापन केला.

### चांडालाला गुरू केले

तेथून श्री शंकर घोर अरण्यातून प्रवास करीत नर्मदातीरी गेले. बराच शोध केल्यानंतर त्यांना ओंकारनाथाजवळील एका गुहेत आपल्या शिष्यगणांसह गोविंदमुनी भेटले. त्यांच्याजवळच त्यांनी तीन वर्षे अद्वैत वेदान्ताची साधना केली. गोविंदमुनींनी आपल्या शिष्याची असामान्य प्रतिभा ओळखली. त्याच्या हातून महान कार्य होणार आहे, हेही ओळखले आणि त्याला अद्वैत वेदान्ताची रहस्ये समजावून सांगितली. श्री व्यासकृत ब्रह्मसूत्राचे विवेचन आपला शिष्यच करू शकेल, हेही त्यांनी

ओळखले आणि तसे त्याला सांगून त्यांनी त्याला विद्याप्रचारासाठी वाराणशीला पाठविले.

वाराणशीला श्री शंकर मनिकर्णिका घाटाजवळ एक झोपडी बांधून राहू लागले. घाटावर ते अद्वैत वेदान्ताचे विद्यादान करू लागले. तेव्हा त्यांचे वय केवळ बारा वर्षांचे होते. हळू हळू शिष्यमंडळी जमू लागली आणि लवकरच या बाल आचार्यांची सर्वत्र ख्याती झाली. दूरदूरहून शिष्य वेदाध्ययनासाठी येऊ लागले. असे सांगतात की, याच सुमाराला आचार्य शंकरांनी एका चांडालाला आपला गुरू केले. आचार्य आपल्या शिष्यगणांसह गंगाकिनारी निघाले असता एक काळाकभिन्न चांडाल त्यांचा रस्ता अडवून उभा राहिला. आचार्य त्याला म्हणाले, "रस्ता सोड. मला तुला स्पर्श करता येणार नाही." त्यावर चांडाल म्हणाला, "अरे, तू अद्वैत मानतोस ना ? मग मी, तू हा भेद कसा ? मी चांडाल असलो म्हणून काय झाले ?" आचार्यांनी लगेच त्या चांडालाच्या पायाला स्पर्श करून गुरू मानले. तेव्हा तो चांडाल म्हणाला, "वेदान्ताचे मुख्य तात्पर्य अद्वैत ब्रह्म आहे. त्याचा तू सर्वत्र प्रचार कर." तद्नंतर तो चांडाल एकाएकी नाहीसा झाला. तो प्रत्यक्ष भगवान विश्वनाथ होता.

दंतकथेतील चमत्काराचा भाग जरी सोडला तरी आचार्यांनी अस्पृश्याला गुरू मानले ही गोष्ट महत्त्वाची आहे. दुर्दैवाने त्यांच्या शिकवणीत पुढे याचे प्रतिबिंब पडलेले दिसत नाही.

या प्रसंगापासून स्फूर्ती घेऊन आचार्य शंकर अद्वैत ब्रह्माच्या प्रचारासाठी उत्तर भारताच्या यात्रेला निघाले. हरिद्वार, हृषिकेशच्या मार्गाने ते बद्रिकेदारला गेले. वाटेत अनेक लोकांच्या गाठी भेटी घेत, पंडितांशी चर्चा करीत अद्वैत ब्रह्माचे तत्त्वज्ञान सांगत, धर्मप्रचार करीत ते जात होते. अनेक ठिकाणच्या आदिवासी जमातींना त्यांनी आपल्या शिकवणीने सुसंस्कृत केले. त्यांच्यांतील नरबलीसारख्या व इतर घोर तांत्रिक प्रथा बंद केल्या. बद्रीनारायणाची विष्णूची मूर्ती त्यांनी स्वत: स्थापन केली. तेथील ब्राह्मण सुशिक्षित नव्हते आणि त्यांची कर्मकांडाची माहिती पुरेशी नव्हती म्हणून त्यांनी केरळातील सजातीय नंबुद्री ब्राह्मणांना बद्रीनारायणाच्या पूजेसाठी बोलावून घेतले. अजूनही बद्रीनारायणाची पूजा हे केरळीय नंबुद्री ब्राह्मणच करतात.

श्री शंकराचार्यांनी बदरीकेदारच्याही पुढे हिमालयात जाऊन ज्योतिर्मठाची स्थापना केली. त्याला सध्या जोशी मठ म्हणतात. तोटकाचार्य नामक आपल्या एका शिष्याला त्यांनी या मठाचे अध्यक्ष नेमले. जोशी मठाच्याच जवळ श्री व्यास ऋषींचा आश्रम आहे. त्याच आश्रमात राहून शंकराचार्यांनी व्यासांच्याच ब्रह्मसूत्रावर, भगवद्गीतेवर आणि प्रमुख उपनिषदांवर अभ्यासपूर्ण भाष्ये लिहिली. ही भाष्ये शंकराचार्यांच्या लिखाणापकी अत्यंत महत्त्वाची मानली जातात. भाष्य लिहून पूर्ण झाली तेव्हा त्यांचे वय १६ वर्षांचे होते.

व्यासाश्रमातून शंकराचार्य पुन्हा भ्रमंतीसाठी बाहेर पडले. धर्मप्रचाराचे आणि समाजधारणेचे आपले कार्य पार पाडीत केदारनाथ आणि उत्तर काशीचा त्यांनी प्रवास केला. तेथे त्यांना पंडित कुमारिल भट्टांची कीर्ती कळली आणि त्याच्या पांडित्याचा आपल्या अद्वैत ब्रह्मप्रचाराला लाभ करून घ्यावा म्हणून त्याला भेटण्यासाठी म्हणून ते प्रयागच्या दिशेने निघाले.

## कुमारिल भट्ट आणि मंडणमिश्र

कुमारिल भट्ट हे त्या वेळच्या नामवंतांमध्ये अत्यंत प्रगाढ पंडित म्हणून प्रसिद्ध होते. बौद्ध धर्माचे त्यांना फार आकर्षण होते म्हणून त्यांनी बौद्ध धर्माचा गाढा अभ्यास केला. त्यासाठी त्यांनी स्वतः दीक्षा घेऊन ते बौद्ध भिक्षू बनले. अध्ययन केले आणि बौद्ध धर्माची रहस्ये जाणून घेऊन वैदिक धर्माची महती पटून ते पुन्हा वैदिक धर्मात आले. आणि वैदिक धर्मावर त्यांची गाढ निष्ठा बसली. बौद्ध धर्माचा तेव्हा अद्याप प्रभाव होता. जिकडे तिकडे जैन, बौद्ध आणि इतर अवैदिक पंथांची वाढ होत होती आणि वैदिक धर्माचा, वैदिक परंपरांचा ऱ्हास होऊ लागला होता. त्यामुळे त्यांचे चित्त विषण्ण होत होते. वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन करावे, असे त्यांना वाटू लागले. कर्नाटकातून ते प्रवास करीत असता एका राजवाड्याच्या खिडकीतून एका स्त्रीचे करुण उद्‌गार त्यांच्या कानी पडले.

**किं करोमि क्व गच्छामि को वेदान् उद्धरिष्यति ।**

ती सुधन्वा नामक जैन राजाची वेदप्रेमी राणी होती. स्वतःशीच म्हणत होती– "काय करू मी, कुठे जाऊ? आता वेदांचा उद्धार कोण करणार?" ती हाक कानी पडताच कुमारिल भट्ट तत्काळ उत्तरले.

**मा विषीद वरारोहे भट्टाचार्योस्मि भूतले ।**

(हे महाराणी, मी भट्टाचार्य जिवंत आहे. तू विशाद करू नकोस,)

तेव्हापासून कुमारिल भट्टांनी मोठ्या हिरीरीने वैदिक धर्माचा प्रचार सुरू केला. बौद्ध आणि जैन धर्मांच्या तत्त्वज्ञानावर त्यांनी कडाडून हल्ले चढविले. त्यांच्या वेदांवरील आरोपांना भक्कम उत्तरे देऊन वैदिक कर्मकांडाचे त्यांनी समर्थन (मंडन) केले. शबर स्वामीच्या मीमांसाभाष्यावर त्यांनी टीका लिहिली. ते स्वतः भाषाप्रभू होते. पालीसह अनेक भाषा त्यांना येत.

अशा या महान पंडिताचा आपल्या या अद्वैत प्रचाराच्या कार्याला पाठिंबा मिळविण्यासाठी श्री शंकराचार्य प्रयागला गेले. प्रयागला पोचले तो कुमारिल भट्ट चिता रचून अग्निप्रवेश करीत होते. शंकराचार्यांनी अग्निप्रवेशाचे कारण विचारले तेव्हा भट्टाचार्य म्हणाले, "पापशुद्धीसाठी मी हा देहत्याग करतो आहे. पहिले पाप म्हणजे मी माझ्या बौद्ध गुरूंच्या आरोपांचे खंडन करून त्यांचा जाहीर तिरस्कार केला. आणि दुसरे पाप मी निरीश्वरवादी होतो. ईश्वरी अस्तित्वाचे मी खंडन केले. कर्माची प्रधानता सिद्ध करण्यासाठी म्हणून मी मुद्दाम ईश्वरी अस्ति-

त्याचेच खंडन केले तरी माझी स्वतःची ईश्वरावर श्रद्धा आहे. म्हणून मी हे प्रायश्चित्त घेत आहे."

शंकराचार्यांनी कुमारिल भट्टांची खूप समजूत घातली. "आपल्या सहकार्याने अद्वैत वैजयंती अखिल विश्वात पसरवू," अशी त्यांना गळ घातली. पण भट्टाचार्यांचा निश्चय कायम होता. ते म्हणाले, "नको, माझ्या पापांचे क्षालन होऊ दे." माझा पट्टशिष्य मंडणमिश्र आहे. त्याला तुझी बाजू पटवून देऊन त्याची तुझ्या कार्यात मदत घे. उपयोग होईल."

अखेर शंकराचार्य मंडणमिश्रांना भेटण्यासाठी निघाले. मंडणमिश्र हे अद्वैताचे कट्टर विरोधक होते. ते प्रकांड पंडित आणि अजय वादपटू होते. त्यांच्या पांडित्याला देशात सर्वोच्च मान होता. त्यांची पत्नी भारती ही महान विदुषी होती. नर्मदातीरी महिष्मती नगरी पाणवठ्यावर आलेल्या स्त्रियांना शंकराचार्य मंडणमिश्रांच्या घराचा पत्ता विचारू लागले तेव्हा त्यांनी थट्टेने शंकराचार्यांना सांगितले, "ज्या घराच्या पडवीत पिंजऱ्यातील पोपट आणि मैना आपापसात जोरजोराने 'हे जगत नित्य की अनित्य, सत्य की मिथ्या' यांसारख्या विषयांवर गूढ चर्चा करीत असतील तेच ते घर समजा."

शंकराचार्य आणि मंडणमिश्र यांचा वाद दुसरे दिवशी सकाळी ठरला. नगरीतील आणि आसपासची समस्त पंडितमंडळी हा अपूर्व वाद ऐकण्यासाठी जमली. वादात मध्यस्थ म्हणून मंडणमिश्रांची पत्नी भारती हिलाच नेमले. सर्वांसमक्ष 'ब्रह्मैकं परमार्थ सच्चिदमलं विश्वप्रपंचात्मना' अशी अद्वैताची भूमिका मांडून वादात हरलो तर संन्याशाची वस्त्रे फेकून गृहस्थाश्रम स्वीकारीन अशी शंकराचार्यांनी प्रतिज्ञा केली. त्यावर मंडणमिश्रानेही आपण वादात हरलो तर संन्यास पत्करू अशी प्रतिज्ञा केली. अनेक दिवसरात्र हा वाद अखंड चालला आणि शेवटी त्यांत मंडणमिश्र पराभूत झाले. शंकराचार्यांचे पांडित्य आता सर्वमान्य झाले. मंडणमिश्रांच्या पत्नीने अत्यंत निःपक्षपातीपणे हा वाद चालविला.

पुढची दंतकथा आहे की आपला पती पराभूत झाल्याचे पाहून भारतीने शंकराचार्यांना आव्हान दिले, 'हे विद्वत् माझ्याशी वाद करा' शंकराचार्य म्हणाले, 'यशस्वी पुरुष स्त्रियांशी वाद करीत नाहीत.' पण शेवटी आणि आग्रहाने तयार झाले. भारतीने कामशास्त्रातील अनेक कूट प्रश्न विचारून त्यांना अत्यंत पेचात टाकले. तेव्हा त्यांनी एका राजाच्या कायेत प्रवेश करून अनुभव घेतला आणि नंतर भारतीचा पराजय केला.

मंडणमिश्रांचा पराभव केल्यानंतर शंकराचार्य मंडणमिश्रांसह दिग्विजयासाठी निघाले. उत्तर भारत त्यांनी पादाक्रांत केला होताच. तेथून श्री शैल, गोकर्ण हरिहरेश्वरमार्गे म्हैसूर राज्यात शृंगेरीला त्यांनी मठ स्थापन केला. शारदेची मूर्ती

[ पृष्ठ ६३ वर चालू ]

## उजाडेपर्यंत

उजेड तंद्रीचा वैरी असतो...
घनदाट अंधारात
स्वतःचा स्वतःला पत्ता लागत नाही
स्वतःला अमुक असे नांवही नसते,
धंदाही नसतो, शर्टाची कॉलर फाटलेली,
वहाण तुटलेली नसते
जिवाला कसलाही घोर नसतो.
मिट्ट काळोख. खिडकीच्या तावदानावर आदळणारा
सुसाट वारा, धुव्वाधार पाऊस...
ऊबदार पांघरुणात डोळे मिटून
अशावेळी मी सुखात असतो
खिडकीच्या फटीतून, कौलारातून
काळोख पुसट होईपर्यंत
उजाडेपर्यंत !

*– शरद साटम*

## आठवण

अगा ज्ञानेश्वरा
मिळाला प्रसाद
कसली ही साद घातलीसे !
हरवलो सारे
मिळविण्याआधी
कसली ही व्याधी लावलीसे !
व्याधीचेच आता
होऊ दे जीवन
तुझी आठवण केवळ ही !

*– शरद वाघ*

## तहान....

नव्हती फुसलावत ती मला
ओला शृंगार ल्यालेली पाकळी;
तहान फुटली नव्हती त्याही –
रेशमी तीराशी...
सप्त-रंग किनारले होते ! तेहि कारण
असू शकत नाही मी भाळल्याचे !
– मात्र पुरता खोवलो होतो.
माझ्या खोवण्यातहि लय होती...एक मनिषा होती,
मी वाट पाहात होतो संधिची...क्षणाची –
कधी फुलतो चंद्राचा डोळा
अन् मी टिपतो...त्या सुवर्ण– मुलाम्यावरील
थुईथुई चांदण्याचे थेंब !

*– आत्माराम भोयर*

## एकान्त

ही सर्द हवा
हा झुळझुळता
एकान्त,
गूढतेत
गुरफटले हे
जग शान्त,
निद्रेवरती
स्वप्नांची
नक्षी येथे,
तळमळती रात्र
चिंब उशी
ऊन कोठे.

*– विजय टाकोडे*

# आस्वाद

नुकतीच ज्ञानेश्वरी.-पुण्यतिथी होऊन गेली आहे. अशा वेळी शरद् वाघ यांची 'आठवण' उचित वाटावी. हृदयाला अस्वस्थ करते ते खरे वाङमय. ज्ञानेश्वरीचा प्रसाद या कवीला याच दृष्टीने मिळाला काय ? कारण आता व्याधी हेच जीवन कवीला वाटत आहे. पण जो दर्द देतो तोच कित्येकदा दवाही देतो. ज्ञानेश्वरांच्या 'आठवणीने' व्याधी निवळेलही.

'तहान' ही एक वृत्ती आहे. ही कशाने लागते हे पुष्कळदा कळत नाही. आत्माराम मोयर यांना ही कल्पना आली आहे. कारण आपण पूर्ण गुंतलो होतो एवढेच ते सांगतात. प्रेमिक आपल्या प्रणयाचे साफल्य केव्हा होईल याची वाट पाहत बसतात. चंद्र उगवेल केव्हा असे त्यांना होऊन जाते. संकेताचे स्थळ जवळ असले तरी वातावरण पाहिजे ना ? ते अनुकूल असेल तरच अपेक्षेची पूर्तता होणार. शेवटच्या ओळीत 'थुई थुई' चांदणे असे म्हटले आहे. क्रियाविशेषण विशेषणासारखे वापरण्याची नजरचूक जरा खटकते इतकेच.

अंतरात उजेड पडायचा असेल तर बाहेरचा प्रकाश बंद झाला पाहिजे. अंधार हा अंतर्मुख होण्यास फार अवश्य आहे. चर्मचक्षू मिटले की अंतःचक्षू उघडतात. हाच अनुभव शरद साटम यांनी 'उजाडेपर्यंत' या कवनात रंगविला आहे. समाजात फिरताना मनुष्य हा आपल्या कपड्याबद्दल किंवा बाह्य आकाराबद्दल विशेष आस्थेवाईक असतो, पण एकांताचे वैभव असे आहे की कपड्यालत्त्याची फिकीर त्याला वाटत नाही. याच वेळी आपले खरे सत्त्व प्रकट होते. साटम यांना एकान्ताची ही आध्यात्मिक थोरवी तर वर्णन करावयाची नाही ना ? त्यांच्या कवितेत अंधाराचा गौरव आहे तो बाहेरच्या, आतल्या नव्हे. एक नेहमीचा गोड अनुभव म्हणूनही ही 'बरसातकी रात' हृद्या वाटावी.

असेच काहीसे विजय टाकोडे अधिक सूक्ष्मतेने रंगवितात. 'उजाडेपर्यंत' या कवितेत अगदीच स्पष्ट केलेले अंतर्विश्व 'एकान्ता 'त जरा ध्वनीने रेखाटले आहे. यात झुळझुळणे किंवा तळमळणे हे निसर्गावर आरोपीत केले आहे. मनुष्य बरेच वेळा आत्मनिष्ठ दृष्टीनेच निसर्गाकडे पाहत असतो. आपणाला जे वाटते ते पानाफुलांना, ढगांना किंवा दिवसरात्रीला वाटत असावे अशा गोड भ्रमात तो असतो. याच सुखद संभ्रमाचे रेखांकन या कवितेत अगदी सूक्ष्मपणे केले आहे. हे एक टपोरे मौक्तिक आहे.

**– गोपीनाथ तळवलकर**

आजही चांदणं पसरलं आहे.
पण विरहाच्या जाणिवेने मन विषण्ण झालं आहे,
कारण....कारण, पुढच्या चतुर्थीला मी नसेन.
हा चंद्र असाच उगवेल. पण....पण....

भल्यामोठ्या वडाच्या झाडांमधून झिरपणारे मावळत्या सूर्याचे सोनेरी किरण अंगावर येत होते. मी चंदनाच्या झाडाला टेकून तल्लीनतेने संधिप्रकाशाची शोभा पाहत होते. बघता बघता ती लालपिवळ्या रंगाची उधळण काळोखाच्या कुशीत शिरली. या काळ्या-सावळ्या झाडाखाली बसलं, की मला वेळेचं भानच राहत नाही. आज नव्हे, नेहमीच असं होतं. मी आपली वेड्यापिशासारखी तासन्-तास इथं खिळून बसते.

निसर्गाचं हे क्षणोक्षणी बदलणारं मनोहर रूप मला अतिशय मोह पाडतं. लंकेच्या पार्वतीचं रूप धारण करणारं मघाचंच ते आकाश चांदण्यांनी कसं लखलखतं आहे. समोरची शुक्राची चांदणी पाहिली की, मला आजीच्या ओव्यांतली नवरी मुलगी आठवते. किती हुबेहूब वर्णन आहे ते ! अन् त्या मंगळाचा लालसर प्रकाश सशाच्या डोळ्यासारखा लुकलुक करतो आहे, असं मनात येतं. हा पलीकडचा शनी आहे ना, अगदी तशीच निळसर झाक असलेल्या इंद्रनील मण्यासारखे माझ्या एका मैत्रिणीचे डोळे होते. आज ती कुठे असेल कोण जाणे !

व्याधाची चांदणी, सप्तर्षी, अरुंधती...आकाशाच्या निळ्या सागरात तरंगणारी ही अगणित फुलं–छे ! कुणाकडे पाहू नि कुणाचं कौतुक करू, असं होऊन जातं मला!

या चांदण्यांचं फार मोठं ऋण आहे माझ्यावर. कारण, त्यांच्या सहवासामुळंच 'निर्मलच्या' आमच्या घरात मी 'माणूस' म्हणून राहू शकले. 'घर' म्हणण्या-इतकाही घरपणा नव्हता तिथे. भिंतींना भगदाडं पडली होती, तर छपरातून चंद्र-सूर्य आळीपाळीने डोकावून पाहत असत. पावसाळ्यात शतधारांनी अंग भिजायचं–अगदी घरातल्या घरात !

दिवसा संगत माकडांची अन् रात्री राखण भुतांची. असल्या ओसाड भिंतींच्या आसऱ्याला चिमुकल्या विदुलेला घेऊन एकटीनं राहायचं धाडस मला करवलं ते या चांदण्यांच्या स्नेहमय दर्शनामुळेच !

इथे या बंगल्यात–बंगल्यात म्हणण्यापेक्षा त्याच्या भोवतीच्या वातावरणाने मी रमून गेले आहे. ही बुचाची उंचच उंच झाडं काळोखात मख्खपणानें उभी राहिल्या-सारखी दिसताहेत ना ? पण हीच झाडं पावसाळ्यात लांब देठाच्या पांढऱ्या फुलांनी

# निरोप

## सौ. मृणालिनी जोशी

फुलल्यावर इतकी शोभिवन्त दिसतात की, ते त्यांचं वैभव-स्तिमित होऊन पाहतच राहावं माणसानं !

ह्या उजव्या हातचा शिरिषवृक्ष पाहिलात, त्याच्या अंगावरची गुलाबी केसरांची नाजूक फुलं मला अतिशय आवडतात. पण त्यांची कोमलता पाहिली की वाटत, ही फुलं या राकट वृक्षाला मुळीच शोभत नाहीत. खरं म्हणजे असली नाजुक फुलं एखाद्या वेलीला यायला हवी होती. कृष्णकमळाहून लहान, मंदमधुर सुगंधाची शिरिषाची फुलं त्याच्यापासून दूर करण्यात मात्र अर्थ नाही. पारिजातकाहूनही कोमल मनाची आहेत ती–हात लागला की झालाच चोळामोळा ! आमच्या एवढ्या मोठ्या बंगल्यावर छत्रचामरं ढाळणारा हा शिरिषवृक्ष, त्याच्या आडव्या अंगाकडे पाहून त्याला मिस्किलपणाने हसणारी शेलाटी बुचाची झाडं, पलीकडचा स्थित-प्रज्ञासारखा उभा असलेला आम्रवृक्ष, इतकंच नव्हे तर पुष्करिणीशेजारी उभी असलेली खरखरीत अंगाची पण मोत्यांचं हास्य फुलवणारी लालचुटुक ओठांची प्राजक्ती, कृष्णवर्णाच्या चंदनाला बिलगलेली गोरीपान जाई, तिच्याकडे वत्सलतेने पाहणारी सावळी बकुळी, बागेच्या किनाऱ्याकिनाऱ्याने बहरलेली लाडिक मोगरी नि तो मान उंचावून टिवल्याबावल्या करणारा निशिगंध,–यांच्यापैकी कुणी ना कुणी रोज आपला सुगंधी–नजराणा घेऊन माझ्यापुढे उभं राहतं. आणि त्या मधुर धुंद परिमलानं गंधवेडी कविप्रिया पार हरवून जाते.

पहाटे मी जागी होते, ती 'कुहू ऽ कुहू' म्हणून आर्तरवाने गाणाऱ्या कोकिळ पक्ष्याच्या आवाजाने. पण मी लगेच उठत नाही. उलट फुलांचा दरवळ अन्तःकरणात भरभरून घेत सुखावून मिटल्या डोळ्यांनी तशीच पडून राहते. गुलाब, मोगरा, जाईजुई, प्राजक्ती, पांढरा चाफा यांच्या संमिश्र सुगंधातून प्रत्येकाचा वेगळा गंध ओळखीत मी धुंदपणाने त्याचा आस्वाद घेते.

खरंच या पानाफुलांचा, झाडामाडांचा नि चंद्रताऱ्यांचा सहवास मला इतका प्रिय का असावा हेच कळत नाही.

ही जागा माझं विसाव्याचं आवडतं ठिकाण आहे. माणसांच्या व्यवहारी जगात कधी अवमानाचे शब्द कानांवर येतात. जुन्या जखमांची अचानकपणाने खपली

काढली जाते तर कधी अपेक्षाभंगाचं दुःख मनाला पोखरीत जातं. अशा वेळी पदरात निराशा बांधून मी इथे येते. माझ्या मनचं शल्य या माझ्या जिवाभावाच्या सख्यासोबतिणी हळुवारपणाने ऐकून घेतात. आणि हसून माझं सांत्वन करीत म्हणतात, "हत् वेडे...एवढ्यासाठी का डोळे भरून आले ?...... आपण आपलं आपल्याला योग्य वाटेल ते करीत राहावं. जग काही का म्हणेना !–आणि तुला खरं सांगू ?–या जगाला स्वतःचं असं काहीच मत नसतं. आज तुला नावं ठेवणारी हीच दुनिया कदाचित् तुझ्या नावाचा उदो उदो करील..."

एवढा दिलासा मिळाल्यावर मीही मग डोळे पुसून माझ्या मनाची कवाडं माबड्यासारखी भरामर उघडून टाकते आणि माझ्या स्वप्नाळू मनोराज्यात चराचराला सामील करून घेते.

आमच्याकडे येणारी माणसं मला विचारतात,

"अशा या एकाकी जागेत तुम्हांला कंटाळा येत असेल नाही, मीनाताई ! – "

"पण खरं सांगू ? – मला कंटाळा येतो तो माणसांत मिसळण्याचा ! खोटं, लटकं हसत हलक्या आवाजात मनात नसलेली आपुलकी दाखविण्याचा प्रयत्न करण्याचा. मानभावी शब्दांची पखरण करीत बेगडी मुखवटा चढवून वागण्याचा. शिष्टाचारसंपन्न पॉलिश मॅनर्सच्या समाजात मी अगदीच अडाणी दिसते तो यामुळेच. मला ते जमतच नाही. त्या कोंदट वातावरणात माझा जीव गलबलून जातो.

"पाहिलंत ? – किती वेळ बसले आहे ती. चतुर्थीचा चंद्र पूर्वेच्या माळरानावर उगवलासुद्धा. चतुर्थीचा चंद्र पौर्णिमेच्या चंद्राहून थोडा लहान असतो. जरासा नकटाच म्हणाना–

"त्याच्या स्पर्शाने सगळा नूरच पालटला आसमंताचा. झाडामाडांना निराळा साज चढला."

"हं ऽ...आता मला उठून ओवाळायला हवं. उपास सुटायचा आहे चतुर्थीचा."

मी घरात गेले. देवापाशी निरांजनं लावली. गणपतीला नैवेद्य दाखवला आणि आरतीचं तबक घेऊन मागच्या अंगणात गेले. मुद्दाम हौसेने करून घेतलेली सांबाची पिंडी नि तुळशीवृंदावन चांदण्यात न्हाउन निघालं होतं. त्याच्या शेजारी असलेलं रानमेंडीचं झाड, अशोक आणि बदकाचं झाड (हे मी ठेवलेलं नाव आहे. कारण मला त्याचं मूळचं नाव माहीत नाही. त्याला बदकाच्या आकाराची फुलं येतात म्हणून त्याचं नाव 'बदकाचं झाड' असं ठेवलं.) ही तिन्ही झाडं एकमेकांत इतकी मिसळून गेली आहेत की, वर शोभणारी लालबुंद फुलं कुठल्या बुंध्याची आहेत, हे काही पटकन् ओळखता येत नाही. त्या गर्द झाडीतून खाली निथळलेलं चांदणं रुपेरी रांगोळचा घालाव्यातना तसं दिसतंय...याचं वृक्षाच्या बुंध्याला टेकून मी जपाला बसत असे. पण एक दिवस त्याच्या पोखरलेल्या पोकळीतून साप निघाला. आणि मग त्या दिवसापासून माझं मन शंकराच्या जपाऐवजी नीलकंठाच्या त्या कंठभूषणाचंच चिंतन अधिक करू



लागलं. मी नाइलाजानं ती जागा बदलली.

सावरीच्या झाडावरची कापसाची अर्धवट फुटलेली बोण्डं किती मजेदार दिसताहेत ! दिवसा पांढराशुभ्र दिसणारा मउमऊ रेशमी कापूस चंद्रप्रकाशात पाझरणाऱ्या खडीसाखरेसारखा चमचम करतो आहे. पण या फुटलेल्या झुंबरासारख्या दिसणाऱ्या कापसापेक्षासुद्धा माघाच्या महिन्यात लाल फुलांनी डवरून गेलेली सावरी मला फार आवडते. कित्येकदा वाटतं की निसर्गाच्या सौंदर्याचं नि विविधतेचं वर्णन करायला माणसाच्या भाषेतले शब्द अपुरे पडतात ! पळसाची फुलं लम्ल केशरीच असतात. वईला लावलेला पांगारा नटतो तो लाल फुलांनीच. जास्वंदीचा बहर लालबुंदच. कमानीजवळच्या गुलमोहोराचा माथासुद्धा रक्तवर्ण फुलांनी शोभिवंत झालेला. गुलबाक्षीच्या केसांत माळलेली फुलं लाल गुलाबीच...पण या प्रत्येकाच्या लालपणात निराळेपण आहे. वेगळ्या वेगळ्या छटा आहेत. अलग अलग भाव आहेत !

विधात्याने रचलेल्या या मनोरम काव्याचं सौंदर्य शब्दांच्या मखरात बसवणं अगदी अशक्य वाटतं मला ! –

गुलमोहोराला या दिवसांत काय बहर येतो म्हणून सांगू ? – आमच्या गावात जाण्याच्या वाटेवर एक झाड आहे. एक का त्या बंगल्याभोवती गुलमोहोराचंच रिंगण आहे. पण त्या सगळ्यांत तो एक वृक्ष फार उठून दिसतो. मी क्षण–दोन क्षण

स्मित नजरेने त्याच्या केशरी वैभवाकडे पाहिल्याशिवाय पुढे जात नाही. मला हसाल तुम्ही पण वाटत की याच्या देखणेपणाला कुणा विघ्नसंतोष्याची नजर लागेल! याच्या एखाद्या फांदीला काळी बाहुली लावावी ! –

मला हे निसर्गाचं वेड अगदी लहानपणापासून आहे !...बालवयात समुद्राच्या वाळूत बसून किल्ले बांधण्यात मी घटकान् घटका घालवल्या आहेत, तर कधी तांदुळमणी वेचता वेचता काळोख पडला की घाबरून पळत घर गाठलं आहे. समोरच्या अथांग सागराकडे पाहिलं की, मन अनिर्वचनीय भावनांनी भरून यायचं. ी ओढ...निसर्गाची ही ओढ का मला लागली आहे.

माणसाला माणसाची ओढ लागते त्यात नकळत का होईना स्वार्थ निश्चित असतो. एखाद्या साधू-संन्याशाला आदरभावानं नमस्कार करण्यातही या पुण्यपुरुषाच्या दर्शनाने माझे कल्याण व्हावे, मनाला शांती लाभावी, मोक्षाला जाणाऱ्या जवळच्या पाऊलवाटेनं आपल्याला जाता यावं हा स्वार्थ असतोच. पण ही समुद्राची ओढ अकारणच नव्हे का ? चुळकाभर गोड पाणीसुद्धा देत नाही तो ! –

धीरगंभीर सागराची लहानपणी स्मृती घोळवीत मी प्रथम मुंबईला गेले तेव्हा मोठ्या आशेने चौपाटीवर गेले. पण...केविलवाणा दिसणारा माणसाळलेला समुद्र पाहून वाटलं, उगीच आले मी इथे !

काळोख्या रात्री अचानक वाघाची डरकाळी ऐकावी, भीतीने गारठून दुरून त्याच्याकडे पाहावं नि त्याच अंधुक आकृतीचं दर्शन घडेल या आशेनं वाघाचं ओरडणं ऐकून सर्कशीच्या आवारात पाऊल टाकावं तर समोर रिंगमास्टरच्या हुकमाप्रमाणे उठाबशा काढणारा वाघ दिसावा, तसंच काही मला वाटलं !...

आज इथे तो समुद्र नाही तरी हा एकांत आहे !...

या एकान्तात मी कल्पनेचे मनोरे अजूनही त्याच अल्लडपणाने अन् तितक्याच नादिष्टपणाने बांधते आहे. चांदण्याच्या हातांनी मधुर स्वप्न रंगवते आहे. नाजूक फुलांच्या ओठांनी प्रीतीचं गाणं गुणगुणते आहे, तर कौमुदीच्या कोमलपणाने चराचराला मिठीत घेऊन सुखावले आहे !

आणि वास्तवाच्या कठोर धक्क्याने स्वप्नांचा चुराडा झाला की, त्याच हळवेपणाने डोळे पुसते आहे ! ...

आजही मला मोहविणारं चांदणं पसरलं आहे. पण त्या शिडकाव्याने मला नेहमीसारखा आनंद होत नाही. उलट विरहाच्या जाणिवेने मन विपण्ण झालं आहे. वाटतं, संपलं आता हे सुख !....

कारण . . . कारण, पुढच्या चतुर्थीला मी इथे नसेन ! –

हा चंद्र असाच उगवेल. पण मला त्याचं दर्शन घडणार नाही. चंद्रोदयाची वेळ घड्याळात पाहून पूर्वेच्या बाजूने चार अक्षता टाकून मी पानावर बसेन.

पाणावलेल्या गोळ्यांनी मी चंद्राला ओवाळलं. आणि–

तिथेंच पायरीवर बसले. निसर्गाचा विरह नुसत्या कल्पनेतही दुःसह वाटला.

पण . . . पण मला जायलाच हवं. कुठे माहीत् आहे ?

जिथे घड्याळांच्या काट्यावर चालणारं यंत्र बनलेल्या माणसाला या चंद्रसूर्या-कडे पाहायला वेळही मिळत नाही.

विचारे चंद्रसूर्य !

मुकाट्याने उगवतात नि चोरपावलाने क्षितिजाच्या कुशीत विसावतात !

जिथे कोकिळ नाही, जिथे शिरिषाचा सुगंध नाही. काही नाही ! —

मला जाग येईल ती वर्तमानपत्रवाले नि दूधवाले यांच्या आरोळीने ! — रिक्षा स्टँडवरच्या रिक्षांच्या खरखराटाने ! — गंध असेल केवळ धुराचा.

जिथे ना चंद्र ना सूर्य — ना चांदणं ना तारे — नुसत्या उभ्या आडव्या वस्तू — व्यवस्थित पोपाख केलेली कडक इस्त्रीची यांत्रिक माणसंच माणसं—त्यांना रेटीत चालणारी अगणित वाहनं अन् या सर्वांच्या भाराखाली दबणारे काळेकभिन्न लांबच लांब डांबरी रस्ते—

छे — आगदी उबग येतो मला या निर्जीव वातावरणाचा !

खरंच सांगते, या फुलांना सोडून जायचं माझ्या अगदी जिवावर आलंय. त्यांना


"डायमंड"

टॅक्सी व रिक्षा मीटर्स

भारतात सर्वप्रथम

डायमंड क्लॉक मॅन्यु. कं. प्रा. लि.,
११८० बुधवार पेठ, पुणे २.

डायमंड वॉच कंपनी

११७९ बुधवार पेठ, पुणे २.

महाराष्ट्रातील ख्यातनाम घड्याळजी. सर्व प्रकारचा घड्याळे व इन्स्ट्रुमेंटस् चोख दुरुस्त केली जातात.

कदाचित् त्याचं काहीच वाटत नसेल. फुलांना नुसतं फुलायचं माहीत !

निसर्गाला स्वतःचं मन, भावभावना असतात की नाही कोण जाणे ! नसतात म्हणाल तर मला त्याच्याविषयी इतकी आत्मीयता का वाटावी ? की, माणूस आपल्या मनातल्या भावनाच निसर्गावर लादीत असतो ?

जीवनदायी सरिता एखादे वेळी प्राणनाशिनी विध्वंसिनी बनली की वाटतं, निसर्ग कसा आहे ? दुष्ट की प्रेमळ ? न्यायी की अन्यायी ? की तो भावनाशून्य यंत्र आहे ? अन् एखाद्या कळसूत्री बाहुलीसारखा नियतीच्या तालावर नाचतो आहे ? . . .

खरं काय आहे देव जाणे ! एवढं मात्र सांगता येईल, की तो जसा आहे तसाच मला अत्यन्त प्रिय आहे.

वास्तविक प्रत्येक ठिकाणी पाय ठेवल्यापासून हे माहीत असतं की, आपल्याला इथून जायचं आहे. इथल्या चराचराचा सहवास क्षणभंगुर आहे. म्हणून मन गुंतवून ठेवता कामा नये. अलिप्ततेने वागायला हवं. पण ही सुरुवातीची जाणीव पुढे नकळत नाहीशी होते. आणि हे माझं खुळं मन तिथल्या कणाकणांशी एकरूप होतं ! जीवनाच्या वाटचालीत सहज योगायोगाने भेटलेले हे क्षणभराचे सहप्रवासी आहोत याची जाणीवच नष्ट होऊन असं वाटू लागतं की, आपण युगायुगाचे सांगाती आहेत. अनन्त जन्मांचा आपला स्नेह आहे. यांच्या सोबतीवाचून आपल्याला पुढे चालवणारच नाही ! . . .

पण... पण असा एक क्षण येतो, की हे स्नेहाचे स्निग्ध रेशमी पाश तोडून, हातातला हात कठोरपणाने काढून घेऊन, ओघळणारी आसवं पुशीत वेगळयाच वाटेनं पाऊल टाकावं लागतं ! विरहानं काळीज कासावीस होतं ........

मनात येतं, नुसतं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जायचं तर आपल्याला इतकं दुःख होतं. मग जेव्हा हा सगळा मायेचा पसारा इथल्या इथेच टाकून, अगदी ज्या देहाचा आपल्याला इतका लोभ, त्या देहालाही एखाद्या मोडक्या खेळण्यासारखं फेकून निघून जायची वेळ येईल तेव्हा किती यातना होतील जिवाला ?–

दुसरं मन म्हणतं, कदाचित् काहीही वाटणार नाही. कारण एकाच आयुष्यात दर दोन-तीन वर्षांनी वाट्याला येणारं हे जन्ममृत्यूचं आवर्तन अनुभवल्याने, या रंगीत तालमीमुळे अखेरच्या प्रयोगाच्या वेळी मला कसलाच त्रास होणार नाही.

अन् त्या विश्वकवीच्या विराट व्यक्तिमत्त्वात विलीन होण्यासाठी मी अधीरपणाने त्याच्या कवेत झेप घेईन !.... आणि मग बघता बघता !

या समोरच्या सावरीच्या कापसासारखी हलकी फुलकी होत त्यांच्या आनंदमय स्वरूपात ही ' मी ' पणाची जाणीव पार विरघळून जाईल ! धूसरतेत विरघळून जाणाऱ्या हिमतुषारांसारखी.

• • •



एक नाविन्यपूर्ण आत्मकथा

# सांगत्ये ऐका

हंसा वाडकर

लेखांक चवथा

17 डिसेंबर 1966

: १ :

घरात रमण्याचा निश्चय करून घरी आले होते खरी. पण या निश्चयाला पहिलीच ठेच बसली होती. साऱ्या स्वप्नांना भकासपणा आला होता. तरीही, मोटा संयम करून सारी दुःखं, साऱ्या मानहान्या, साऱ्या चुका विसरून मी या नव्या जीवनाशी समरस होण्याचा प्रयत्न करीत होते. रेशमाच्या गाठी, मी तुळस तुझ्या अंगणी यांसारख्या चित्रपटांची कॉन्ट्रॅक्टस मिळत होती. पण मी बाहेर जाण्यापूर्वी जशी माझी चलती होती तशी आता उरली नव्हती. तीन वर्षांच्या अनुपस्थितीचा परिणाम होता.

माझी मुलगी रेखा मोठी होत होती. तिला मात्र मी सिनेमा धंद्यापासून अगदी अगदी दूर ठेवलं. शुटिंग बघायलादेखील मी तिला नेत नसे. एकदाच फक्त नेलं. तेव्हाही माझा भाऊ आणि तिची एक मैत्रिण बरोबर होती म्हणून. एरवी तिला या जगाचा वाराही लागू दिला नाही. तिचीसुद्धा इच्छा नव्हती, की आईसारखं आपण सिनेमात जावं. ती अगदी साधी राहायची. आणि अजूनही राहते. घट्ट वेण्या, ओठांना कधी रंग नाही, की काही नाही.

आपल्याच मुलीचं कौतुक करू नये. पण माझी मुलगी हुशार आहे. तसं पाहिलं तर तिच्याकडे लक्ष द्यायला कोण होतं ? मी घरी होते तेव्हा शुटिंगमुळे सतत बाहेर असायची. इतरांचंही तिच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष नव्हतं. पण ती जात्याच हुशार. प्रत्येक इयत्तेत चांगली पास होत गेली. जे. जे. स्कूलमधून तिनं आता कमर्शिअल आर्टचा डिप्लोमा घेतलेला आहे, चांगल्या पगाराची नोकरी करते आणि संसारही सुखाचा करते. मनाला खूप बरं वाटतं.

तीन वर्षांनंतर परत मी आले. पण नाटक-सिनेमाचं व्यसन काही सुटलं नव्हतं, सिनेमा-नाटकात कामं करावीशी वाटतच होती. त्यामुळे मी मिळेल त्या पिक्चरमध्ये कामं करीत होते. नाटकांमध्येही तेव्हा मला फार मागणी होती. ५५–५६ चा काळ होता. अनेक नाटकांमधून मी त्या वेळी कामं करी.

'मी तुळस तुझ्या अंगणी'च्या वेळची गोष्ट. तेव्हाच्या कुठल्यातरी एका परिषदेच्या डेलिगेट्समोर करून दाखवण्यासाठी सरकारनं आमचा प्रोग्रॅम घेतला होता. मी, राजा गोसावी, महंमद हुसेन आणि आशा भोसले एवढेजण आम्ही त्या फडासारख्या कार्यक्रमावर खूप मेहनत घेत होतो. आशा भोसलेचा प्लेबॅक होता. आठ दिवस आम्ही जोराची प्रॅक्टिस केली. त्यामध्ये माझा अतिशय फास्ट डान्स होता. पाय एका जागी ठरायचा नाही. प्रॅक्टिसने दोन्ही पाय सुजून आले होते.

कार्यक्रम वल्लभभाई पटेल स्टेडियमवर होता. सारा स्टेडियम गच्च भरला

होता. माझ्या अगोदर सितारा नाचून गेली होती. त्यामुळे ती माझी कसोटीच होती. मी एन्ट्री घेतली न् स्टेजवरची एक फळीच वाकली. पाय मुडपला आणि घुंगरू तुटलं. आता काय करावं कळेना. क्षणभर मी गोंधळले.

महंमद हा माणूस दिसायला अगदी सामान्य. पण मनाचा दिलदार. ऐन वेळी संकटाच्या प्रसंगी तो धावून यायचा. याही वेळी माझी अवस्था महंमदच्या लक्षात आली. तो सोंगाड्याचं काम करीत होता. लगेच प्रसंगावधानानं तो लगबगीनं पुढं झाला. आणि खाली वाकून म्हणाला, "अग्ग बाई ! बाईचे घुंगरू तुटले वाटतं." आणि लगेच त्यानं घुंगरू बांधून दिले. लोकांना तो विनोदच वाटला. शेवटी मी त्या मुरगळलेल्या पायानेच नाचले. लोक खूष झाले. पण मी मात्र आत येताच खालीच बसले. पुढे तीन महिने पाय प्लॅस्टरमध्ये होता. प्लॅस्टर मी दीड महिन्यातच सोडलं. पण तेव्हापासून नाचही सुटला. त्या पायामुळे आता मला डान्स करता येत नाही.

याच सुमाराला खूप नाटकात कामं केलीत. घुमाळनं बंदरकरांच्या मागे लागून एक नाटक कंपनी काढली होती. त्यात मी आणि बाबा (राजन जावळे) काम करीत असू. घुमाळच्या कंपनीत आम्ही 'लग्नाच्या बेडी'चे जवळ जवळ साडेतीनशे प्रयोग केले. मी रश्मीचं काम करायची.

घुमाळ गरीब होता तेव्हापासून मी त्याला पाहिलं आहे. अडीअडचणीला मदतही केली आहे.

माझी लहानपणापासूनची सवय की कामावर मिळालेले पैसे मी घरच्या पुरुषाजवळ देते. पूर्वी वडलांकडे देत असे. लग्न झाल्यावर बंदरकरांजवळ द्यायची. स्वतः-जवळ केवळ खर्चापुरते.

त्याप्रमाणे घुमाळच्या नाटकांसाठी आमचा बाहेरगावी दहा दिवसांचा दौरा असला की, यांच्याजवळ घुमाळ सात दिवसांचे पैसे आगाऊ देऊन जायचा. उरलेले तीन दिवसांचे पैसे काही मिळायचे नाहीत. आम्ही दौऱ्याहून परत आलो की बंदरकर विचारीत, "तीन दिवसांचे पैसे मिळाले का?" 'नाही' म्हणून सांगितलं की ते म्हणत, "करतेस कशाला कामं ? कामावाचून काही अडलं आहे का ?"

पण मला हौस होती ना !

मग पैशासाठी बंदरकरांनी रागावू नये म्हणून आम्ही नाही नाही त्या युक्त्या करीत असू. एकदा तर मी पैसे मिळविण्यासाठी रेसमध्ये पांडू खाडेच्या घोड्यावर पैसे लावले. योगायोगानं आमचा घोडा जिंकला. आम्हांला बरेच पैसे मिळाले. "हे घ्या नाटकाचे पैसे" असं म्हणून मी ते बंदरकरांना साळसूदपणे नेऊन दिले. आता घुमाळ ओळखदेखील देत नाही. आम्हीही पर्वा करीत नाही.

वसंत चितळकराची एक गंमतीची आठवण आहे. माझी आपली सवय की कोणत्याही नाटकात केव्हाही काम करायचं असलं की त्याचे सारे डायलॉग्ज पाठ

तर करतेच, पण पुन्हा पुन्हा तालमी करण्याचा आग्रह धरते.

'लग्नाच्या बेडी'मध्ये मी रश्मीचं सर्व मिळून सातशे वेळा काम केलं असेल. पण दरवेळी मला नवा हुरूप यायचा. आणि मी नवनवा, वेगवेगळा अभिनय करायची. एकदा माझ्याबरोबर वसंत चितळकर काम करणार होता. मी त्याला म्हटलं, "चल, आपण रिहर्सल करू." पण तो म्हणाला, "कशाला ? सारं पाठ आहे."

त्याचे डायलॉग्ज पाठ आहेत याची मला खात्री होती. पण रिहर्सलचा परिणाम वेगळाच असतो. आपल्या बरोबरच्या पात्राचा कोणत्या वेळी कोणता अभिनय येतो हे कळते. आणि माणूस बुजत नाही.

त्या दिवशी मी स्टेजवर एका प्रसंगाला नेहमीप्रमाणे चितळकराच्या गळ्यात पडण्याऐवजी हळूवारपणे त्याच्या मानेवरून, खांद्यावरून, दंडावरून आणि हातावरून माझे हात फिरवले. आणि काय जादू झाली कुणास ठाऊक तो एकदम पुतळ्यासारखा गार पडला. भाषण त्याच्या तोंडून उमटेचना. मी त्याला खुणावून सांगितले, काही शब्द हळूच सांगितले, माझे पुढचे संवाद बोलून त्याला हिंट देण्याचा प्रयत्न केला. पण तो अवाक्. डोळे विस्फारून भारल्यासारखा माझ्याकडे बघत राहिला. शेवटी सुदैवाने प्रेक्षकांनी काही गडबड करण्यापूर्वीच त्याची गाडी कशीबशी सुरू झाली.

नंतर मेकअप काढल्यावर मला तोंड न दाखवताच तो घाईघाईने पळून गेला. मला मोठी गंमत वाटली.

कधी कधी फसवणूकही फार झाली. गैरसमजानं तसं झालं असेल म्हणा. पण मला तरी वाटतं की आपली फसवणूक झाली. जेव्हा कळतं की लोकांनी आपल्याला खोटं सांगून फसवलं तेव्हा राग येतो. चीड येते.

एकदा दिनकर पाटलांनी मला गाठलं आणि ते म्हणाले, "हंसाबाई, एक छान रोल तुम्हांला माझ्या पिक्चरमध्ये आहे. हिरॉईनचा."

मी कबूल झाले.

सेटवर गेले तर नंदा (बेबी). तिला मी विचारलं तर ती म्हणाली, "तुमचा साईडरोल आहे. पण आहे फार पॉवरफुल." मला त्याचं काहीच विशेष वाटलं नाही.

त्याच चित्रपटात बाबा (राजन) काम करत होता. माझ्या एका डान्सचं शुटिंग झाल्यावर मध्यंतरामध्ये बाबा म्हणाला, "असं कसं तू काम स्वीकारलंस ? तुला दोनच डान्सेस आहेत. इतर काम नाही."

मला ते फार फील झालं. आणखी दोन ठिकाणी विचारून खात्री करून घेतली. मग मात्र अपमानास्पद वाटलं. मी दिनकररावांना सांगितलं "घरी जाऊन जेवून येते." मेकअप काढला न् घरी आले. बंदरकरांना सांगितलं. आणि नंतर गेलेच नाही.

त्यांनी जर अगोदरच सांगितलं असतं की तुम्हांला दोनच डान्सेस आहेत तर मी खुशीनं काम केलं असतं. अनेक ठिकाणी मी त्याहीपेक्षा लहान कामं केली आहेत. एक आर्टिस्ट म्हणून कुठलंही काम स्वीकारण्यास मला कुठंच कमीपणा वाटत नाही. उलट आव्हान वाटतं.

नंतर मग मी दिनकररावांना फोन करून सांगितलं, " मी येणार नाही. तुम्ही कुणी दुसरी बाई बघा. " त्यावरून त्यांनी माझ्याविरुद्ध काहूर उठवलं. मग मी त्यांच्याकडे कधीच काम केलं नाही.

अनंत माने यांनीही मला आपली कथा वाचून दाखवली. त्यात मला एक सुंदर कॅरेक्टर होती. मीही खूष झाले. आणि काम करायला तयार झाले. पण पुढे म्हणे पिक्चर मोठं व्हायला लागलं म्हणून या कॅरेक्टरचे बरेच सीन घ्यायचे नाहीत असं ठरलं. मग मात्र मी त्यांना सांगितलं, " जेवढं वाचून दाखवलं तेवढंच घ्या. " हो. आर्टिस्टवर अन्याय व्हायला नको.

असे काही महिने गेले. घरी परत आल्यानंतर (जोशी यांचेकडून) तू कशाला गेली होतीस ? का गेली होतीस ? काय केलंस ? वगैरे एका चकार शब्दानंही मला बंदरकरांनी विचारलं नाही. त्याबाबत त्यांनी मला खूप जपून वागवलं.

पण इतर बाबतींत वातावरण तंग होतं. आमचे मतभेद कायम होते. ते बोलत नसले तरी त्यांचे माझ्यावर फार निर्बंध होते. ही परिस्थिती फार काळ मी सहन करू शकेलसं वाटत नव्हतं. असह्य ताण पडत होता. वेडं व्हायची पाळी येते की काय असं वाटत होतं.

घरातल्या घरात अबोला निर्माण झाला होता. कुणीच कुणाशी बोलत नव्हतं. बोलणं नाही. हसणं नाही. मनाचा कोंडमारा होत होता.

बंदरकरांनी मला एके दिवशी कळवलं— मी सांगेन तसंच वागलं पाहिजे. आणि हे मंजूर नसेल तर मार्ग मोकळा आहे, असं त्यात सूचित केलं होतं.

हे फार झालं होतं. आता यापुढं अधिक सहन करणं शक्य नव्हतं. दोन दिवस तसेच गेले. मी काहीच बोलले नाही. मनाशी निर्णय घेतला, ' बस्स् हे घर सोडायचं.' मग एका पेटीत आवश्यक ते सामान भरलं. काळजी होती. जायचं कुठं ?

तरीपण मी तयारी केलीच. मग बंदरकरांनीच विचारलं—" कुठं चाललीस ? "

मी निर्णय घेतला, या घरात परत पाऊल टाकायचं नाही—

मी बाबाला (राजन जावळेला) फोन केला. आणखी सगळी परिस्थिती सांगितली.

" हे बघ, तू कुठंही जाऊ नकोस. सरळ पुण्याला जा. " असं सांगून कुठं उतरायचं तेही सांगितलं त्यानं.

मी म्हणाले—" तुझी बायको, मुलं...... "

बाबा म्हणाला— " त्याची तू काळजी करू नकोस—"

पुण्याला आल्यावर बाबानं सांगितलेल्या हॉटेलात मी उतरले.

पुण्याहून मी पंढरपूरला गेले. आणि तिथे ४–५ दिवस राहून काही दिवसांनी मुंबईला परतले. मुंबईत मी बेल हॉटेलवर उतरले.

बंदरकर आणि राजन दोघंही चांगले दोस्त होते. दुसरे दिवशी ते दोघंही माझ्या हॉटेलात आले.

बंदरकर म्हणाले, "माझी चूक झाली. तू घरी चल. एकाच घरात पण वेगळं राहू. पण तू घर सोडू नकोस."

क्षणभर मोह झाला. मुलीची आठवण झाली. वाटलं, जावं परत. पण तो मोह मी आवरला. परत गेले की काय होणार हे मला माहीत होतं. पुन्हा भांडणं, पुन्हा कटकटी. नकोच. सुन्न झालेलं डोकं दाबून धरलं.

दुसऱ्या दिवशी मुलगी आली. तिला आता समजू लागलं होतं. तिला मी सांगितलं, "मी फार वाईट गोष्ट केली. पण एकच सांगते. तू तुझ्या बाबांकडेच राहा. मी ही अशी बाई. वडिलांकडे राहिलीस तर लग्न होईल. सुखात नांदशील. माझ्यासारखी भटकत राहिलीस तर लग्नही होणार नाही."

मी बेल हॉटेलमध्ये मी एकटीच एक खोली घेऊन तिथं एक वर्ष राहिले. तेव्हा मात्र मी खरंच बदलले होते. मी ठरवलं, बस्स, हे आयुष्य आता पुरे झालं. सारं सोडून द्यायचं आणि चांगलं वागण्याचा प्रयत्न करायचा. दारू सोडली, सारं सोडलं. बाबानं या बाबतीत मला साथ दिली.

हॉटेलमध्ये एकटीच राहत होते. मन वेड्यापिशासारखं झालं होतं. सारं आयुष्य भुताप्रमाणे खात असल्यासारखं वाटायचं. काय करायचं सुचत नव्हतं. मी काहीच करत नव्हते.

रात्री मला झोपच येत नव्हती. रात्री बेरात्री एकटीलाच खोलीत भीती वाटायची. शेवटी मी झोपेच्या गोळ्या खाऊ लागले. एकदोन गोळ्यांनी परिणाम होईना म्हणून चारचार गोळ्या घेऊ लागले. तरीही झोप येईना. बाबा मला रोज हॉटेलवर भेटायला यायचा. त्याला जेव्हा हे कळलं तेव्हा तो रागावत म्हणाला, "गोळ्या घेत जाऊ नकोस. वाईट परिणाम होईल."

बाकी कुणीच मला त्या हॉटेलवर भेटत नसे. त्याच हॉटेलमध्ये भालजी पेंढारकर राहत असत. त्यांना मी तिथेच राहते हे माहीत होतं. रोज खोलीवरून जायचे. पण चुकूनही मला भेटले नाहीत. आणि मलाही कुणी भेटू नये असं वाटत होतंच.

पण कामं करावीशी वाटत होती. आणि पैसा हवा होताच. स्वतःहून कामं मागायला जाणं तर माझ्या स्वभावातच नव्हतं. इतकी परिस्थिती होती तरी पीळ थोडाच गेला होता? बाबा मला धीर द्यायचा.

एके दिवशी माझ्या खोलीच्या दारावर अचानक कुणीतरी टकटक केलं. मी

दार उघडलं. पाहते तो भालजी पेंढारकर समोर उभे. मी त्यांना आत बोलावलं. त्यांनी माझी जुजबी विचारपूस केली आणि नंतर ते म्हणाले, " हंसाबाई, बऱ्याच वर्षांचं माझं एक स्वप्न आहे. एक उत्कृष्ट चित्रपट काढण्याचं. आणि त्या चित्रपटाच्या नायिका तुम्हीच होऊ शकाल. " ... मी म्हणाले, " अस्सं. "

" हो ... " ते म्हणाले,–" चित्रपटाचं नावही ठरवून टाकलं आहे मी. 'नायकिणीचा सज्जा'. तुम्ही कराल ना काम ? "

" मी काम करायला तयार आहे. " मी म्हणाले; " माझ्या पायामुळे मला डान्स करता येणार नाही. माझ्या रोलला डान्स नाहीत ना ? "

ते म्हणाले, " डान्स आहेत. पण हरकत नाही. ते कामच असं आहे की तुम्हीच ते करू शकाल. तुमच्याशिवाय तो रोल वठणं शक्य नाही. किती पैसे घ्याल बोला. "

मी म्हणाले–" तुम्ही द्याल ते घेईन. तुम्ही कमी देणार नाही याची मला खात्री आहे. "

भालजी म्हणाले, " खरोखर कितीतरी दिवसांपासून या चित्रपटाचं स्वप्न मी उराशी बाळगतो आहे. आपण मस्त पिक्चर काढू. "

" मी वाटेल तेवढी मेहनत घ्यायला तयार आहे–" मी त्यांना दिलासा दिला.

नंतर आम्ही कोल्हापूरला आलो. पेंढारकरांनी सर्वांना चित्रपटाची स्टोरी ऐकवली. खरोखरच खूप सुंदर कथा होती ती. मलाही खूप आवडली आणि काम करायला दुप्पट हुरूप आला.

पिक्चर सेटवर आलं. शुटिंग सुरू झालं. मुंबईहून रंजना चित्रपटात काम करण्यासाठी आली. मध्यंतरी शुटिंगमध्ये एकदोन दिवसांची सुटी होती, म्हणून 'मंडळी' पऱ्हाळ्याला जाऊन परत आली.

परत आले तो काय, सारं काही बदललं होतं. चित्रपटाची कथाच बदलली होती. आणि घेतलेले काही शॉट्स रिटेक करायचे होते. हे काय झालं कळेना. लता मंगेशकर तिथे होती. तिला मी विचारलं, " असं कसं झालं ? " ती म्हणाली, "सगळी स्टोरीच बदललीय. तूच नायिका राहशील की नाही याबद्दलच शंका आहे."

आणि तिनं सांगितलं तसंच झालं. माझं काम भलतंच कमी झालं. मी एकदा कबूल केलं होतं म्हणून काम केलं. पण भालजींचं स्वप्न एकाएकी इतकं कसं काय बदललं याचं मला राहून राहून आश्चर्य वाटतं.

भालजी पेंढारकरांबद्दल मला तसा फार आदर. अजूनही त्यांच्या पायाला हात लावून नमस्कार करते. तेवढीच त्यांच्याशी उत्तराला उत्तरही देते.

पेंढारकरांची भाषा अस्खलित. ते स्वत: डायलॉग्ज उत्कृष्ट म्हणतात. आणि समजावूनही छान सांगतात. ॲक्टिंगपेक्षा शब्दोच्चारांवर त्यांचा जोर अधिक. एकदा 'वेत्रंदशाही' नाटकात मला येसूबाईचं काम होतं. नाटकात सगळी जुनी घोटलेली पात्रं होती. मीच नवीन होते. म्हणून मुद्दाम भालजींकडे गेले. डायलॉग्ज

समजावून घेण्यासाठी. त्यांना फार आनंद झाला. अलीकडे मुलींना शिकण्याची इच्छा फार कमी असते असं त्यांनी सांगितलं.

भालजींनी ज्या ज्या वाक्यांवर मला जोर द्यायला सांगितला होता त्या त्या वाक्यांना मी टाळ्या घेत आले. नाहीतर ' बेबंदशाही ' मध्ये येसूबाई क्वचितच टाळ्या घेते.

स्टेजवरून थिएटरमध्ये जमलेली गर्दी पाह्यली की मला काम करायला दुप्पट हुरूप येतो, पण तीच 'हंसा वाडकरला' पाहण्यासाठी म्हणून जमलेली गर्दी पाह्यली की मला चक्कर येऊ लागते.

सांगलीला एकदा असाच मला एका मोठ्या गर्दीच्या रागाला तोंड देण्याचा प्रसंग आला होता. पण मी तेव्हा स्टेजवर होते म्हणून माझ्यापुरतं तरी मी त्या गर्दीला तोंड देऊ शकले.

सांगलीला आमचं एक लोकनाट्य होतं. आणि त्यामध्ये 'हंसा वाडकर काम करणार' अशा प्रचंड जाहिराती केल्या होत्या. हंसा वाडकरचा नाच पाहण्यासाठी लोक जमले होते.

पण मी नाचणं शक्य नव्हतं.

कुणीतरी माईकवर जाहीर केलं, " लोकहो, हंसा वाडकर आजच्या नाटकात नाचणार नाही, उद्या नाचणार आहे."

झालं, जमाव रागावला. "आम्हांला हंसाबाईंचा नाच पाहिजे" म्हणून ओरडू लागला. दगड फेकले जाऊ लागले. पहिला दगड पडला तो माईकवर. माईक फुटला. अंडीही फेकली जाऊ लागली. खुर्च्यांची आदळआपट होऊ लागली. आता काय होते याची आम्हा आतील लोकांना भीती वाटू लागली होती. माझ्या आयुष्यात असा प्रसंग कधी आला नव्हता.

एवढ्यात मला एकाएकी काय झालं कुणास ठाऊक. मी स्टेजवर जायचं ठरवलं. सगळेजण विरोध करू लागले. " बाई, लोक तुम्हांला मारतील," म्हणाले. पण मी ऐकलं नाही. पडदा उघडायला सांगितलं.

पडद्याच्या चिंध्या झाल्या होत्या. तो कसाबसा उघडला. आणि मी स्टेजवर जाऊन उभी राहिले. मला स्टेजवर पाहताच माजलेला गलबलाट थांबला. लोक हळू हळू शांत झाले.

मग मी विचारलं, " लोकहो, काय हवंय तुम्हांला ?"

सारे ओरडू लागले, " नाच, नाच. आम्हांला तुमचा नाच बघायचा आहे."

मला आता धीर आला होता. मी म्हणाले, " पण माझा नाच होणार म्हणून तुम्हांला कुणी सांगितलं होतं. जाहिरातीत तर तसं काही लिहिलेलं नाही."

एकजण एकदम ओरडला, " अरे वा रे वा ! हे काय बोलणं झालं. हंसा आणि नाच नाही म्हणजे काय. असं कधी झालंय ?"

पुन्हा आरडाओरडा सुरू झाला. गर्दी काही शांत होईना म्हणून मी वसंतराव शिंदे यांना पेटी घेऊन शेजारी बसवलं आणि गाऊ लागले. त्याबरोबर लोक एकदम शांत झाले. मी तीन गाणी लागोपाठ म्हटली. प्रेक्षक अगदी शांत बसले होते. मला गाण्याला टाळयाही मिळाल्या.

तिसरं गाणं संपल्यावर एकजण ओरडला, " वा रे नाच ! चाळ कुठाय ? पेटी कुठाय ? काय नाचताय !"

पुन्हा गलबला सुरू झाला. मी रागावले आणि झटक्यात आत निघून आले. प्रेक्षकांनी पुन्हा दंगा सुरू केला. आम्ही पोलिसांच्या गाडीतून निघून आलो.

नंतर आम्हांला कळलं, तिथल्या काही गुंडांनी आपापसातल्या काही भांडणा-वरून दंगा करायचं ठरवूनच टाकलं होतं. आम्ही निघून आल्यावर त्यांनी थिए-टरला आग लावायचं तेवढं बाकी ठेवलं होतं.

अशी नाटकं, लोकनाटचं, सिनेमातली कामं चालूच होती. पण आयुष्य मात्र एकाकीच होतं. नुसती हॉटेलमधून एकटी राहत होते. त्या काळात बाबांनी मला धीर दिला. त्यांचा मला फार आधार वाटायचा.

जुनं आयुष्य झुगारून देण्यात मी यशस्वी झाले होते. साऱ्या वाईटसाईट सवयी आता सुटल्या होत्या. निश्चयानं सोडल्या होत्या. आपण हे करू शकतो याचं थोडं-फार समाधान लाभत होतं. पण आमच्या धंद्यातल्या लोकांचा विश्वास बसत नव्हता. टिंगलही होत होती.

एके दिवशी कळलं, बाबांची मोठी मुलगी आजारी आहे म्हणून. त्यांच्याकडे अचानक गेले. सर्वांना आश्चर्य वाटले. आजूबाजूला माझी कीर्ती पसरली होतीच. आजूबाजूच्या घरांतले लोक टकमका माझ्याकडे कुत्सित नजरेनं बघत होते. पण घरात मात्र सर्वांना आनंद झाला. मुलीलाही आनंद झाला. ती म्हणाली, " आता आलीच आहेस तर थांब." म्हणून थांबले. थोडचा वेळाने बाबा आले. त्यांनाही मला एकदम घरी पाहून आश्चर्य वाटलं.

जाताना मुलीनं हट्ट धरला, " तुम्ही उद्याही याच. नाहीतर औषध घेणार नाही." मग रोज येऊ लागले. मुलगी काही दिवसांनी बरी झाली. मग काही दिवसांनी मुलींचा अभ्यास घेऊ लागले. मुलींना माझा लळा लागला. हळूहळू घरातली कामंही करू लागले.

चुलीला हात लावायचा की नाही हा प्रश्न होता. एके दिवशी बाबांच्या आईंना बरं नव्हतं, म्हणून मी त्यांना चटणी वाटून दिली. मग हळूहळू सारा स्वैंपाकच करू लागले.

इथं आले आणि खरोखरच एकदम बदलले. संसारी झाले.

शिवाजी पार्कवरच्या घरात आम्ही आलो तेव्हा बाबांच्या आई आजारी पडल्या. त्यांचा माझ्यावर जीव बसला होता. त्यांच्या आजारपणात मी त्यांची खूप मना-

पासून सेवा केली. त्यांचा आजार वाढतच होता. बाबांवर त्यांचं फार प्रेम. त्यांचा प्राण जाईना.

मरताना त्यांनी मला जवळ बोलावलं. सांगितलं, " – मुलाला मी फुलासारखं वाढवलं आहे. त्याला सांभाळ."

मी म्हणाले, "–तुमच्याप्रमाणेच मी बाबाला आणि त्याच्या मुलींना जपेन. अंतर देणार नाही."

## : २ :

माझ्या जुन्या सवयी तर तुटल्या होत्याच. कांदा, लसूण, फिश, मटन आता काही काही खात नाही. मग पिणं तर दूरच. प्रथम प्रथम खूप जड गेले. पण आता सवय झाली. इतकी की आता मलासुद्धा या वस्तूंची घाण येते. नाहीतर चोवीस तास पिणारी बाई मी. मला हे जमलं तरी असतं का ? पण त्या वेळी सूड घ्यायचा होताना मला सगळ्या जगाचा ! त्यासाठीच मी पीत होते आणि पाजत होते. पण तो मार्ग चुकीचा होता हे आता पटतंय. दारू प्याल्यावर कसला आला आहे जगाचा सूड ? उलट मीच अधिकाधिक खोलात गेले. जगाला काहीही झालं नाही.

पण ते आयुष्य सोडून आता दहा वर्षं होऊन गेलीत. हल्ली मी ते सारं विसरले आहे. पार विसरले आहे.

आता देवाकडे ओढा वाढू लागला आहे. हल्ली जपसुद्धा करते. शंकराच्या पूजेची मला प्रथमपासून आवड. महाबळेश्वरला जाणं म्हणूनच मला आवडतं. तिथलं एक आडवाटेचं देऊळ मी मुद्दाम सुधारून घेतलं.

एवढं सगळं झालं तरी माझा बंदरकरांवर विश्वास आहे. माझ्या वयाच्या सहाव्या वर्षापासून ते मला ओळखतात. नाही पटलं माणसाचं संसारात म्हणून तो मनुष्य वाईट आहे असं नाही. आमचे धागे जुळू शकले नाहीत एवढंच. ते मला समजू शकले नाहीत. कदाचित मी त्यांना समजू शकले नसेन.

" हिला बरं वाटतंय ना मग राहू द्या " अशी त्यांची आता वृत्ती आहे. मला खात्री आहे, आत्ताही जरी त्यांना कळलं, की मी दुःखात आहे, संकटात आहे तर माझ्यासाठी ते प्रत्यक्षपणे, अप्रत्यक्षपणे धावून येतील.

म्हणून मीसुद्धा काही काही गोष्टी पाळते. नटी असले तरी आईची माया आहे. मुलीपासून दूर होणं जड गेलं. पण मुलीच्या वडलांना मी तिला भेटणं पसंत नाही ना, म्हणून मी तिचं सात वर्षं तोंड पाहिलं नव्हतं. खूपच जड जायचं. जीव तुटायचा. मन घट्ट केलं होतं.

फक्त एकदाच ती मला दिसली. राजनच्या मुलींबरोबर मी मेट्रोला सिनेमाला गेले होते. समोर शाळेच्या युनिफॉर्ममधल्या दोन मुली होत्या. मी जरा निरखून

पाहिलं आणि चरकले. दोघींपैकी एक रेखा होती. तिचं माझ्याकडे लक्ष गेलं आणि तीही गांगरली. मी थोडीशी तिची विचारपूस केली.

सिनेमा सुटला तेव्हा बाबा म्हणाला, "आपण रेखाला आपल्या गाडीतून सोडू या." मी कठोरपणे नकार दिला.

उलट तिला म्हटलं, "हे बघ, आज पाहिलं तुला शाळेतून परस्पर सिनेमाला येताना. मी तुझ्या वडलांना कधीच फोन करत नाही. पण पुन्हा अशी दिसलीस तर फोन करून सांगीन त्यांना, कळलं ? जा तू आता."

बाबा आणि सारी मुलं सारखा आग्रह करीत होती. "आपण तिला गाडीतून सोडू तिच्या घरी. पाऊस पडतो आहे."

पण मी म्हटलं, "जाऊ द्या आली तशी." खूप वाईट वाटलं.

नंतर मुलगी कधी कधी माझ्याकडे यायची पण वडिलांना न सांगता चोरून.

एके दिवशी मुलगी घरी आली आणि धक्काच बसला. तिला दिवस गेले होते. म्हटलं हे एकदम कसं झालं. काय केलंन् पोरीनं. पण बरोबर आत्या होती. मुलगी म्हणाली, "मम्मी, तुम्हांला नमस्कार करायला आलेय." तेव्हा माझ्या जिवात जीव आला. तिचं लग्न झालंय हे मला माहितच नव्हतं. फार उशीरा कळलं. कुणी कळवलं नव्हतं. असं कळलं तेव्हा खूप आनंद झाला.

मी तिला सांगितलं, "आपल्या नवऱ्याला विचार माझ्याकडे येणं पसंत आहे की नाही ते. पसंत असेल तर येत जा."

मुलगी नवऱ्यासकट वडिलांकडेच राहते.

आता मला दोन नातू आहेत. पैकी एकाला थोडं बोलता येतं. तो घरी गेल्यावर सांगतो, "आम्ही आजीकडे गेलो होतो." पण त्याला आज्या पुष्कळ आहेत. म्हणून खपून जातं.

मुलगी अगदी पहिल्यांदा बाळंतीण झाली तेव्हा मला फोन आला नातू झाल्याचा. बाराही दिवस तिच्या हॉस्पिटलमध्ये डबा घेऊन जात होते. दुसऱ्या वेळी ती हॉस्पिटलमध्ये गेल्याचं कळताच मीही पाठोपाठ गेले. ती बाळंत झाली. आता घरी फोन करायचा होता. जवळपास कुणी नव्हतं. रेखानं हट्ट धरला, "मम्मी, तुम्हीच करानं घरी फोन."

घरी हे असणार हे मला माहीत होतं. तरीदेखील फोन करायचा होताच. छाती धडधडत होती. आणि घसा कोरडा पडला. शेवटी एक युक्ती केली. नाटक-सिनेमात कामं करणारी बाई मी. अशा युक्त्या माहीत असणारच. पदराच्या दोन-चार घड्या करून त्या तोंडावर ठेवल्या आणि मगच फोन केला.

तिकडून यांनीच फोन उचलला. यांचा आवाज मी लगेच ओळखला. सांगितलं, "मी हॉस्पिटलमधून बोलतेय. तुमची मुलगी सुखरूप बाळंतीण झाली. मुलगा झालाय."

त्यांनी विचारलं, "कोण बोलतंय ?" क्षणभर गोंधळले. मग लगेच ठोकून दिलं, "मी शांताबाई नर्स बोलतेय."

"व्हेरी गुड, व्हेरी गुड." असं म्हणत यांनी फोन ठेवून दिला. माझ्या हातांना घाम आला होता.

घर सोडल्यावर बंदरकरांशी बोलणं हे एवढंच. त्यांची माझी प्रत्यक्ष गाठ कधीच पडली नाही. फक्त एकदा 'मोरूची मावशी' या नाटकाला गेले होते. बाबा नाटकात काम करत होता. मी मागे वळून पाहिले तर तर अगदी मागच्या सीटवर हेच. पुढे सबंध नाटकभर वळून पाहिलं नाही. दोन अंकामध्येही उठले नाही. अगदी तश्शीच बसून राहिले.

आता मुलगी म्हणते, "मम्मी, नातवंडांसाठी तरी चला ना घरी," पण ते आता शक्य नाही. खूप वेळ झाला आहे.

कधीकधी पिक्चर बघते. ती हौस अजून गेलेली नाही. पण खरं सांगू का ?आजकालचे मराठी चित्रपट मी जास्त बघतच नाही. धाडसच होत नाही. मनाला भिडणारं असं काही त्यांच्यामध्ये आहे असं वाटतच नाही. चित्रपट पाहताना हे सारे कलावंत मनापासून काम करताहेत की नाही, याची उगाचच शंका वाटते. पुन्हा वाटतं या बाईला यापेक्षा आणखी कितीतरी जास्त करता आलं असतं.

शिवाय आजकालच्या हिरॉईन्स उचलतातच फार. स्वतःचं काही वेगळं निर्माण करण्यापेक्षा उचलण्याची प्रवृत्ती जास्त. एकीचं काम लोकांना आवडलं ना मग कर तिची नक्कल असंच फार चालतं.

पूर्वी जशी आपल्या भूमिकेशी तन्मय होऊन कामं करण्याची ईर्षा दिसायची तशी आता दिसत नाही. अजूनही संत सखूमधलं माझं काम पाहिलं की मला रडू येतं. तसं इतर भूमिकांच्या बाबतीत होत नाही.

'सांगत्ये ऐका'च्या सेटवरची गोष्ट. माझा आणि जयश्री गडकरचा मिळून एक मोठा वग होता. लांबलचक गाणं होतं.

अनंतराव माने एकदम आले आणि म्हणाले, "चला, वग घेऊन टाकू या." मी आश्चर्यचकीत झाले. म्हटलं, "एवढा मोठा वग. अगोदर सांगितलंसुद्धा नाही. माझं तर गाणंसुद्धा पाठ नाही."

पण नाही. कट कट करून शॉटस् घेतले. अडीच दिवसांत शुटिंग पूर्ण झाले. त्याच सुमाराला जयश्रीबाईंना कुठे बाहेरगावी जायचं होतं. म्हणून तिला बाजूला उभं करून तिचे शॉट्स् अगोदर घेऊन टाकले होते. त्यामुळे त्या सबंध वगात आमच्या दोघींचा एकत्र शॉटच नव्हता. मग त्या चित्रपटात काम करणाऱ्यांना आणि तो पाहणाऱ्यांना रस का वाटावा ?

पुढे जयश्रीबाईंचे आणि अनंतरावांचे संबंध सुधारले. तेव्हा सतत कॅमेरा जयश्रीबाईंच्या चेहऱ्याभोवती.

'सांगत्ये ऐका' एवढं चांगलं चालण्याचं कारण म्हणज त्यामध्ये काम करणारे कलाकार मातब्बर होते. आणि दुसरं म्हणजे, केळकरांचं नशीब.

'सांगत्ये ऐका' च्या निमित्ताने बऱ्याच दिवसांनंतर मी आणि वसंतराव पवार एकत्र आलो याचं मला फार बरं वाटलं. वसंतराव खरोखरच एक गुणी आणि हरहुन्नरी माणूस होते. वंशाचा दिवा, पुढचं पाऊल मध्ये त्यांनी मला खूप मदत केली. ते नृत्य फार छान शिकवीत. इतरांनी नृत्य सांगितलं की मी बिचके. पण वसंतरावांनी सांगितलं की मला पटकन जमे.

वसंतराव पवारांच्या नावाने आता काही लोक फंड उभारतात म्हणे. मला या लोकांचा राग येतो. वसंतराव जिवंत असताना या लोकांनी काही त्यांच्यासाठी केलं का? सायंकाळी बाटल्यांची अमिषं दाखवून त्यांच्याकडून मोलाची कामं करून घेतली. त्या वेळी त्यांचा वसंतरावांविषयीचा कळवळा कुठे गेला होता? ते गेल्यानंतर हा ढोंगीपणा का? मला या ढोंगीपणाचाच राग येतो. आणि आमच्या धंद्यात तर हा ढोंगीपणा खूपच भरला आहे. असो.

आजकालचे मराठी चित्रपट पडेल निघण्याचं आणखी एक कारण म्हणजे आर्टिस्टमध्ये कष्ट करण्याची जिद्दच उरली नाही. आळस आणि काचकीच फार. सकाळी स्टेजवर ९ वाजता उभं राहायचं असलं की या बाई पावणेनऊला स्टुडिओत येणार. अगोदर नास्ता मागणार. मग तो दरिद्री मराठी प्रोड्यूसर इकडून तिकडून कुणाच्या खिशातून पैसे काढून बाईंसाठी नास्ता पाठवणार. बाईंनी नास्ता खाल्ला तर खाल्ला. नाहीतर उष्टावून बाजूला सारला. नंतर ९ वाजता बाई मेक्अप करायला बसणार तोवर इतर नटमंडळी जमत आणि डायरेक्टर्स सेटवर कपाळाला हात लावून बाईंची वाट पाहताहेत.

तेवढ्यात यांना काही महत्त्वाच्या कामासाठी कुणीतरी स्टुडिओत भेटायला येणार. मग मेक्अपमधला अर्धा तास गेला. नंतर आरडाओरड करीत मेक्अप पूर्ण होणार. साडेदहाला बाई स्टेजवर येणार. लाईटिंग वगैरे होते आहे एवढ्यात कुणाचा तरी फोन.

जेमतेम एखादा दुसरा शॉट झाला की लंच टाईम होतेच आहे. आणि लंचला जाताना बाई सांगणार—"बरंका, आज दुपारी मला लवकर जायचंय."

आणि लंच टाईममध्ये, मेक्अपरूममध्ये घाणेरडे प्रकार! आम्हीही खूप वाह्यातपणा केला पण सेटवर किंवा मेक्अपरूममध्ये कधीच नाही. कलेशी बेईमानी केली नाही. जे केलं ते रंगदेवतेचा आब राखून.

ती जिद्द, ते दिग्दर्शक, लवकर कामे करण्याची ती चढाओढ, ती माणसं, सारं गेलं. पंधरा दिवसाचं शूटिंग आहे ना? मग दहा दिवसांत कसं उरकता येईल यासाठी आम्ही चढाओढींनी कामं करीत असू. पण आता मी पाहते, आठ दिवसांचं

शुटिंग असलं की टंगळ मंगळ करून ते बारा पंधरा दिवस कसं लांबवता येईल हे आर्टिस्ट बघत असतात.

आणि दिग्दर्शक हिरॉईन्सच्या हातचं बाहुलं झालेले. बाईंचं नाव गाजलेलं आणि डायरेक्टर्स लहान. नवीन मग ती जे सांगणार त्याला दिग्दर्शक मान डोलावणार. ओक्साबोक्सी रडण्याचा सीन असला आणि दिग्दर्शक म्हणाला की ' असं रडा बाई. ' तर ही म्हणणार " नाही गडे, मी अशीच पोझ घेऊन रडणार– " की झालं दिग्दर्शक विरघळलाच.

हे पाहून मला चीड येते. मी एकाला म्हटलंसुद्धा, " तुम्ही दिग्दर्शक ना? तुमची स्वतःची इच्छा नाही का हा सीन कसा व्हावा तो? मग एकदा सांगा तिला. "

माझी दिग्दर्शकाशी वागण्याची पद्धत लहानपणापासून ठरलेली आहे. तो लहान असो की मोठा, नवा असो की मातब्बर, तो जसं सांगेल तसं मी करते. एखादी गोष्ट पटली नाहीच तर त्याला बाजूला घेऊन सांगते. सगळ्यांच्यादेखत तर मुळीच नाही.

आता आपले नट-नटचा एखाद्या हिंदी पिक्चरमध्ये एक्स्ट्रॉची कामं करून येतात. तिथले हिंदी हिरो-हिरॉईन काय करतात, कसं वागतात हे पाहून ठेवतात आणि त्यांचीच भ्रष्ट नक्कल इकडेही करतात. मग कसली आली आहे मराठी चित्रपटसृष्टीची परंपरा?

आणि हेच लोक ' प्रभात ' ची टिंगल करतात. ' प्रभात स्कूल ' म्हणून हिणवतात. चेष्टा करतात. ' प्रभात'ची कुणी अशी चेष्टा केली की मी संतापते. स्वतःशीच म्हणते, " हिणवा, तुम्ही काहीही करा. पण तुम्हांला ' प्रभात'च्या तोडीचं काही जमणार नाही. तुमची लायकीच नाही."

एखादा चित्रपट जरा बरा चालला की यांचे हात एकदम अस्मानाला पोचतात. यांना वाटतं, " झालं. आपण आता पोचलो." एकदा एका चित्रपटात एका बाईंनी खूप छान काम केलं होतं. मलाही ते आवडलं. पण त्या बाई गर्वानं एवढ्या फुगल्या होत्या की त्यांना वाटायचं– बस्स, आता यापुढे काही राहिलंच नाही. आपण अभिनयाची परिसीमा गाठली. आता आपणांला कुणी शिकवूच शकणार नाही.

म्हणून मी मुद्दाम म्हणाले, " बाई, तुम्ही खरंच छान काम केलंत हं. पण तुम्हांला अजून पोचायचं आहे. खूप शिकायचं आहे."

पण त्यांना राग आला. खरं सांगितलेलंही पटत नाही. कला कधीतरी पूर्णत्वाला पोचते का? कलेचं नावच मुळी मुद्दाम तसं ठेवलं आहे, याची यांना जाणीव नसते. आणि कुणी करून देण्याचा प्रयत्न केला की यांना राग येतो.

आठवावंसं वाटत नाही. पण आठवू लागले म्हणजे सारा आयुष्याचा चित्रपट नजरे समोरून सरकत जातो. कुठे होते आणि कुठे मी आले. लहानपणापासून काय काय स्वप्नं होती आणि आता झालं काय हे जाणवतं आणि मनाचा गोंधळ होतो. चांगला सोन्यासारखा नवरा मिळाला. पण संसाराचे धागे नीट जुळू शकले नाहीत याची मनाला खंत वाटते. जगाने, धंद्यातील लोकांनी फसवल्याचं आणि आपणही भाबडेपणानं फसल्याचं वाईट वाटतं. आणि असेही दिवस आठवतात, जेव्हा मला पाहण्यासाठी रस्त्यावर गर्दी थांबायची. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना कल्लोळ उडविणाऱ्या गर्दीतून मी जात आहे हे दृश्य आठवलं की माझे डोळे फिरतात. तेव्हाही अशी गर्दी पाहिली की डोळे फिरायचे.

लोकांनी डोक्यावर घेतलं, टीकाकारांनी नावाजलं, चित्रपटसृष्टीत नाव कमावलं. एक काळ गाजवला. आता उपेक्षिले गेले असले तरी त्या काळाच्या स्मृती अद्याप मनावर कोरलेल्या आहेत.

आता देवधर्माकडे ओढा अधिक आहे. चित्रपटसृष्टीचं आकर्षण मात्र अजून गेलेलं नाही. एकदा या सृष्टीत पदार्पण केलं म्हणज ते कधीच जात नाही म्हणा. अजून कामं करण्यासाठीं आसुसले आहे. पण त्या स्वैर जीवनाची मात्र ओढ नाही. उलट तिटकारा वाटू लागला आहे. शांत, संसारी जीवनाची लहानपणापासूनची ओढ आता पुन्हा वर उफाळून आली आहे. आणि तसं जगण्याचा मी जास्तीत जास्त प्रयत्न करते आहे.

बाहेरच्या लोकांना या जीवनाविषयी खूप आकर्षण असतं. नाटकांच्या निमित्ताने कधी कधी आम्ही बाहेरगावी जातो. कुठं शाळांत, धर्मशाळेत वगैरे उतरतो. तिथे आम्हांला काही सुसंस्कृत हौशी आईबाप आपल्या मुली दाखवतात. दहाअकरा वर्षांच्या त्या मुली अगदी हिडीस नाचून दाखवतात. मग त्या मुलींचे आईबाप आम्हांला म्हणतात, "मुलीला सिनेमा लाईनची हौस आहे, तिला सिनेमात टाकायचंय."

त्या कोवळ्या मुलींकडे बघून मला कळवळून येतं. मी चक्क सांगते, "शाहणे असाल, मुलीचं हित करायचं असेल तर तिला या लाईनकडे चुकूनही फिरकूसुद्धां देऊ नका."

माझा अनुभव त्यामागे आहे. मी म्हणते कुठलीही स्त्री या लाईनमध्ये आणा. अगदी सती सावित्रीसारख्या पतिव्रतेला देखील आणा. ती आहे तशी राहूच शकत नाही. पातिव्रत्य, घरगुती वातावरण आणि ही लाईन कधी एकत्र येऊच शकणार नाही. हा स्वानुभव आहे. कुणी नटी म्हणत असेल की, होय, मी अजून शुद्ध आहे, तर ते मला पटत नाही. ती शुद्ध थाप आहे. त्यामुळे ती फसवते आहे, लोकांना, स्वत:लासुद्धा. या क्षेत्रामध्ये क्षणाक्षणाला एवढे मोह तुमच्याभोवती जाळी टाकत असतात की तुम्ही त्यातून निसटूच शकत नाही. म्हणून मी अशा मुलींना सांगते,

तुम्हांला सुखाचा संसार करायचा असेल तर या लाईनकडे ढुंकूनही बघू नका.

काही मुलींचे आईबाप म्हणतात एकदोन पिक्चरमध्ये कामं केली की आम्ही आमच्या मुलीला बाजूला काढून घेऊ. ते शक्य नाही. गडकऱ्यांच्या एकच प्याल्यासारखं आहे हे. एकदा घेतला की पुन्हा घ्यावासा वाटतो. एकदा काम केलं की पुन्हा करावंसं वाटतं. चैन पडत नाही त्याशिवाय.

असं बोललं की घरचे लोक म्हणतात अजून हौस नाही फिटली वाटते ? पण कसं सांगू ? ही हौस नाही. हे व्यसन आहे. वाईट व्यसन आहे. मला आठवतं, माझे वडील प्यायचे. त्यांना व्यसन होतं. पण कधी कधी ठरवायचे, बस्स् यापुढे नाही प्यायचं. मग संध्याकाळी खूप अस्वस्थ व्हायचे. हात मागे बांधून फेऱ्या मारायचे. शेवटी असह्य होऊन, कोट टोपी घालून प्यायला जायचेच.

तसंच हे आहे. ही हौस नाही. मान, मोठेपणा, प्रसिद्धी— कशाकशाचा यात भाग नाही. त्या वातावरणात तोंडाला रंग लावून काम करण्याची धुंदी एकदा अनुभवली की त्याचं व्यसनच जडतं. मग त्याशिवाय असह्य होतं, तडफडायला होतं. वाईट व्यसन आहे हे.

म्हणून मी त्या आईबापांना आणि त्या मुलींना कळकळीनं सांगते, कशाला स्वतःच्या हातांनी आपल्या सुखी जीवनाचा नाश करून घेता ?

असं आहे हे जग. स्मृतीची एकेक पान उलगडू लागले की पुन्हा मन गोंधळतं. अस्वस्थ होतं. कलेची सेवा केल्याचं समाधान लाभतं खरं. पण त्यापेक्षा दुःखंच फार टोचणी देतात.

## समाप्त

# भूतदया अंगाशी आली !

नाट्य व चित्रपट सृष्टीतील काही ख्यातनाम कलावंतांनी आचार्य अत्रे यांचे 'लग्नाची बेडी' हे नाटक बसविले व या प्रयोगाचे खेळ दक्षिण महाराष्ट्रात बेळगाव, कोल्हापूर, निपाणी, सांगली या शहरांतून चालू होते. त्याच वेळी महाराष्ट्रातील प्रो. माळी यांची प्रख्यात "परशराम लॉयन सर्कस" यांच्याही सर्कशीचे खेळ वरील शहरांतून चालू होते. परंतु दुर्दैवाने सदरहू सर्कस ही बहुधा त्या वेळी कर्जबाजारी असावी व वरील शहरांतून उत्पन्नही या सर्कशीस बेताचे किंवा थोडेफार कमीच झाल्यामुळे, ही सर्कस चालविणे चालकांना अवघड झाले होते. सर्कशीचे चालक हे पैशाच्या व इतर तरतुदीसाठी बाहेर गावी निघून गले. सर्कशीतील कलाकारांची व जनावरांची मात्र शोचनीय अवस्था झाली. कारण मालक जागेवर नाहीत. सुदैवाने या नाट्य संस्थेचे खेळ या भागात चालू होते, तेव्हा या सर्कशीतील काही नोकर मंडळी नाट्यसंस्थेचे चालक नटवर्य धुमाळ, बाबूराव कुलकर्णी, राजन्, श्रीमती हंसा वाडकर यांना भेटली व ही सर्व हकीकत व दारुण-परिस्थिती कथन करून, काही मदत करा, म्हणून विनंती केली. क्षेत्र भिन्न असले तरी अखेर तेही कलावंतच; आणि मुक्या जनावरांची हलाखी ऐकून या नाट्यसंस्थेच्या चालकांनी त्यांच्या विनंतीला तत्काळ मान्यता दिली व 'लग्नाची बेडी'चा एक प्रयोग मिरज येथेच, त्यांच्या उभ्या असलेल्या सर्कशीच्या तंबूमध्ये करण्याचे व त्यातून यथाशक्ती आर्थिक-साहाय्य देण्याचे ठरविले. सर्वांना ही कल्पना—योजना आवडली. प्रयोग अतिशय यशस्वी झाला ! त्या सर्कस कलाकारांना शक्य तेवढे आर्थिक साहाय्य दिले गेले व नंतर सदरहू सर्कस तासगाव-भागाकडे रवाना झाली व नाट्य-संस्थेचे कलाकारही आपला दौरा संपवून आपापल्या घरी—कुटुंबात रममाण झाले...

......व सुमारे महिनाभरातच या संस्थेतील प्रमुख चालक व कलावंत म्हणजे नटवर्य धुमाळ, सिनेतारका हंसा वाडकर, बाबुराव कुलकर्णी, राजन् प्रभृतींना सांगली कलेक्टरांचे वतीने साक्षीसाठी कोर्टाचे समन्स बजावले गेले ! मुक्या प्राण्यांची उपासमार व हाल केले या सबबीवर सरकारने सर्कस—चालकांवर दावा गुदरला होता व त्यासाठी वरील मंडळींना साक्षीदार म्हणून मिरज कोर्टाने समन्स् धाडून बोलावणे केले होते ! 'करायला गेलो एक अन् झाले भलतेच,' अशी अवस्था झाली. भूतदयेने प्रेरीत होऊन केलेले काम हे असे अंगाशी आले !

द. कृ. कुलकर्णी

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ प्रामाणिक लबाडी

आपल्या लोकांत एकूण लबाडी फार, असे मी वरचेवर हताश उद्गार काढीत होतो. साखर घ्यायला गेलो की मनात विचार यायचा– यात पांढरे दगड किती असतील ? हळद-तिखटात रंगवलेली माती किती, जिऱ्यात घोड्याची लीद किती, दुधात पाणी किती अन् पाण्यात सांडपाणी किती अशा शंका, कुशंका माझ्या मनातून हलता हलत नव्हत्या. एकदा तर वाटले सरकारनेच शेरभर साखरेत पावशेर दगड, पावशेर जिऱ्यात अदपाव घोड्याची लीद (घोडा शक्यतो अरबी असावा ! ), कपभर दुधात बशीभर पाणी असे प्रमाण ठरवून द्यावे. अखेर सरकारला न सुचलेली ही सोयिस्कर कल्पना दूधवाल्यांनी उचलेली दिसते. कारण मद्रासच्या दूधवाल्यांनी म्हणे सरकारला अर्ज केला आहे. " धंद्याचा खर्च फार वाढला असल्याने दुधात पाणी मिसळण्याची परवानगी असावी. "

सचोटीचा व्यवहार म्हणतात तो हा ! निखालस दुधात शुद्ध पाणी मिसळून निर्मळ भेसळ पुरविण्याचा हा प्रामाणिकपणा सरकारलाच नाहीतर समितीच्या सरकारी साधूनाही स्तिमित करणारा ठरावा. खरे म्हणजे प्रामाणिकपणाचा हा कित्ता केवळ इतर उद्योगधंद्यांतल्याच नव्हे तर इतर क्षेत्रांतल्या मंडळींनीदेखील गिरविण्यासारखा आहे. निदान मुंबई-दिल्लीच्या दूधवाल्यांनी तरी मद्रासच्या दूधवाल्यांचे अनुकरण करण्यात पुढाकार घ्यायला हवा. आरे दूध-पुरवठा योजनावाल्यांनी पेपरांत भली मोठी जाहिरात द्यावी–" कोण म्हणतो मुंबईत पाण्याची टंचाई आहे ? आमचे दूध घ्या– म्हणजे मुबलक पाणी मिळेल. " दिल्लीच्या सरकारी गवळ्यांनीही जनतेला असे आवाहन करावे– " मोक्षाचा मार्ग मोकळा झाला ! आमचे दूध घ्या आणि रोज पुण्यपावन यमुनेचे जलप्राशन करून पुण्य मिळवा. "

इतर धंद्यांतही अशा उज्ज्वल प्रामाणिकपणाला काही कमी वाव नाही. उदाहरणार्थ, मराठी बाण्याचा एखादा वाणी जशी जाहिरात देऊ शकेल– " आमच्या शिवाजी छाप जिऱ्यात अस्सल भीमथडी तट्टाची लीद मिळेल. " एखादा प्रामाणिक चांभार आपल्या चपलांचे गुणवर्णन करताना गर्वाने म्हणेल– " आमच्या चपलांचा तळव्यात फक्त सर्वोत्कृष्ट दर्जाचा पुठ्ठा वापरला जातो. " सोनार म्हणेल, " चोवीस कॅरटच्या सोन्याच्या दागिन्यांत बारा कॅरट सोने आणि बारा कॅरट तांबे असा चोख समतोलपणा हवा असेल तर आमच्याकडेच या. "

थोड्याफार फरकाने हाच प्रामाणिकपणा इतर क्षेत्रांतही दिसायला हवा. विद्यार्थ्यांनी म्हणावे, " हल्ली अभ्यास फार कठीण झाला आहे. तेव्हा शाळेत न जाता पास होण्याची सोय असावी. ( –अभ्यास सोपा करण्याचा अव्यापारेषु व्यापार सरकारने करू नये. कारण हल्ली आम्ही दगडफेकीत व पोलिसांशी मारामाऱ्या करण्यात इतके गुंतलो आहोत की सोपा अभ्यास करण्याइतकीही फुरसत आमच्याजवळ नाही. ) " निवडणुकीला उभे राहिलेल्या उमेदवारांनी म्हणावे, " इलेक्शनच्या काळात तरी खोटी आश्वासने देण्याची मुभा असावी, ( –शिवाय खोट्या आश्वासनांची मक्तेदारी केवळ सरकारकडेच असावी, हे समाजवादी समाजरचनेला धरून नाही. ) " मराठी वर्तमानपत्रांच्या संपादकांनी जाहिरात द्यावी– " जिल्ह्यांची बातमीपत्रे बसल्या जागी बेमालूम लिहिणारा उपसंपादक पाहिजे. " आणि लोकप्रिय कथालेखकांनी जाहिरात द्यावी– " उसन्या कल्पनांसाठी इंग्रजी कथामासिकांची रद्दी घाऊक भावाने विकत घेणे आहे. "

–पण छे ! इतकी सचोटीची लबाडी प्रत्यक्ष धर्मराजाच्या काळातदेखील नव्हती. त्यानेदेखील बेट्याने ऐन वेळी, ' नरो वा, कुंजरो वा ' असे म्हणून भारत सरकारला शोभेल असा दुटप्पीपणा केला.

## ☐ मुडद्यांचे उपयोग

फार प्राचीन काळची गोष्ट–म्हणजे आम्ही लहान होतो तेव्हाची, " काय रे, तू मोठा झाल्यावर काय होणार ? " असे कोणी विचारले की अस्मादिकांसकट प्रत्येक शेंबडे पोर उत्तर द्यायचे. " मी इंजिन–ड्रायव्हर होणार ! " प्रत्येक पोराला नेमकं इंजिन–ड्रायव्हर व्हावेसेच का वाटते हा मानसशास्त्रीय प्रश्न फ्रॉइडच्या काकालाही सुटण्यासारखा नाही. पण त्या प्रश्नाचे हे उत्तर मात्र निरपवाद आहे, अशी माझी ठाम समजूत होती. तिला आता फार मोठा धक्का बसला आहे. इंग्लंडचे पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन, लहानपणी ज्याचे बोट धरून फिरायला जात अशा एका गृहस्थाने जुन्या आठवणी सांगताना नुकतेच म्हटले, " हॅरॉल्डला लहानपणी एकदा वाटले की आपण मुडदेफरास व्हावे. " शाब्बास ! बाकी पुढे लोकशाहीचा पंतप्रधान होणाऱ्या पोराला जिवंत माणसापेक्षा मुडद्यात अधिक स्वारस्य वाटले तर नवल नाही. निदान हिंदुस्थानात तरी नक्कीच नाही. कारण मुडद्याचा पहिला मोठा फायदा म्हणजे तो उपासमारीने मरायची भीती नाही. दुसरा फायदा म्हणजे तो हिंसक आंदोलनात भाग घेऊन सार्वजनिक शांततेला धोका उत्पन्न करणार नाही.– उलट तो स्मशान-शांततेचा कट्टा पुरस्कर्ता असतो. अन् सर्वांत मोठा फायदा म्हणजे मुडद्याला मत नसते.–तेव्हा ते विकत घेण्यासाठी लाखो रुपये खर्च करायला नकोत.

● ● ●

# महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सव

## ' शितु ' आघाडीवर

महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवाचे यंदाचे सहावे वर्ष. स्पर्धेच्या पहिल्या फरीस म्हणजेच–" प्रिलिमीनरी " परीक्षेस सहा केंद्रांतून सुरुवात झाली.

पुणे– केंद्रातून सादर करण्यात आलेल्या नाटकांमध्ये आतापर्यन्त झालेल्या नाट्यप्रयोगांत सरस्वती मंदिर नटसंघाचे ' शितू ' आघाडीवर आहे. अर्थात स्पर्धेतील " श्रेष्ठी मंडळी " अजून रंगभूमीवर उतरावयाची असल्याने ' शितू 'चे यश निर्णायक ठरेल की नाही, याचे भाकित आताच वर्तवणे कठीण आहे.

मराठी वाचकांवर कादम्बरीकार म्हणून गो. नी. दांडेकरांचा प्रभाव आहे. ' शितू ' ही त्यांची मानसकन्या, त्याच नावाने त्यांनी रंगभूमीवर उभी केली. रंगायनचे मातब्बर कलाकारही ' शितू 'ला लौकिक यश मिळवून देऊ शकले नाहीत. या पार्श्वभूमीवर सरस्वती नाट्य-संघाने ' शितू 'ची निवड केली हे आश्चर्य तर खरेच, परंतु प्रेक्षकांच्या अपेक्षांपेक्षा ' शितू ' यशस्वी करण्यात त्यांनी यश संपादन केले हे त्याहून मोठे आश्चर्य.

कोकणची पार्श्वभूमी व कोकणातल्या मातीत लहानाच्या मोठ्या झालेल्या व्यक्तिरेखा, त्यांच्या सर्व वारकाव्यांसह उभ्या करणे सोपे नव्हते. दिग्दर्शक वसंतराव लोणकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी या अडचणींवर मात करून प्रेक्षकांना एक नेटका, परिश्रमपूर्वक बसवलेला नाट्य प्रयोग पाहिल्याचे समाधान मिळवून दिले.

भुताखेतांवर विश्वास ठेवणाऱ्या, शकुन-अपशकुन मानणाऱ्या कोकणच्या माणसांनी दोन नवरे खाल्लेल्या ' शितू ' ला त्याज्य ठरवले. आप्पा खोतांनी ' शितू 'ला आश्रय दिला. पोटच्या पोरीप्रमाणे तिला वाढवली. आप्पांच्या अकल्पित मृत्यूने ' शितू ' पुन्हा उघड्यावर आली. आप्पांच्या ' मुला '–ची विसूची– उडी मोठी, पण शितूला न मानवणारी. परिणामी कालचक्राच्या दुष्टचक्रात खोतांच्या घराची वाताहत होते. ' शितू 'चाही त्याच्यात नाश होतो.

सांगायचीच झाली तर कथा आहे पाच वाक्यांची, पण 'कोकणचा खास मसाला ' भरून या कथेवर तीन अंकी नाटकाची उभारणी करण्यात आली आहे. लेखनातील दोषांवर प्रयोगातील सफाईने मात केल्याने प्रायोगिक यश वाढल्याचे जाणवले. प्रत्येक कलावंत आपल्या भूमिकेशी समरस झालेला दिसून आला. वहिनी (कु. मंजुश्री.), भाग्या (बाबू गयावळ) यांचा विशेष उल्लेख केला पाहिजे.

**२४ नोव्हेंबर पासून पुणे येथे सांस्कृतिक भवनमध्ये महाराष्ट्रराज्य नाट्य परिषदेच्या सहाव्या वर्षीच्या नाट्यस्पर्धांना प्रारंभ झाला. पुणे केंद्रात स्पर्धेसाठी सोळा नाटके उतरली आहेत. पैकी आठ नाटकांचे समीक्षण या अंकात असून बाकी आठ नाटकांचे समीक्षण पुढील अंकी.**

वसंत लोणकरांचा 'आप्पा' समाधानकारक वाटला. आप्पांच्या घराची रचना, भोवतालची बाग आणि भाग्याची झोपडी नेपथ्यकार माधव भटांनी कुशलतेने उभारल्याने प्रेक्षक कथास्थलाशी सहजगत्या समरस होऊ शकला.

पात्र–योजनेवर घेता येण्यासारखा आक्षेप एकच. 'विसू'–आप्पांचा मुलगा–मॅट्रिक होऊन महाडला येतो. त्याच्या वयासंबंधी निश्चित उल्लेख नाही. फक्त शिक्षण उशिरा सुरू झाल्याचे समजले इतकेच. तरीही विसूचे अपेक्षित वय, व विनायक गोडसे यांचे वय यातील तफावत बोचक वाटली. आवाजातून व हाल-चालींतून वय चोरण्याचा गोडसे यांचा प्रयत्न स्तुत्य वाटला.

स्पर्धेमध्ये आपण स्पर्धक म्हणून उतरत आहोत याची जाणीव 'शितू'च्या प्रयोगानं निःसंशयपणे करून दिली.

## बुडत्याचा पाय खोलात

पुणे केंद्रातील स्पर्धेमध्ये नाशिककरांच्या प्रयोगांना एक निश्चित स्थान आहे. नाशिकच्या संस्थेचा प्रयोग म्हटला की, तो 'हाऊस फुल्ल' असायचा हा प्रति-सालचा परिपाठ या वर्षीही अनुभवास आला. दोन वर्षांखाली शाम फडके यांचा 'तीन चोक तेरा' हा फार्स घेऊन आलेल्या लोकहितवादी मंडळाने यंदा पुन्हा फार्सचा आधार घेतला.

'बुडत्याचा पाय खोलात'–हे वा. रा. सोनारांचे हलके–फुलके नाटक या मंडळींनी कमालीच्या सफाईने सादर केले.

हास्याचा गडगडाट व टाळ्यांचा कडकडाट ही प्रेक्षकांच्या पसंतीची पावती समजली, तर आतापर्यन्तच्या प्रयोगांत तरी प्रेक्षकांकडून इतक्या मोकळ्या मनाने ही पावती अन्य प्रयोगांस मिळालेली नाही.

फार्स जरी कितीही चांगला लिहिला असेल, तरी त्याला प्रयोग यश मिळवून देण्यासाठी प्रथम श्रेणीचा नटसंच लागतो. एखाद्या कलावंताकडून जरी फार्सची नाडी निसटली तरी प्रयोगाचे यश फसते. फार्सच्या प्रयोग–यशाची ही कसोटी लावून पाहिली तर 'बुडत्याचा पाय खोलात'चे यश नाकारता येत नाही. दिग्दर्शक वसंत पेठे यांनी आपल्या गुणी कलावंतांकडून भरपूर परिश्रम घेऊन प्रयोग बसवल्याचे सतत जाणवत होते. कमालीची सहजता व ॲक्शनमधून निर्माण

केलेला विनोद यांमुळे प्रयोगाचे यश भरपूर उंचावले.

फार्समधून कथानकाची व वास्तवतेची अपेक्षा करणे चुकीचे असते. गुंतागुंतीच्या प्रसंगातून विनोदनिर्मिती करावयाची. आणि ही फारशी गुंतागुंत नव्हतीच असे भासवत जो कथेचा थोडाफार धागा असेल तो प्रेक्षकांसमोर उलगडायचा. हे फार्सचे तंत्र येथेही पाहावयास मिळते. श्लील–अश्लीलतेच्या मर्यादा पाहणाऱ्यांना फार्सचे तंत्र मानवणारे नाही. विशिष्ट मनोवृत्तीतून वाढत असलेल्या तरुण पिढीला फार्स कमालीचा जवळचा वाटतो. याचे प्रत्यंतर ' बुडत्याचा पाय खोलात 'च्या यशाला ज्या उत्साहाने तरुण स्त्री–पुरुष प्रेक्षकांनी पावती दिली त्या वेळी पुन्हा एकदा आले.

स्पर्धेच्या दरबारी फार्सला मानाचे स्थान नाही हा जुना अनुभव असल्याने या स्पर्धेतही या प्रयोगाचे मुल्यमापन कसेही होवो, परंतु प्रेक्षकांची भरपूर करमणूक केल्याचे श्रेय ' लोकहितवादींना ' आवर्जून द्यावे लागेल.

## डॉ. वर्टींचे नवे नाटक

स्पर्धेच्या निमित्ताने निदान डझनभर नवीन नाटके रंगभूमीवर येतात आणि प्रेक्षकही नवीन नाटकांचे स्वागत करण्यास अधिक उत्सुक असतात. डॉ. अ. वा. वर्टी यांचे ' सुटलं का कोडं ' हे नवीन नाटक स्पर्धेचे एक खास आकर्षण होते.

वर्टींच्या नाटकामध्ये सुटण्यास अवघड वाटण्याजोगे कोडे नाहीच. कथानकही साधे व सरळ. बाळासाहेब नावाचे पिढीजात तरुण इनामदार सैन्यात दाखल होतात. युद्धभूमीवर जाण्यापूर्वी सैनिकाची विशिष्ट मनोवृत्ती तयार झालेली असते. या मन:स्थितीत असतानाच बाळासाहेबांचा इन्दू नावाच्या मुलीशी संबंध येतो. युद्धावर गेलेले बाळासाहेब सर्व काही विसरतात व नंतर आपल्या गावी येऊन पुष्पावर प्रेम करू लागतात. पुष्पा व बाळासाहेबांच्या लग्नाच्या बोलाचाली चालू असतानाच इन्दू तेथे येते व बाळासाहेब गेल्यानंतर झालेल्या दुर्दशेची हकीकत विस्ताराने सांगते. पुष्पा का इन्दु या प्रश्नाचे उत्तर देण्याच्या मन:स्थितीत बाळासाहेब नसतात. परिणामी इन्दूला वेश्यागृहाचा आश्रय घ्यावा लागतो. मग बाळासाहेबांना वाटू लागते, चुकलंच बरं का आपलं, आपण इन्दुशीच लग्न करायला पाहिजे. या विचाराबरोबर बाळासाहेब वेश्यागृहावर जाऊन इन्दूला मागणी घालतात व ( बहुधा तेथून परत येत असताना ) आपल्या गत आयुष्याचा पूर्ण विचार करून जमीनदारी ( निदान स्वत:ची तरी ) नष्ट करण्याचा निर्णय घेतात. दुसऱ्या अंकातल्या वेश्यागृहानंतर तिसऱ्या अंकात जमीनदारीसारख्या कालबाह्य विषयावरील शुष्क चर्चा. नंतर छोटे-मोठे चमत्कार. शेवटी बाळासाहेबांचे व पुष्पाचे लग्न (म्हणजेच कोड्याचा उलगडा) व पडदा–अशी ही कथा.

कथेत फारसे लक्ष घालण्याजोगे आढळले नाही. तरी डॉक्टरसाहेबांनी दुसऱ्या अंकात वेश्याव्यवसायातील दु:खे प्रेक्षकांसमोर कौशल्याने मांडली असल्याने त्यांचे

अभिनंदन केले पाहिजे. तुलनात्मकदृष्टया तिसऱ्या अंकात कथेला गौणस्थान प्राप्त झाल्याने नाटकाचा प्रभाव पडू शकत नाही.

उत्कृष्ट निर्मितीमूल्ये व बहुसंख्य पात्रांना असलेली अभिनयाची समज यांमुळे प्रयोग पुष्कळच समाधानकारक झाला. प्रभाकरने ( बाबूराव जाधव ) तिसऱ्या अंकात दिलेला दगा संस्थेस चांगलाच महागात पडला.

## अखेरपर्यंत रहस्यमयच

रहस्यमय नाटकांनी स्पर्धेत यश मिळवल्यापासून स्पर्धेत एखादेतरी रहस्यमय नाटक हमखास पाहावयास मिळते. परंतु नाशिककरांनी यंदा सादर केलेला रहस्यमय नाटकाचा प्रयोग खऱ्या अर्थाने 'रहस्यमय' झाला. नाटक संपल्यानंतरही रहस्य गुलदस्तातच राहिले.

सारंग नावाचा कोणी एक लेखक पैशाच्या मोहाने आसावरी नामक धनवान कन्येशी विवाहबद्ध होतो. आर्थिक संपन्नतेमुळे लेखकाच्या कोमल हृदयात प्रेमाचे अंकुर फुटतात. प्रेमप्राप्तीसाठी प्रेयसीच्या मदतीने खुनासारखे कुकर्म करण्यास सारंग तयार होतो. डाव उलटतो. प्रेयसी चित्रा तिनेच तयार केलेल्या सापळ्यात अडकून बळी पडते. आणि प्रतिपक्षाकडून दुसऱ्या खुनाची चक्रे फिरू लागतात. आसावरीच्या स्नेह्याचा– प्रतापचा–खून होतो. नाटकाच्या तिसऱ्या अंकात दोन्ही खुनांचा रहस्यस्फोट करण्याचा प्रयत्न आहे. परंतु निश्चित काय झाले याची प्रेक्षकांना दाद न लागल्याने "असेल बोवा चौथा अंक" म्हणून बिचारा प्रेक्षक नसलेल्या चौथ्या अंकाची वाट पाहत बसतो.

पहिल्या दोन अंकांपर्यंत सुरळीत वाटणाऱ्या या नाटकाची बैठक तिसऱ्या अंकात एकदम बिघडली आहे.

दिग्दर्शक व निरंजनाची भूमिका करणारे गोविन्दराव जोशी यांचा अपवाद


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

वगळता अन्य कलावंतांची कामे बऱ्यापैकी झाली आहेत. नाटकाची तांत्रिक अंगे– विशेषतः पार्श्वसंगीत–समाधानकारक वाटली.

## माळावरची माणसं

स्पर्धेतील पहिला प्रयोग सादर केला पुण्याच्या नाट्य संपदेने. 'माळावरची माणसं' हे विनायक देवरूखकरांचे नाटक या संघाने सादर केले.

समाजाकडून उपेक्षा होत असलेल्या व माळावरील पालांतून राहून श्रमजीवी वर्गाची करमणूक करणाऱ्या माणसांचे चित्र या नाटकात आहे म्हणे.

नाटकात 'दम' कितपत आहे हा प्रश्न बाजूस ठेवला, तरी पुण्यात इतका भिकार नटसंच असू शकतो व तो स्पर्धेतही उतरू शकतो हे या नाटकाने निर्विवादपणे सिद्ध केले.

नाटकात कच्चे दुवे भरपूर, त्यात धड ना करमणूक, ना हाती घेतलेल्या प्रश्नाचे सुस्पष्ट चित्रण. एकही व्यक्तिरेखा सुस्पष्ट वा ठसठशीत नाही. बरं, कलावंत इतके सामान्य की ते काही करतील, याचीही मुळीच अपेक्षा नाही. भिकार नाटक व भिकार नटसंच या दुहेरी कात्रीमध्ये बिचारा प्रेक्षक मात्र पूर्णपणे भरडला गेला. विलासची भूमिका करणाऱ्या दत्ता पुराणिकांना आपण काय बोललो ते त्यांचे त्यांना तरी समजले की नाही ते एक देव आणि ते स्वतः जाणोत.

सूर्यकान्त खांडेकर (राजाभाऊ) नाटकातील पात्रांबरोबर बोलण्यापेक्षा प्रेक्षकांशी बोलण्यातच अधिक रस घेत होते. अवास्तव हातवारे आणि संवाद बोलण्यातील ऐतिहासिक धाटणी यांमुळे त्यांच्या कामामध्ये कमालीची कृत्रिमता आढळून आली.

## 'दिल्या घरी'चे यश

ग्रामीण भागातून येणाऱ्या नाट्य संस्थांकडे सहानुभूतीच्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक असते. पात्र निवडीची मर्यादित शक्यता, तांत्रिक साधनांचा अभाव, आणि ग्रामीण भागात राहिल्यामुळे झालेले बोलण्याचे "ग्रामिणीकरण" या बाबी लक्षात घेऊनच त्यांचे प्रयोग पाहावे लागतात. मात्र असे असूनही हे प्रयोग फारच मर्यादित यश मिळवतात. यंदा त्याला अपवाद केला पाहिजे, साताऱ्याच्या एका संस्थेने सादर केलेल्या 'दिल्या घरी तू सुखी रहा' या नाटकाचा. धंदेवाईक रंगभूमीवर यशस्वी झालेले नाटक घेऊनही या संघाने ते उत्तम प्रकारे सादर केले.

नाटकात आढळलेले ठळक वैशिष्ट्य म्हणजे कलावंताचे पडलेले दोन गट. सर्व स्त्री-पात्रे कमालीची ताकदवान, तर पुरुष पात्रे त्या मानाने कमी ताकदीची. अलका (मीना बी. संकेश्वरकर) व नयना (सौ. इन्दुबाला गळतगेकर) यांनी प्रकट केलेले अभिनयकौशल्य वाखाणण्यासारखे आहे. बारीक मुद्राभिनय व रंगभूमीवरील हालचाली, या बाबतीत त्या दोघींमध्ये डावे उजवे करणे कठीण आहे.

या विभागातून आलेल्या नाटकांपैकी वाईच्या कलावृंदने सादर केलेल्या ' उद्याचा संसार ' ने कमालीची निराशा केली. भूमिकेसाठी आवश्यक असणारी एकही बाब स्वत:जवळ नसताना खुशाल शैलाची भूमिका स्वीकारणाऱ्या मैनाताई नित्सुरे यांचा विशेष पदवी देऊन गौरव केला पाहिजे. अशा संस्थांना एक सूचना करावीशी वाटते ' बाबांनो एकवर्षाआड स्पर्धेत उतरा – पण निदान काही तरी सुसह्य करून दाखवा. '

' देवमाणूस ' (कोरेगाव), सारे सुखासाठी (बार्शी) या नाटकांना ' आम्हीही पळालो 'चा दर्जा द्यावा लागेल. शितू, बुडत्याचा पाय खोलात, सुटलं का कोडं व दिल्या घरी तू सुखी रहा (ग्रामीण-विभाग) ही स्पर्धेच्या उत्तरार्धात स्थान मिळवू पाहणारी नाटके. बाकीच्यांचा निकाल लागल्यातच जमा आहे. अर्थात या नाटकांना स्पर्धेच्या उत्तरार्धात कोणते स्थान मिळते, ते आगामी नाट्य-प्रयोगांच्या दर्जावर अवलंबून राहील.

– शरद गोखले

## जुगलबंदी

पुण्याचा नाट्यप्रेक्षक फार रसिक पण तितकाच चोखंदळ आहे याची नाटकधंद्यातील लोकांना आता खात्री पटली आहे. नटाने जर कामाची फारच उंची गाठली तर हा प्रेक्षक टाळी वाजवण्याचे श्रम घेतो. एरवी टाळी वाजवायला त्याचे हात मोकळे नसतात. पण या स्पर्धेत प्रेक्षकांनी एक वेगळाच अनुभव दिला. आजपर्यंत राम मराठे–प्रसाद सावकार, रविशंकर–अलि-अकबरखाँ, यांच्या जुगलबंदी लोकांना माहीत आहेत. पण या स्पर्धांच्या वेळी सुरुवातीला ज्या जुगलबंद्या गाजल्या त्या मात्र प्रेक्षक आणि कलावंत यांच्या. नटाने विचारले : 'काय करू मी या परिस्थितीत ?'

दुसऱ्या पात्राऐवजी गॅलरीतून आवाज यायचा. ' ताबडतोब घरी जा तुम्ही.'

नट : मला वाटत तू माझे आठ आणे परत करावेस.

प्रेक्षक : आम्हाला पण तसच वाटत.

नट : मी आत्महत्या केली तर बरे होईल.

प्रेक्षक : मग वेळ का घालवता ?

ही जुगलबंदी अशीच चालू राहिल्याने संयोजकांनी प्रयोग सुरू होण्यापूर्वी एक विनंतीवजा पण ' दमदाटीचे ' पत्रक वाचण्याचा परिपाठ सुरू केला. सुदैवाने या पत्रकाबरोबरच चांगल्या नाट्य प्रयोगांना सुरुवात झाली.

# बीवी और मकान

## पाहा, हसा आणि विसरा

बऱ्याच दिवसांपासून वाटत होते, की गोरटेल्या, देखण्या चेहऱ्याचा विश्वजित बाईचा वेष चढवून पडद्यावर आला तर कसा दिसेल ? परवा 'बीवी और मकान' पाहिला आणि ही कल्पना साकार झाली. उत्तर भारतामधील एखाद्या खानदान घराण्यातील दोन मुलांची आई असलेल्या मोठाड शरीराच्या बाईसारखा हुबेहूब दिसतो. म्हणजे आधी जर स्त्रियांची सोंगे घेण्याचे नाटक दाखविले नसते तर चांगलेच फसायला झाले असते. देव आनंद, किशोर कुमारच्या हिरॉईन्स एके काळी (फार मागचा काळ नाही) पुरुषी वेषात यायच्या. मुळात प्रणयकथा असलेल्या त्यांच्या चित्रपटात त्यामुळे गंमती उडायच्या. आता पुरुष बाईचे वेष घेऊन धमाल उडवू पाहत आहेत. 'सम लाईक इट हॉट' चित्रपट भारतात आल्यापासून मला वाटते विनोदी चित्रपट पुरुषाने बाईचे वेषांतर केल्याविना पुराच झाला नसावा. मुळात पुरुषाने बाईचा वेष घालावा, ही कल्पना फारशी विनोदाची वाटत नाही. आणि त्यातून निर्माण होणारे गंमतीचे प्रसंग आता फारच बोथट झाले आहेत.

'वन फॉर फाईव्ह अँड फाईव्ह फॉर वन' हा मॉटो घेऊन पाच तरुण एकत्र राहत असतात. नव्या भाडेकरूकडन मिळणाऱ्या पागडीच्या लोभाने हॉटेलमालक त्यांना हुसकावून लावतो. पंचपांडव जागेच्या शोधात फिरू लागतात. त्यांना खरला जागा मिळतेही. चांगला तीन रूम्सचा ब्लॉक. संडास, बाथरूम स्वतंत्र. पागडी नाही, डिपॉझिट नाही. भाडे फक्त १०० रु. महिना. पण घरमालकाची एक अट जरा विचित्रच. राहायला येणारे भाडेकरू लग्न झालेले असावेत असा त्याचा आग्रह असतो. मेहमूद शक्कल काढतो. नायक विश्वजित व त्याचा साथीदार बनतात छोटी बहू व बडी बहू. राहावयास नव्या जागेत येतात. पाहतात तो ब्लड प्रेशरवाला मालक व त्याची आंधळी बायको यांच्या दिल्लीत राहणाऱ्या दोन जवान मुली मुंबईस परतलेल्या. आफती तर येतातच पण शेवटी सगळे ठीक जमते. सिनेमातले असूनही बाप समजूतदार असतात व सनई वाजू लागते.

'हसो, हसना, हसाना,' चा संदेश घेऊन सुरू झालेला 'बीवी और मकान'



[ पद्मा – नवा चेहरा ]

सनईच्या आवाजात संपतो. गीतांजलीचा हा चित्रपट हृषिकेश मुखर्जींनी दिग्दर्शित केला आहे. पण आपला हा चित्रपट आहे, असे मुखर्जींना अभिमानाने सांगता येणार नाही. मुखर्जींनी हाताळलाय व त्यामध्ये मेहमूद आहे. त्यामुळे चित्रपट पाहण्यासारखा झाला आहे. हसायलाही येते. पात्रांचा बोलण्याचा गोंगाट, विनाकारण एकमेकांशी अंगलट, वेडेविद्रे हावभाव याच गोष्टींचा आसरा चित्रपटासाठी घेतला आहे. विनोदी सिच्युएशन्सची कमतरता व नाविन्याचा अभाव यामुळे तो एक सर्वसाधारण चित्रपट बनला आहे.

चित्रपट करमणूक करतो मुख्यतः मेहमूदमुळे. सुशिक्षित उत्तर प्रदेशी भय्याची नक्कल त्याने बेमालूम केली आहे. किंचित लांडे धोतर, त्यावर जुन्या टायपातला कुडता, ओठभर मिशा व आडवे सपाट बसविलेले केस अशा वेषात भाबडी मुद्रा करून तो पडद्यावर आलाकीच हसू फुटते. मग त्याचेच एकेक आविर्भाव पाहावे व दिलखुलास हसावे. जाहिरातदार ढीग विश्वजित किंवा आणखी कोणाचे नाव हिरो म्हणून पहिले टाकू देत. अशा पिक्चरच्या हिरो असतो तो एकच. मेहमूद.

बाकी चार पांडव, कल्पना, शबनम, पद्मा ठीक आहेत. नायिका हव्यात म्हणून कल्पना–शबनमना आणलेले. टपोरे डोळे, गोबरे गाल, गोल चेहरा यांमुळे कल्पना दिसते आकर्षक. अवखळपणा तिच्या अंगातच, तिच्या हालचालीतच आहे.

हेमंतकुमारने हे पिक्चर काढले आहे. त्यामुळे संगीताचा डोस जबरदस्त झाला आहे. आवर, आवर म्हणत असताही अडीच तासांच्या या पिक्चरमध्ये १० गाणी

घातली आहेत व ती गाईली आहेत १३ पार्श्वगायकांनी. मग गाण्यांचा गोंवळ नाही तर काय होणार ? जवळजवळ सर्व गाण्यांची भजनासारख्या चालींनी सुरुवात होते. टायटलला असलेल्या गाण्यामध्ये 'हसो, हसा' वगैरे वेगवेगळ्या भाषांतील शब्द वापरून गाण्याला चांगला वेग आणला व मग एकदम रद्द्ड गाणे चालू केले. संगीताने या चित्रपटात फार निराशा केली. त्यातल्या त्यात 'हमको मोहब्बत हो गयी है' हे मुकेशच्या एका जुन्या गाण्याच्या विडंबनवजा चालीचे गीत चांगले वाटते.

राजेंद्रसिंग वेदी यांचे संवाद हवे तेवढे विनोदप्रचुर नसले तरी काही काही ठिकाणी त्यांचा खमंगपणा चांगला जाणवतो. विशेषत: मेहमूदच्या तोंडची वाक्ये त्याच्या म्हणण्याच्या ढंगाने अधिक रोचक वाटतात. प्रचलित धडामोडींवरील एक-दोन ठिकाणचे उपरोधात्मक प्रसंगही झकास जमले आहेत.

वीवी और मकान दोन्ही प्रश्न गंभीरच. त्यातला विनोदी भाग दाखविण्याचा 'बीवी और मकान' मधला प्रयत्न बरा जमलाय. अडीच तास गोंधळातच, पण जरा मजेत जातात. मित्रमंडळींच्या गँगमध्ये बसून पाहण्यासारखा चित्रपट आहे. खटकते एवढेच की हृषिकेश मुखर्जींसारखा योजक असूनही चांगला नाविन्यपूर्ण, कलात्मक चित्रपट आमच्यासाठी दुर्लभच ठरला आहे.

●

" चित्रपटाने काही संदेश द्यावा, हे आपल्याला बिलकुल मान्य नाही"— जॉय मुखर्जीचे हे मत त्याच्या 'कलेसाठी—कला' वृत्तीची साक्ष देते. चित्रपट प्रचाराचे साधन असू शकत नाही, असे तो म्हणतो. तो स्वत: 'हम साया' नावाचा चित्रपट सध्या दिग्दर्शित करतो आहे त्यात त्याच्या या मतांचा प्रत्यय यावा.

जॉय गर्भश्रीमंत घराण्यातील. त्याचे वडील एस्. मुखर्जी यांच्या 'हम हिंदुस्थानी' चित्रपटात तो चमकला. नट व्हायची त्याची इच्छा नव्हती. चित्रपट मात्र तो भरपूर पाही. इंग्रजी चित्रपटांनी तर त्याला भारून टाकले. जे. ला थॉम्प्सन आणि मायकेल अँन्डरसन ('चेस क्रूकेड शॅडो' फेम) हे त्याचे लाडके दिग्दर्शक. जॉय सतत वाचन करीत असतो. 'कार्पेट बॅगर्स' सारख्या पुस्तकावर तो तासन् तास चर्चा करतो.

अभिनयाविषयी त्याचं आपलं असं एक स्वत:चं तत्त्वज्ञान आहे. त्याच्या मते नियंत्रण महत्त्वाचे. नटाने आपल्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे

## राशी भविष्य : श्री. गो. जोशी : सायनाचार्य, नाशिक

१७ डिसेंबर ते २३ डिसेंबर १९६६

**मेष** :– शनी पुनश्च मीनेत, म्हणजे पुन्हा साडेसातीची डोकेदुखी सुरू.– त्याच विवंचना, त्याच अडचणी, इत्यादी विचारांचे वादळ तुमच्या मनात उठले असेल ! पण अंतरीक्षातील अखिल ग्रहांचा खास प्रतिनिधी म्हणून मी आपणांस असे निश्चित आश्वासन देऊन ठेवतो की, यावेळेचा बिचारा शनी तुम्हांला ( या वेळी तरी निदान ) मुळीच त्रास द्यायला धजणार नाही. भाग्यातील रवि-शुक्रांची त्याला काही भीती आहेच की नाही ? उगीच कुणीही उठावं आणि वाटेल तसा, वाटेल तेव्हा गोंधळ माजवावा अशी झोटिंगशाही ग्रहराज्यात तरी अजुनी खासच माजलेली नाही !

या वेळी तरी निदान भाग्यस्थ सूर्य-शुक्रांच्या हाती तुमच्या दैवाची सूत्रे सुखरूपपणे सोपविलेली आहेत. मंगलकार्ये यशस्वी करून दाखवाल, अंगीकृत व्यवसायात विक्रमी यश मिळवाल, निवडणुकीच्या आखाड्यात प्रतिस्पर्ध्याला चारी मुंड्या चीत करू, असा आत्मविश्वास बाळगू लागाल.

दि. १८–१९–२० या कालावरच सारे लक्ष केंद्रित करा.

**वृषभ** :– हर्षलसारखा चमत्कार घडवून आणणारा ग्रह पंचमात आणि शनी लाभात. या दोन ग्रहांनी जरी मनात आणले तर ते कंगालाला कुबेर बनवतील ! तुमच्या हयातीत प्रथमच–याच वेळी हर्षल तुमच्या पंचमस्थानी प्रवेश करीत आहे. त्याच्या अनन्यसाधारण महत्ततेचा आता येथूनच पुढे आपणांस प्रत्यय यावा.

खरे जिवाभावाचे मित्र–अनंतकाल ज्यांचे हार्दिक सहकार्य लाभेल–आताच लाभतील. नजीकच्या भविष्यकालात उभारल्या जाणाऱ्या नव्या उद्योगधंद्यासाठी त्यांचे सहकार्य लाख मोलाचे ठरेल. दृष्टीक्षेपात येणाऱ्या प्रगतीच्या अनंत वाटांपैकी एखाद्या वाटेनेही आपण निर्धाराने वाटचाल करू लागलात तर अपेक्षित यश फारसे दूर नाही असा आपणांस साक्षात्कार होऊ लागेल.

हाती अनेक मार्गांनी पैसे येतील, नोकरी-धंद्यातील नवे तंत्र-मंत्र आकर्षक ठरेल. महिलांना तर हा काल महान पर्वणी वाटेल. आणि राजकीय–सामाजिक क्षेत्रात उतरलेल्या व्यक्तींना भविष्यकाल आपलाच आहे, अशी खात्री वाटू लागेल.

दि. २० ते २२ सर्वोत्तम यश पदरी पडावे.

**मिथुन** :– या वेळचे ग्रहमान म्हणावे तसे चांगले नाही पण दुसरा गुरू तुम्हांला कोणत्याही गोष्टीची विवंचना जाणवू देणार नाही. या काली सर्व काही मनाप्रमाणे घडेल. पण स्वास्थ्य हरवल्यासारखे सतत जाणवू लागेल. पैसा येतो केव्हा आणि जातो कुठे हे कळेनासे होईल. मंगलकार्य निर्विघ्नपणे पार पडेल. मानमान्यता–

प्रतिष्ठा उंचावेल, जिवलगांच्या भेटीगाठीने अंतःकरणाची प्रसन्नता बहरेल–पण हे सर्व घडत असताना कुठेतरी खटकतंय, टोचतंय, बोचतंय असे मनाला वाटायला लागेल !

चौथा मंगळ असेपर्यंत थोडेफार हे असेच चालायचे. या हटवादी मंगळापुढे कुणाचेच काही चालत नाही. गुरू दुसरा आहे, शनी दहावा आहे. पण त्याची त्याला पर्वाही नाही !

या वेळी ठरीव अंदाजपत्रक साफ चुकेल. ध्यानी मनी नसणारा प्रचंड खर्च दत्त म्हणून समोर टपकेल. क्षणभर गोंधळून जाल, पण ईशकृपेने यातूनही निभावून जाल. दि. २१–२२–२३ अनुकूल काल.

**कर्क** :– गुरू पहिला, मंगळ तिसरा, शनी नववा. तुमच्या सभोवार उभारलेली ही संरक्षक तटबंदी पाहूनच विरोधक टरकतील अशाच स्वरूपाचा योग १२ वर्षांमागे १९५४ मध्ये तुमच्या वाट्यास आला होता. कौटुंबिक जीवनात–व्यवसायक्षेत्रात या वेळी अनन्यसाधारण प्रगती घडवून आणावी, असेच या वेळच्या ग्रहस्थितीचे मनोगत असावे !

व्यावसायिक क्षेत्रात प्रगतीचे नवे तंत्र-मंत्र आत्मसात कराल, साहित्य-कलाक्षेत्रात नवा इतिहास निर्माण कराल, वेळप्रसंग पडला तर हेतु-सिद्धीसाठी आव्हानाचा पवित्रा घ्याल. आणि निवडणुकीच्या राजकारणात तुमच्या अभिजात कर्तृत्वामुळे नवा अध्याय लिहिला जाईल.

या आठवड्यापासून फार मोठ्या राष्ट्रीय जबाबदाऱ्या अंगावर पडतील–आणि त्या यशस्वी करून दाखवल्यामुळे प्रतिष्ठा खूपच उंचावेल. क्रीडाक्षेत्रातील अष्टपैलू खेळाडूंना याचवेळी विक्रमी यश संपादन करण्याची संधी चालून येईल.

दि. १७–१८–२०–२१ हे दिवस संस्मरणीय ठरावेत.

**सिंह** :– सूर्य–शुक्र पंचमात. एवढ्या सामर्थ्याविरही तुम्ही यशस्वीपणे किल्ला लढवाल. आठवा शनी, दुसरा मंगळ. शत्रू मातबर आहे. पण अशा शत्रूलाही दाती तृण धरावयास लावण्याचा अभूतपूर्व पराक्रम तुम्ही करून दाखवाल. तुमची सिंहाची जमात; प्रखर विरोधाच्या प्रसंगीच तुमच्यातील सुप्त कर्तृत्व उफाळून येते. निर्धारनिष्ठेचे व्रत कठोरपणाने पालन करणाऱ्यांना अशा प्रतिकूलतेचे काय होय !

ईशकृपेने आणि अनेकांच्या हार्दिक सहकार्याने या आठवड्यातील कौटुंबिक आणि सामाजिक जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या जातील याची खात्री बाळगून निर्भयतेने कामास लागा. यश तुमचेच आहे.

खर्च खूप वाढेल, दगदग कमालीची जाणवेल, मनस्तापही काही काही वेळा होईल. पण अपयश चुकूनही पदरी पडू शकणार नाही. विरोधक सहसा निर्माण होणार नाहीतच; झालेच तर त्यांना ठोकरून काढणे मुळीच अशक्य नाही.

दि. १८–१९–२० तुमचे कर्तृत्व पणास लागेल.

**कन्या** :– एकादशस्थ गुरूचे महन्मांगल्य आताच प्रकटेल मध्यंतरीच्या साऱ्या

अनिष्टतेवर पडदा पडेल आणि गतिमान जीवनाचा पुन:प्रत्यय यायला लागेल. सध्याच्या अनुकूल ग्रहस्थितीची शिदोरी पाठीशी बांधून निर्धाराने भविष्यकालाची वाटचाल करू लागलात तर लवकरच असे प्रत्ययास येईल की, अपेक्षासाफल्याचा क्षण फारसा दूर नाही.

कलावंतांना, साहित्यिकांना, यंत्रतंत्र विशारदांना आगामी कालासारखा सर्वंकष प्रगतीचा काल क्वचितच अनुभवण्यास मिळालेला असेल.

शनि–मंगळ प्रतियोगामुळे, कौटुंबिक वातावरण काही काल अस्वस्थ बनेलही; पण त्यामुळे आपल्या व्यावसायिक प्रतिष्ठेवर कसलाही अनिष्ट परिणाम होऊ शकणार नाही. घाईगर्दीने कोणत्याही गोष्टीचे निर्णय घेऊ नका. प्रत्येक गोष्ट करण्यापूर्वी दहा वेळा तरी विचार करा. दि. १७–१८–२२ अनुकूल व लाभदायक काळ.

**तूळ** :– पराक्रमस्थानातील सूर्य–शुक्र एवढे भांडवलही तुमच्या कार्यात अपेक्षित यश द्यायला पुरेसे आहे. शिवाय या वेळचा गुरु–शनी त्रिकोणही तुमच्या पाठीशी उभा आहे. गेल्या महिन्याभरातील तुमची सारी धावपळ व धडपड या वेळी कारणी लागावी. मंगल कार्याचा–नव्या उद्योगधंद्यांचा प्रश्न सुटेल, कदाचित् सुटलेलाही असेल. खर्चाला मात्र ताळतंत्रच राहणार नाही. बाराव्या मंगळात एवढे अपेक्षित असतेच. या आठवड्यापासून दूरच्या दौऱ्यावर निघावे लागेल. अनेक रेंगाळलेली कामे हातावेगळी करावी लागतील. सभासंमेलने गाजवावी लागतील.

प्रतिभेचा उन्मेष बहरेल, उत्स्फूर्त कार्यनिर्मिती घडेल, रंजक–मोहक–उन्मादक लेखन करण्यास प्रवृत्त व्हाल. हे सर्व घडत असताना खिशाला मात्र गळती लागेल. दि. १७–१८–१९ अपेक्षित यश पदरी पडावे.

**वृश्चिक** :– गुरू, भाग्यात मंगळ-हर्षल लाभात हा मणिकांचन योगच. गुरु-शनी त्रिकोणही कित्येक दिवस तुमच्या पाठीशी उभा राहणार आहे. ग्रहांनी अनुकूल कौल दिलेलाच आहे, गरज आहे फक्त अविश्रान्त परिश्रमांचीच.

या आठवड्यापासून अनेक घाईगर्दीचे कार्यक्रम आखले जातील. दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवावे लागेल, धनिकांचे सहकार्य कोणत्याही क्षणी लाभेल आणि त्यामुळे आपले प्रत्येक कार्य घवघवीत यश घेऊन उठेल. असे अनुकूल क्षण क्षणकालच टिकत असतात.

भविष्यकालाची अंधुकशी कल्पना यावी म्हणून सांगून ठेवतो की, ही अनुकूल घडी, मंगल व्ययस्थानी गेल्यानंतर प्रत्ययास येणार नाही. यासाठी आपली सारी कामे या १५–२० दिवसांतच झटपट उरकून घ्या. दि. २० ते २२ अनुकूल दिवस.

**धनू** :–शनी पुनश्च चौथा. छोटी साडेसातीच ही पण आतापासूनच त्या शनीची धास्ती खाऊ नका. तो वक्री झाल्याशिवाय तुमच्या वाटेस जाणार नाही.

दशमातील मंगळ-हर्षलमुळे या वेळी आपणांस फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलाव्या लागतील. आणि जिवाचे रान करून त्या पार पाडाव्या लागतील. हा काल

अपयशाचा नव्हे पण स्वास्थ्याचा जाणवणार नाही. वरिष्ठांशी खटकू लागेल. इष्ट-मित्रांची सहानुभूती गमावून बसाल, घाईगर्दी आणि घडपड अंगाशी येईल.

अगदी स्पष्टपणे सांगायचे म्हणजे, या वेळी एकही ग्रह असा नाही की, त्याच्यावर संपूर्ण भरंवसा ठेवून निर्धास्त राहावे. प्रयत्नांची शिकस्त केलीत तर सहसा अपयशाचे धनी होऊ शकणार नाही. दि. १८–१९–२२–२३ अनुकूल दिवस.

**मकर** :–साडेसातीचे अखेरचे क्षण आपण अनुभवीत आहात. १९ डिसेंबरनंतर पुन्हा २५–२६ वर्षे तरी शनी तुमच्या वाटेस येणार नाही. साडेसातीत त्याने आजवर काही त्रासाचे प्रकार अनुभवायला लावले असतील, तर कित्येक अत्यानंदाच्या घटनाही त्यानेच घडवून आणल्या असतील. तो आता तुमच्यापासूनच दूरदूर जात आहे. 'शुभास्ते पंथान: ' या शब्दांनी त्याचा निरोप घ्यायला विसरू नका !!

या वेळी बहुतेक सारे ग्रह तुमच्यावर बेहद्द खूष दिसतात. हर्षलसारखा ग्रह भाग्यात–तुमच्या हयातीत याच वेळी प्रथम आलेला आहे. या साऱ्या ग्रहांच्या कृपेने व्यावसाहिक क्षेत्रात, राजकीय आघाडीवर विजयावर विजय मिळवू शकाल, क्रीडाक्षेत्रात क्रिकेटच्या खेळात–भारतीय जवान विक्रम करून दाखवतील. वेस्ट इंडीजसारख्या जगज्जेत्या संघालाही भारतीय संघावर विजय मिळविणे वाटते तितके सोपे नाही अशी क्षणोक्षणी जाणीव व्हायला लागेल. दि. १७ ते १९ विशेष यशदायी काल.

**कुंभ** :–एकादशांत सूर्य–शुक्र. याच एका ग्रहस्थितीवर तुमच्या जीवनाची जडणघडण अवलंबून आहे. जीवनातील महन्मांगल्याचे क्षण निर्माण होतील याच आठवड्यात, तर अपेक्षासाफल्याचा प्रत्यय येईल याच कालखंडात. तुमचे फार दिवसांचे स्वप्न साकार होईल याच आठवड्यात. मंगलकार्य थाटात पार पडेल, नोकरीधंद्याचा प्रश्न अपेक्षेप्रमाणे सुटेल. ईश्वरी कृपेचा प्रत्यय क्षणोक्षणी येऊ लागेल. आणि समर्थांचे सहकार्य कोणत्याही क्षणी लाभू शकेल.

या काली घडून येणाऱ्या शुभ घटना चिरंतन स्मृतीच्या ठरतील. दि. १७ ते २० या कालाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

**मीन** :–शनीचा छळ आणि मंगळाचा विरोध दोन्हीही माऱ्यांना आपणांस तोंड द्यावे लागत आहे. ज्याच्यावर संपूर्ण विसंबून राहावे असा एकच भरंवशाचा ग्रह गुरू. बाकीची सारी कठिण समयी कोणीच कामास न येणारी.

मतभेद, अनारोग्य, व्यावसायिक संघर्ष इ० प्रकारांना या वेळी अगदी ऊत येईल. नको त्याचे पाय धरावे लागतील. सतत मन मारून काम करावे लागेल. कित्येक वेळी चढाईपेक्षा माघार घेणेच हिताचे असते. असे असूनही हा आठवडा नोकरीधंदा, यांत्रिक व्यवसाय या दृष्टीने काहीसा लाभाचा ठरेल. ऐन आणीबाणीच्या वेळी थोर मित्रांच्या मदतीचे हात पुढे होतील. दि. २० ते २३ काहीसा यशस्वी काल.

• • •

[ सांस्कृतिक एकतेचे शिल्पकार पान २१ वरून ]

वसवून तिची पूजाअर्चा करायची पद्धती घालून दिली आणि वेदाध्ययनाचे मोठे क्षेत्रच त्यांनी तेथे निर्माण केले. आजही शृंगेरी मठ हे वेदाध्ययनाचे आणि अद्वैत तत्त्वज्ञानाचे मोठे केंद्र आहे. शृंगेरी मठ हे शंकराचार्यांच्या रचनात्मक कार्याचे प्रमुख केंद्र होते. आपले शिष्य तोटकाचार्य यांना त्यांनी मठाचे अध्यक्ष नेमले.

तेथून ते आपल्या जन्मगावी एकटे आले. त्यांची आई मृत्युशय्येवर होती. मुलाच्या मांडीवर तिने प्राण सोडला. पूर्वप्रतिज्ञेनुसार त्यांना स्वत:ला तिचे दहन करायचे होते. पण संन्याशाला प्रेतदहन करण्यास कुणी मदत देईना म्हणून. त्यांनी घराच्या अंगणातच आईचे प्रेतदहन केले, तेव्हापासून नंबुद्री ब्राह्मणात हीच प्रथा पडली.

काल्डीहून शृंगेरीला परत येऊन शंकराचार्यांनी आपल्या दिग्विजय यात्रेला पुन्हा सुरुवात केली. आतापर्यंत ते केवळ ब्राह्मण आणि पंडितांतच वादविवाद करीत. आता ते समस्त जनांमध्ये प्रचार करू लागले. भाषणे करू लागले. अद्वैतमताचे मंडण जोरदार करू लागले. सारा भारतवर्ष त्यांच्या शंखनादाने दुमदुमला. भारतातील सर्व प्रसिद्ध तीर्थांत त्यांनी भ्रमण केले. बदरीनाथ, कश्मीरपासून तो रामेश्वरापर्यंत आणि जगन्नाथपुरीपासून तो द्वारकेपर्यंत संचार केला. काश्मीरात शारदा मठ स्थापला. नेपाळच्या पशुपतिनाथाच्या पूजेला पद्धत घालून दिली. अनेक ठिकाणी मठ, मठी बांधल्या. वेदाध्ययनाची विद्यालये उघडली, मंदिरांचे जीर्णोद्धार केले. आणि कांची येथील कामकोटी पीठात येऊन इ. स. ८२० मध्ये वयाच्या बत्तीसाव्या वर्षी समाधी घेतली. समाधी कुठे घेतली याबद्दल अद्याप मतभेद आहेत. केरळात त्रिचूरजवळ त्यांच्या समाधीचे स्थान दाखवतात. पण मध्यप्रदेशातील कांची हेच त्यांच्या समाधीचे विश्वसनीय स्थान मानले जाते. कैलास यात्रेतून त्यांनी पाच स्फटिक लिंगे आणून त्यांनी त्यांची स्थापना श्रृंगेरी, चिदंबरम्, नेपाळात वीरलिंग, बद्रीनारायण आणि कांचीच्या कामकोटी पीठात केली होती.

शंकराचार्यांच्या नावावर सुमारे २०० च्याही वर ग्रंथ आहेत. पण ते सर्वच त्यांचे नाहीत. वर उल्लेखिलेले प्रस्थानत्रयीभाष्य, गीताभाष्य आणि उपनिषद भाष्य हे त्यांचे अत्यंत महत्वाचे ग्रंथ त्यांच्या अतिशय सुलभ विवेचनाविषयी, तर्क-पद्धतीविषयी आणि प्रासादिकतेविषयी प्रसिद्ध आहेत.

त्यांनी स्थापलेले चार धामांचे चार विख्यात मठ म्हणजे बद्रीनारायणाचा ज्योतिर्मठ, द्वारकेचा शारदा मठ, म्हैसूरमधील शृंगेरी मठ आणि जगन्नाथपुरीचा गोवर्धन मठ. त्याचबरोबर मध्यप्रदेशातील कांची येथील कामकोटी मठही महत्त्वाचा मानला जातो. चार दूर दूर ठिकाणी हे मठ स्थापून त्यांनी आपली प्रचार केंद्रे विभागली. प्रत्येक मठाचे कार्यक्षेत्र त्यांनी पृथक् पृथक् विभागून दिले. आणि प्रत्येक मठाच्या अध्यक्षस्थानी आपले शिष्य नेमून त्यांना आपापल्या भागातील लोकांना धर्मोपदेश करण्यास, वैदिक मार्गांचा पुरस्कार करण्यास सांगितले. हे अध्यक्ष आणि त्यांच्यामागून येणारे सर्व अध्यक्ष स्वत:ला शंकराचार्य ही उपाधी लावतात.

वैदिक धर्माच्या प्रचाराला एवढी शिस्त शंकराचार्यांनीच प्रथम लावली. द्वारका, जगन्नाथपुरी, बदरीनारायण आणि रामेश्वर येथेही महत्त्वाची देवळे उभारून त्यांनी भारतीयांना आपल्या विशालत्वाची जाणीव दिली. नाहीतर तोवर एका प्रदेशातील भारतीय दुसऱ्या प्रदेशात क्वचितच जात. ही चार महत्त्वाची धामे निर्माण झाल्यापासून भारतातील सामान्य जनताही तीर्थयात्रेच्या निमित्ताने हिंदुस्थानाच्या चारी टोकांपर्यंत जाऊन येऊ लागली.

आजचे शंकराचार्य हे याच शंकराचार्यांचा वारसा सांगतात. आद्य शंकराचार्यांपासून त्यांची गादी अव्याहत चालत आली आहे. वैदिक तत्त्वज्ञानाचे प्रमुख भाष्यकार म्हणून त्यांना मानले जाते आणि याच कसोटीवर ते शंकराचार्य होतात.

## सांस्कृतिक ऐक्याचे शिल्पकार

मतस्वातंत्र्याने चेकाळलेल्या हिंदुपंथांची एकी साधणे हे शंकराचार्यांचे प्रमुख कार्य. खोल दूरदृष्टी ठेवून अत्यंत प्रभावीपणे त्यांनी ते पार पाडले. आणि सर्वत्र भारतभर न भूतो न भविष्यति असे सांस्कृतिक ऐक्य घडवून आणले. भारताचे आजचे सांस्कृतिक ऐक्य हे त्यांच्याच दूरदृष्टीचे फळ.

पंडित जवाहरलाल नेहरूंनी आपल्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथात शंकराचार्यांच्या कार्याचे मार्मिक विवेचन केले आहे. ते म्हणतात– "शंकराचार्यांची कार्यशक्ती अफाट होती. जगाची पर्वा न करता केवळ आत्मोन्नतीसाठी ध्यानधारणा करायला जंगलात जाऊन बसणारे ते पलायनवादी नव्हते. आयुष्यभर ते सर्व भारतवर्षभर भ्रमंती करीत. वादसभा जिंकीत, पंडितांशी चर्चा करीत; आपली मते त्यांना पटवून देत होते. आणि आपल्या दुर्दम्य निष्ठेने इतरांनाही कार्यरत करीत होते. स्वतः हाती घेतलेल्या कार्याची त्यांना सखोल जाणीव होती. एकाच संस्कृतीच्या आणि प्रेरणेच्या धाग्यांनी बांधला गेलेला, हिमालयापासून तो कन्याकुमारीपर्यंतचा भारतवर्ष हा ते आपले कार्यक्षेत्र मानीत होते. भारतीय जनमानसात त्या काळी गोंधळ उडविणारे परस्परविरोधी प्रवाह एकत्र करण्याचे त्यांनी आटोकाट प्रयत्न केले आणि त्या वैविध्यातही एकच सूत्र असल्याचे त्यांनी दाखवून दिले. अवघ्या बत्तीस वर्षांच्या आयुष्यात अनेक आयुष्यांत होऊ शकणार नाही एवढी प्रचंड कामगिरी शंकराचार्यांनी पार पाडली आणि आपल्या सामर्थ्यवान मनाची व व्यक्तित्वाची एवढी जबरदस्त छाप भारतावर पाडली की ती आजही कायम आहे...

"......भारतातील राष्ट्रीय एकतेची आणि समान जाणिवेची भावना शंकराचार्यांना वृद्धिंगत करावयाची होती. बौद्धिक, तात्त्विक व धार्मिक पातळीवर काम करून त्यांनी उभ्या देशात एक महान वैचारिक ऐक्य प्रस्थापित करण्याचे प्रयत्न तर केलेच, पण त्याबरोबर त्यांनी सामान्य जनतेसाठीही तत्त्वज्ञानाची कवाडे खुली करून अनेक अंधश्रद्धांना मूठमाती दिली. आपले चार मठ देशाच्या चारही टोकांना स्थापून भारतातील सांस्कृतिक ऐक्याची भावना त्यांनी जोपासली....." ●




# भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य रुपये पंचवीस

प्रसिध्दिपूर्व ग्राहकांनी आपल्या प्रती कार्यालयातून लवकर नेण्याची व्यवस्था करावी.

राजहंस प्रकाशन


४१९ नारायण, पुणे २

MANOOS (Weekly) । 40 Paise । Regd. No. M H–649


प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

# स्वस्तिक

## चप्पल्स



स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणे ३.


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**